**पावसाळा तोंडावर, शहरातील नालेसफाई होणार कधी?**

वाचा पान ३ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
गुरुवार, दि. २२ मे २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३०। अंक : २६९। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प



समर्पित मानसिकतेमुळे ध्येयनिष्ठ कार्यकर्त्याची आंतरिक शक्ती वेगळीच असते. अहंकाररहित समर्पण भावनेमुळे कार्यकर्त्यामध्ये एक प्रचंड मनोबल निर्माण होते. असे मनोबल राहिले तर शारीरिक शक्ती कमी असली तरी कार्यकर्ता प्रचंड कार्य करू शकतो.

**- दत्तोपंत ठेंगडी,**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

### अबुझमाडच्या जंगलात तुंबळ संघर्ष

# २७ नक्षलवादी ठार, बसवराजूचा समावेश?

**नारायणपूर, २१ मे**

अबुझमाडचे घनदाट जंगल आणि इंद्रावती नॅशनल पार्कच्या भागात बुधवारी नक्षलवादी आणि पोलिस यांच्यात तुंबळ संघर्ष उडाला. यामध्ये २६ नक्षलवादी ठार तर कित्येक जखमी झाले. तसेच एक पोलिस जवान हुतात्मा झाला. मृतांमध्ये नक्षलवादी चळवळीचा कणा समजला जाणारा नंबाला केशव राव ऊर्फ बसवराजूचा समावेश असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अबुझमाडच्या जंगलाच्या एका विशिष्ट भागात प्रतिबंधित माओवादी संघटनेच्या सेंट्रल कमिटी आणि पॉलिट ब्युरोच्या वरिष्ठ सदस्यांसोबतच माड डिव्हिजन आणि पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचे सदस्य लपून बसल्याची



गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारे नारायणपूर, दंतेवाडा, बिजापूर आणि कोंडागाव जिल्ह्यांच्या जिल्हा राखीव सुरक्षा पथकांच्या जवानांनी मंगळवारपासून संयुक्तपणे अबुझमाडच्या जंगलात शोधमोहिम सुरू केली. यादरम्यान नक्षलवाद्यांनी सुरक्ष पथकाच्या दिशेने गोळीबार सुरू केला. हल्ला होणार हे गृहीत धरूनच जवानही सज्ज होते. त्यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. बराचवेळ दोन्ही बाजूंनी तुफान गोळीबार सुरू होता. चकमकीत एका वरिष्ठ कमांडरसह २७ नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आढळून आला आहे. संघर्षात एक पोलिस जवान हुतात्मा झाला आहे.

छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या गडचिरोली जंगलातील घनदाट जंगलात असलेला अबुझमाडचा विशाल आणि विस्तीर्ण परिसर गेल्या कित्येक वर्षांपासून नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला राहिला आहे. अबुझमाड म्हणजे अतिशय सुरक्षित आश्रयस्थान मानले जाते. या जंगलात पाय ठेवण्याचीही हिम्मत सुरक्षा जवानांची नव्हती. पण, भाजपा सरकारने २०२६ पर्यंत भारत नक्षलमुक्त करण्याचा निश्चय केला असून गेल्या वर्षभरात नक्षल्यांविरोधात मोठ्या मोहिमा आखण्यात आल्या होत्या )



जिल्हा राखीव रक्षक दलाचे जवान अबुझमाडच्या घनदाट जंगलात नक्षलवादविरोधी मोहिमेवर असताना ही चकमक उडाली. आमच्या पोलिसांनी शुरतेने नक्षलवाद्यांना प्रत्युत्तर देत त्यांचा खात्मा केला. मी या जवानांचे अभिनंदन करतो.

**- विजय शर्मा**
उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री छत्तीसगड

#### मोठा शस्त्रसाठा जप्त

चकमकीनंतर घटनास्थळावर नक्षलवाद्यांचे मृतदेह आणि मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. चकमकीत काही जवान जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अबुझमाडच्या जंगलात शोधमोहीम सुरू असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

#### या महिन्यातील दुसरा मोठा धक्का

२१ एप्रिलापासून करेगुट्टा जंगलात शोधमोहिमेला प्रारंभ केला होता. जवळपास २० दिवस पाच हजार जवानांनी वेढा दिला होता. २१ दिवस चाललेल्या मोहिमेत टॉप कमांडर हिडीमा मडावीसह ३१ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती छत्तीसगड पोलिसांनी १६ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन दिली. बुधवारी बसवराजू रुपात दुसरा धक्का नक्षलवादी चळवळीला बसला आहे.

#### यावर्षी २०० नक्षलवाद्यांचा खात्मा

यावर्षी छत्तीसगडमधील विविध चकमकींमध्ये २०० नक्षलवादी ठार झाले आहेत. यापैकी एकट्या बस्तर क्षेत्रात १८३ नक्षलवाद्यांना ठार करण्यात यश आले आहे. बस्तरमधील बिजापूर, नारायणपूर, दंतेवाडा आणि कोंडागाव या जिल्ह्यांमध्ये नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

### लष्करचा सहसंस्थापक हमजावर गोळीबार

**इस्लामाबाद, २१ मे**

प्रतिबंधित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा सहसंस्थापक आमिर हमजावर अज्ञातांनी गोळीबार केला. यात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर लाहोर येथील पाकिस्तानी लष्कराच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास हल्लेखोरांनी त्याच्या घरात प्रवेश करीत गोळीबार केल्याची माहिती समोर आली.



लष्करमधील कुख्यात दहशतवादी अबू सैफुल्लाहवर तीन दिवसांपूर्वी पाकिस्तानमध्ये काही अज्ञातांनी गोळीबार केला, यात तो जागीच ठार झाला होता. त्यानंतर मंगळवारी आमिर हमजावर त्याच्या घरात घुसून हल्ला करण्यात आला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या घटनेबाबत मौन बाळगले असले तरी तेथील स्थानिक वृत्तवाहिनीच्या माहितीनुसार हमजाच्या छातीत आणि पोटावर तीन गोळ्या झाडल्या गेल्या. सुरक्षा दलाने त्याला लाहोर येथील रुग्णालयात दाखल केले.

## महत्त्वाचे

### निर्देशांकात ४१० अंकांची वाढ

**मुंबई :** सलग तीन दिवसाच्या घसरणीनंतर आज निर्देशांकात ४१० अंकांच्या वाढीसह ८१,५९६.६३ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी १२९.५५ अंकांच्या वाढीसह २४,८१३.४५ अंकांवर बंद झाला. आजच्या व्यवहारादरम्यान एका



टप्प्यावर निर्देशांक ८२,०२१.६४ अंकांवर पोहोचला होता आणि निफ्टी २४,९४६.२० अंकांवर पोहोचला होता.

बुधवारी, निर्देशांकामधील ३० पैकी २४ कंपन्यांचे शेअर्स वाढीसह बंद झाले आणि उर्वरित सहा कंपन्यांचे शेअर्स तोट्यासह बंद झाले. दुसरीकडे, निफ्टी मधील ५० पैकी ३७ कंपन्यांचे शेअर्स वाढीसह तर उर्वरित १३ कंपन्यांचे शेअर्स घसरणीसह बंद झाले. बजाज फिनसर्व्हचे शेअर्स सर्वाधिक २.०२ टक्क्यांनी वाढून बंद झाले, तर इंडसइंड बँकेचे शेअर्स १.८७ टक्क्यांनी घसरून बंद झाले.

# रोहिणी ग्रामपंचायतीची विशाल भरारी!

### देशस्तरावर ई-गव्हर्नन्स सुवर्ण पुरस्कार जाहीर; विशाखापट्टणम येथे ९ जूनला वितरण

**धुळे :** केंद्र शासनामार्फत आयोजित राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स २०२३-२४ स्पर्धेत जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील रोहिणी ग्रामपंचायत देशस्तरावरील ई-गव्हर्नन्स सुवर्ण पुरस्कार विजेती ठरली आहे.

केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि निवृत्तिवेतन मंत्रालय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाने बुधवारी (२१ मे) या स्पर्धेचा निकाल जाहीर केला. रोहिणी ग्रामपंचायतीस ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि १० लाखांचा रोख पुरस्कार मिळणार आहे. आंध्र प्रदेशातील नोव्होटेल, विशाखापट्टणम येथे ९ जूनला होणाऱ्या २८ व्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेत या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार २०२३-२४ स्पर्धेसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून ग्राम पंचायतींनी सहभाग घेतला होता. त्यातून धुळे जिल्हास्तरावरून राज्यस्तरावर रोहिणी (ता. शिरपूर) ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून १८ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली होती.



त्यात राज्यात पहिले स्थान मिळवून रोहिणी ग्रामपंचायतीची राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली होती. स्पर्धेसाठी देशभरातून फक्त सहा ग्रामपंचायती या पुरस्काराच्या स्पर्धेत होत्या. त्यातील महाराष्ट्रातील रोहिणी ग्रामपंचायतीस सुवर्ण पुरस्कार, पश्चिम मजलीशपूर (जि. पश्चिम त्रिपुरा, त्रिपुरा) ग्रामपंचायतीस रौप्य पुरस्कार, पलसाणा (जि. सुरत, गुजरात) आणि सुकाटी (जि. केंडुझार, ओडिशा) या ग्रामपंचायतींना ज्युरी पुरस्कार मिळाला आहे.

स्पर्धेत प्रामुख्याने ग्रामपंचायती किंवा समतुल्य पारंपरिक स्थानिक संस्थांद्वारे केलेल्या उपक्रमांवर लक्ष केंद्रित करून सेवा वितरण अधिक सखोल-विस्तारित करण्यासाठी ग्रासरूट लेव्हल इनिशिएटिव्हज या श्रेणीअंतर्गत सुवर्ण, रौप्य आणि ज्युरी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी १० मे रोजी दिल्लीतील सेंट्रल ज्युरी टीमसमोर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी सादरीकरण केले होते.

दरम्यान, रोहिणी ग्रामपंचायतीचा ई-गव्हर्नन्स ग्रामपंचायत म्हणून राज्य शासनाकडून पुरस्कार देऊन नुकताच सन्मान करण्यात आला. या पुरस्कारासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार. गटविकास अधिकारी प्रदीप पवार, विस्तार अधिकारी संजय पवार यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीतील अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभल्याचे रोहिणीचे सरपंच डॉ. आनंद पावरा, ग्राम सेवक आर. के. कुमावत यांनी सांगितले.

# वक्फ धर्मादाय संस्था, इस्लामचा भाग नाही

### सर्वोच्च न्यायालयात केंद्राची भूमिका | सरकारी जमिनीवर कोणाचाही अधिकार नाही

**नवी दिल्ली, २१ मे**

वक्फ ही एक इस्लामिक संकल्पना आहे, परंतु ती इस्लामचा आवश्यक भाग नाही. दान हा प्रत्येक धर्माचा एक भाग आहे, त्यामुळे वक्फ ही एक धर्मनिरपेक्ष व्यवस्था असून ती केवळ धर्मदाय संस्था आहे. वक्फ बोर्डाने दावा केला असला तरी देशातील कोणत्याही भागातील सरकारी जमिनीवर सरकारशिवाय कोणीही अधिकार सांगू शकत नाही, अशी भूमिका केंद्र सरकारच्यावतीने महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांना बुधवारी सर्वोच्च न्यायालयात मांडली.

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सलग दुसऱ्या दिवशी सरन्यायाधीश भूषण गवई, न्या. ए.जी. मसीह आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या न्यायासनासमोर सुनावणी पार पडली. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल, अभिषेक मनु सिंघवी आणि राजीव




धवन यांनी केलेल्या युक्तिवादावर केंद्र सरकारची बाजू मांडताना महान्यायाभिकर्ता तुषार मेहता म्हणाले, दानधर्माची संकल्पना प्रत्येक धर्मात आहे. हिंदू, शीख,ख्रिश्चन धर्मातही दान देण्याची संकल्पना आहे. मुस्लिम समुदायातील बहुतांश लोकांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही, ते वक्फ करू शकत नाहीत, मग ते मुस्लिम राहणार नाहीत का? कोणत्याही धर्मात दान करणे आवश्यक नाही, त्याचप्रमाणे इस्लाममध्येही वक्फ करणे आवश्यक नाही. वक्फ बाय युजर हा काही मूलभूत अधिकार नाही

#### ९६ लाख लोकांनी केल्या सूचना

या कायद्यातील दुरुस्त्यांचा उद्देश मागील अनेक दशकांपासून असलेल्या समस्यांचे निराकरण करणे आहे. हे बदल १९२३ पासूनचे प्रश्न सोडवतात. या सुधारणांमध्ये देशातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. ९६ लाख लोकांनी सूचना केल्या होत्या आणि संसदीय समितीच्या ३६ बैठका झाल्या, त्यामुळे व्यापक सल्लामसलत करूनच कायदा पारित करण्यात आला. त्यामुळे काही याचिकाकर्ते संपूर्ण मुस्लिम समुदायाचा भाग असू शकत नाही. तुमच्याकडे आलेल्या याचिका अशा लोकांनी दाखल केल्या आहेत ज्यांच्यावर या कायद्याचा थेट परिणाम होत नाही.

#### सुनावणीत केंद्राने मांडलेले महत्त्वाचे मुद्दे

- एकूण तीन मुद्यांवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली, त्यावर उत्तर दाखल करण्यात आले आणि न्यायासनाने सुनावणी केवळ याच मुद्यांपुरती मर्यादित ठेवली
- पारदर्शकता, जबाबदारी आणि प्रशासकीय सुधारणांसाठी ,हा कायदा आणण्यात आला
- हा कायदा संविधानाच्या विरोधात नाही आणि धार्मिक स्वातंत्र्य किंवा अधिकारांमध्ये हस्तक्षेप करीत नाही
- वक्फ ही एक धर्मनिरपेक्ष संपल्पना आहे परंतु, इस्लामचा अविभाज्य भाग नाही
- संसदेने मंजूर केलेला कायदा लागू करण्यापासून थांबवता येत नाही, अंतरिम आदेश देण्यापूर्वी कायद्याची घटनात्मक वैधता सर्व समावेशकपणे तपासली पाहिजे.

# सोनिया, राहुल गांधींनी कमावले १४२ कोटी रुपये

**नवी दिल्ली, २१ मे**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाबाबत राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्या अडचणी सतत वाढत आहेत. या प्रकरणाबाबत ईडीने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात दाखल केलेल्या फिर्यादी तक्रारीवर सुनावणी झाली. या प्रकरणातील आरोपी राहुल आणि सोनिया गांधी यांनी एकूण १४२ कोटी रुपयांचा नफा मिळवला, असे यावेळी ईडीने सांगितले.

नोव्हेंबर २०२३ मध्ये ईडीने नॅशनल हेरॉल्डशी संबंधित ७५१.९ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त होतपर्यंत ते यातून मिळालेल्या पैशाचा आनंद घेत होते. गांधी कुटुंबाने या पैशातून केवळ मनी लॉंड्रिंग केले नाही तर ते पैसे स्वतःकडे ठेवून गुन्हे करत राहिले, असा दावा ईडीने केला आहे.दरम्यान, न्यायालयाने भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांची याचिका मंजूर केली. यामध्ये त्यांनी आरोपपत्राची प्रत आणि इतर कागदपत्रे मागितली होती. स्वामी यांनी तक्रार दाखल केल्यानंतर स्थानिक न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली. यानंतर २०२१ मध्ये चौकशीला प्रारंभ केला आणि आरोपपत्र दाखल केले.

#### जुलै महिन्यात दररोज होणार सुनावणी

सोनिया आणि राहुल गांधी यांच्या वकिलांनी उत्तर देण्यास आणखी वेळ देण्याची विनंती न्यायालयाला केली आहे. कागदपत्रे तयार करण्यास आणखी वेळ हवा असल्याचे त्यांनी म्हटले. या प्रकरणावर आता २ ते ८ जुलै दरम्यान दररोज सुनावणी होणार आहे.

### धुळ्याच्या जिल्हाधिकारीपदी भाग्यश्री विसपुतेंची नियुक्ती

**धुळे :** जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांची छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त



म्हणून पदोन्नती झाली आहे, तर छत्रपती संभाजीनगर येथील सिडकोच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी भाग्यश्री विसपुते यांची धुळ्याच्या नूतन जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यात प्रशासकीय खांदेपालट सुरूच असून, आताही आठ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. ज्येष्ठ आयएएस अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्याकडे धुळ्याच्या जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी होती, त्यांची बदली आता छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्तपदी करण्यात आली आहे. तर धुळ्याच्या जिल्हाधिकारीपदी सिडकोच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी भाग्यश्री विसपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
*शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था*
सकाळी १० ते ८ (जेवण पार्सल उपलब्ध)
गुरुवार, दि. २२ मे २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, ताक, वेफर्स, उपवास चिवडा, मुरमुरे चिवडा उपलब्ध आहे.
सँडविच भाकरी २० रू. नग पोळी भाजी १५ रु. प्लेट मेथी पराठा व चटणी २० रू. मसाला पुरी उपलब्ध.
पार्सल मिळेल.
पार्सल वेळ १० ते ८ पर्यंत
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
*केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम*
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# कोरोनाचा अलर्ट, शासकीय रुग्णालय तयारीत

### जळगावात ४० खाटांचा स्वतंत्र वॉर्ड कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव २१ मे**

महाराष्ट्रात पुन्हा कोरोनाचा शिरकाव झाला आहे. सध्या मुंबईत कोरोनाबाधित रुग्ण आढळून येत असल्याने राज्य शासनाने आरोग्य यंत्रणांना हाय अलर्टचा इशारा दिला आहे. त्यामुळे शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयही तयारीत असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी दिली.

तब्बल दोन वर्षे जिल्ह्यात कोरोनाने कहर केला होता. त्यानंतर जनजीवन पूर्वपदावर येत नाही तोच महाराष्ट्रात पुन्हा कोरोनाचा शिरकाव झाल्याने आरोग्य यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर येथील अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी सांगितले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सज्ज झाले आहे. रुग्णालयात ४० खाटांचा स्वतंत्र वॉर्ड सज्ज ठेवण्यात आला आहे. आयसोलेटेड ऑक्सिजन असलेल्या खाटांचा स्वतंत्र कक्ष कार्यान्वित केला आहे.

**व्हेंटिलेटरची उपलब्धता**

व्हेंटिलेटर मशीन आपल्याकडे पुरेसे उपलब्ध असून, लहान मुलांचा विचार करता बाल विभाग तसेच वॉर्डसुद्धा सज्ज ठेवण्यात आला आहे. कोरोनाच्या नमुने तपासणीसाठी आवश्यक सुसज्ज लॅब तसेच तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त केले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सज्ज असल्याचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांनी सांगितले.

कुठलीही लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित तपासणी करून घ्यावी, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# गुजरातमध्ये सिंहांच्या संख्येचा विक्रम

### ६७४ वरून ८९१ वर पोहोचली संख्या, सौराष्ट्र प्रदेशातील ११ जिल्ह्यांमध्ये अधिवास



#### गीरच्या बाहेरही आढळले सिंह

गुजरात वन विभागाचे प्रमुख मुख्य वनसंरक्षक जयपाल सिंह यांनी सांगितले की, १० ते १३ मे या काळात सिंहांची गणनी करण्यात आली. यात ११ जिल्ह्यांतील ५८ तालुक्यात ३५००० चौरस किलोमीटर क्षेत्रात सिंह आढळून आले. याचा अर्थ असा की आता गीरच्या बाहेर सिंहांची संख्या झपाट्याने वाढत आहे. गणनेसाठा तीन हजार स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

#### या ११ जिल्ह्यांत दिसतात सिंह

जुनागढ, गिर सोमनाथ, भावनगर, राजकोट, मोरबी, सुरेंद्रनगर, द्वारका, जामनगर, अमरेली, पोरबंदर, बोटाड या संरक्षित क्षेत्रात सिंह दिसले. गीरशिवाय पाणिया अभयारण्य, मितियाला अभयारण्य, गिरनार अभयारण्य, बर्डा अभयारण्य येथेही सिंहाचा अधिवास आहे.



**गांधीनगर, २१ मे**

गुजरातमध्ये आशियाई सिंहांच्या संख्येत विक्रमी वाढ नोंदविण्यात आली. मागील पाच वर्षांत सिंहांची संख्या ६७४ वरून ८९१ वर पोहोचली आहे आणि त्यात २१७ ने वाढ झाली. याशिवाय त्यांचे अधिवास क्षेत्रदेखील गीर राष्ट्रीय उद्यानाबाहेर सौराष्ट्र प्रदेशातील ११ जिल्ह्यापर्यंत पोहोचल्याची माहिती नुकत्याच करण्यात आलेल्या प्राणी गणनेतून समोर आली.

राज्याचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, यापूर्वी जून २०२० मध्ये झालेल्या प्राणी गणनेत आशियाई सिंहांची संख्या ६७४ इतकी नोंदविण्यात आली. नवीन गणनेत १९६ नर, ३३० मादी, १४० प्रौढ आणि २२५ शावक सिंह आढळून आले. सिंहांची संख्या वाढत असल्याने त्यांचा अधिवास आता सौराष्ट्र प्रदेशापर्यंत पोहोचला आहे. यापूर्वी मोठे सिंहांचे अधिवास जुनागड आणि अमरेली जिल्ह्यातील गीर राष्ट्रीय उद्यानापुरते मर्यादित होते. परंतु आता त्यांचा अधिवास ११ जिल्ह्यापर्यंत पोहोचला आहे. ज्यामध्ये जंगले तसेच किनारी आणि वनेत्तर क्षेत्रांचा समावेश आहे. गीर राष्ट्रीय उद्यान आणि वन्यजीव अभयारण्यात ३८४ सिंह आढळले तर ५०७ सिंहांचा अधिवास अभयारण्याच्या हद्दीबाहेर होता. गीरच्या बाहेर ज्या भागात सिंह आढळले त्यात पानिया, मिटियाला, गिरनार आणि बर्डासारख्या अभयारण्याचा समावेश आहे. काही वन नसलेल्या भागात आणि किनारी भागात त्यांचा अधिवास आहे.

| प्राणिगणनेतून समोर आलेली आकडेवारी | आढळलेले एकूण सिंह | २०२० मध्ये सिंहांची संख्या | पाच वर्षांत झालेली वाढ | नर सिंहांची संख्या | सिंहिणीची संख्या | प्रौढ सिंहांची संख्या | शावकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ८९१ | ६७४ | २१७ | १९६ | ३३० | १४० | २२५ |

# जैन हिल्सवर १५० जातींच्या आंब्यांचे प्रदर्शन

## समूहाचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते मँगो फिस्टाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

जैन हिल्स परिसरात लागवड केलेल्या आंब्यांपैकी तब्बल १५० जातींच्या आंब्यांचे प्रदर्शन शिरसोली रोडवरील गौराई ग्रामोद्योगच्या भव्य दालनात आंबा प्रदर्शन 'मँगो फिस्टा' चे २१ रोजी जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. कंपनीचे अध्यक्ष अशोक जैन यांनी फित सोडून औपचारिक उद्घाटन केले. याप्रसंगी जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अजित व अतुल जैन, अनुभूती निवासी शाळेच्या संचालिका निशा जैन, शोभना जैन, डॉ. भावना जैन, जैन फार्मफ्रेश फुडस लि.चे संचालक अथांग जैन, अंबिका जैन, अभंग जैन, आत्मन जैन, आंतरराष्ट्रीय पातळीचे आंबातज्ज्ञ डॉ. रामचंद्र गुंजाटे, कृषितीर्थचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे, डॉ. अनिल ढाके, डॉ. बी. के., डॉ. अनिल पाटील, कृषी विभागाचे सहकारी अजय काळे, नितीन पाटील, शंकर गाडेकर यांच्यासह सर्व सहकारी उपस्थित होते.

हे 'मँगो फिस्टा' प्रदर्शन २२ मे रोजी सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले आहे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीच्या शेती संशोधन विकास प्रात्यक्षिक केंद्रातर्फे आंब्यावरील सुरू असलेले संशोधन कार्य अधोरेखित करणाऱ्या ह्या प्रदर्शनात भारतासह विदेशातील १५० हून अधिक नामांकित प्रजातीच्या आंब्याच्या जाती आहेत. जैन इरिगेशनद्वारा विकसित केल्या जाणाऱ्या टिश्यूकल्चरच्या प्रजाती, जैन संकरित (हायब्रीड) आंब्याच्या ३४ प्रजाती आणि थायलँड, मेस्किको, युरोप, युएसए, ऑस्ट्रेलिया, इस्राईल या विदेशी आंब्यांच्या वेगवेगळ्या जातींचे आंबे पाहण्याची संधी प्राप्त करून देण्यात आली आहे. 'मँगो फिस्टा' सह प्रदर्शनास अवश्य भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



**प्रदर्शनातील क्षणचित्रे -**

महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरात पहिल्यांदाच असे प्रदर्शन, दुर्मीळ व चविष्ट आंब्यांच्या अनेकोत्तम व्हरायटी एकाच छताखाली बघण्याची सुवर्ण संधी, जैन इरिगेशनने संशोधीत व विकसित केलेल्या टिश्युकल्चर आंब्यांचाही समावेश यात आहे. प्रदर्शनास जळगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र त्रिचीच्या संशोधन समितीवर

## जैन इरिगेशनचे केळीतज्ज्ञ डॉ. के.बी. पाटील

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**



जैन इरिगेशनचे आंतरराष्ट्रीय केळीतज्ज्ञ व उपाध्यक्ष डॉ. के. बी. पाटील यांची राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र त्रिचीच्या (तिरुचिरापल्ली) संशोधन सल्लागार समितीवर नुकतीच निवड करण्यात आली. ही निवड पुढील तीन वर्षांसाठी असणार आहे. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा केळीच्या संशोधनाला दिशा देण्यासाठी होणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन व सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांनी अभिनंदन केले.

डॉ. के. बी. पाटील हे गेल्या तीस वर्षांपासून केळी पिकाच्या विकासासाठी कार्यरत आहेत. केळी उत्पादन तंत्रज्ञानावर अनेक प्रकारचे संशोधन करून जैन टिश्यूकल्चरच्या माध्यमातून केळी पिकात क्रांती केली आहे. केळीची काढणीपूर्व व काढणी पश्चात हाताळणी आणि निर्यात यासाठी तीस वर्षे काम करून त्यांनी केळीची निर्यात वाढविली. केळीसाठी गादी वाफा, मल्चिंग, फॉस्फोरीक ॲसिडचा वापर, वर्षभर केळीसाठी फर्टिगेशनचे तंत्रज्ञान केळीसाठी २०० ग्रॅम नत्र, ७० ग्रॅम स्फुरद व ४०० ग्रॅम पालाश प्रती झाड, फ्रुट केअर पद्धती असे अनेक तंत्रज्ञान देशात त्यांनी प्रथमच विकसित केले. जैन टिश्यूकल्चर ग्रॅडनैन या विदेशी जातीला संपूर्ण देशात लोकप्रिय करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. जगातील सर्व प्रमुख केळी उत्पादक देशांना त्यांनी भेटी दिलेल्या असून त्यांचा सखोल अभ्यास झालेला आहे. केळीबाबतचे अत्याधुनिक तंत्रज्ञान त्यांनी तळागळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविले. केळी पिकाचा प्रचंड अभ्यास व अनुभव अधोरेखीत करत भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांनी डॉ. के. बी. पाटील यांची संशोधन सल्लागार समितीवर निवड केली आहे.




## थोडक्यात महत्त्वाचे...

### पाळधीत आज भीमगीतांसह पालकमंत्र्यांचा नागरी सत्कार




**जळगाव** : पाळधी (ता. धरणगाव) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त गुरुवारी (२२ मे) सायंकाळी साडेसातला गायिका कडूताई खरात यांच्या भीम गीतांच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमासह शिवसेना नेते, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा आंबेडकरी समाजातर्फे नागरी सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रम पाळधी येथील पोलीस ठाणे परिसरातील गांधी चौकात होणार असून, कार्यक्रमाला आंबेडकरी समाजाचे व शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना मागासवर्गीय सेनेचे जिल्हाप्रमुख मुकुंदराव नन्नवरे, मोहन शिंदे, जगदीश सपकाळे, प्रणय नन्नवरे, कृष्णा नन्नवरे, दिनकर अडकमोल, चंदन बिऱ्हाडे आदींनी केले आहे.

### देवाच्या कार्यक्रमासाठी आलेल्या मामा-भाच्याचा तापी नदीत बुडून करुण अंत

**भुसावळ** : शहरात तापी नदीवर अंघोळीसाठी आलेल्या जालना येथील रहिवासी दोन जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मयत दोन्ही मामे-भाचे आहेत. ही घटना बुधवारी (२१ मे) उघडकीला आली. रामराजे नंदलाल नाटेकर (वय- ५५) व आर्यन नितीन काळे (वय- २१) अशी मयत झालेल्या मामा-भाचे यांची नावे आहे. या संदर्भात अधिक माहिती अशी की, भुसावळ शहरातील मामाजी टॉकीज जवळील पेंढारवाडा येथे संदीप हरिश्चंद्र रणधीर यांच्या घरी देवाच्या कार्यक्रमासाठी मामा रामराजे नंदलाल नाटेकर आणि भाचा आर्यन गाडे हे आलेले होते. हे दोन्ही व इतर दोन-तीन व्यक्ती बुधवारी (२१ मे) सकाळी शहरातील नदीपात्रात अंघोळीसाठी गेले होते. अंघोळ करत असताना त्यांचा अचानक पाय घसरला आणि ते दोघेही पाण्यात बुडाले. दरम्यान या घटनेची माहिती मिळाल्यानंतर परिसरातील नागरिकांनी धाव घेऊन दोघांना पाण्याबाहेर काढले आणि भुसावळ येथील ट्रामा केअर सेंटर येथे दाखल केले. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमन चौधरी यांनी तपासणीअंती दोघांना मयत घोषित केले. या घटनेबाबत शहर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## निधन वार्ता



### ग्रामसेवक राजू तडवी

**यावल** : येथील यावल पंचायत समिती अंतर्गत तालुक्यातील बोराळे मालोद येथील ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले राजू अनवर तडवी यांचे २० मे रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते गेल्या दशकापासून ग्रामसेवक अधिकारी म्हणून कार्यरत होते. यावल पंचायत समितीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शोक व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण केली. २१ रोजी सकाळी नऊ वाजता त्यांच्यावर सावदा येथील कब्रस्थानमध्ये दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.



### पंकज कांबळे

**यावल** : येथील वाणी गल्लीतील रहिवासी, ह. मु. जळगाव व धुळे येथील महावितरण कंपनीचे वरिष्ठ अभियंता पंकज विकास कांबळे (४३) यांचे १७ मे रोजी दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने धुळे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, मुलगी व मुलगा असा परिवार आहे. ते यावल येथील तारकेश्वर महादेव मंदिराचे पुजारी विकास कांबळे (गुरव) यांचे पुत्र होत.



### इंदुबाई मोरे; आज अंत्ययात्रा

**यावल** : तालुक्यातील बोरावल खुर्द येथील रहिवासी इंदुबाई मोरे (वय ७६) यांचे बुधवारी (२१ मे) दुपारी ३ वाजता भुसावळ येथे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी (२२ मे) सकाळी ९.३० वाजता बोरावल खुर्द येथून राहत्या घरून निघेल. त्या महेश भावरत मोरे व अरुण भावरत मोरे यांची आई होत.



### जगन्नाथ पाटील; आज अंत्ययात्रा

**यावल** : तालुक्यातील चिंचोली येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ माणिक पाटील (वय ८७) यांचे बुधवारी (२१ मे) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी (२२ मे) सकाळी १० वाजता चिंचोली येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते आध्यात्मिक क्षेत्रातील ह.भ.प. प्रेमराज पाटील (बाळू महाराज) व हरिश्चंद्र पाटील यांचे वडील होत.



### मधुकर भावसार; आज अंत्ययात्रा

**नशिराबाद, ता. जळगाव** : येथील श्रीराम पेठेमधील रहिवासी मधुकर जंगलू भावसार (आंगळे) (वय ८४) यांचे बुधवारी (२१ मे) सायंकाळी साडेसहाला अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी (२२ मे) सकाळी ११.३० वाजता नशिराबाद येथील श्रीराम पेठेतील राहत्या घरून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना-जावई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. ते पत्रकार सुनील भावसार व नितीन भावसार यांचे वडील होत.

# शहाद्यातील दाम्पत्यासह नाशिकच्या १० जणांची तीन कोटींत फसवणूक

## पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल



**नंदुरबार** : नाशिक येथील ग्रेप काऊंटी रिसॉर्ट व ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट या कंपनीच्या नावाने व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीने कंपनीत गुंतवणूक केल्यास जास्तीचा परतावा मिळेल, असे आमिष दाखवून शहाद्यातील दाम्पत्यासह नाशिकच्या दहा जणांची तीन कोटी रुपयांत फसवणूक केली आहे. याप्रकरणी नाशिकच्या एकाविरुद्ध शहादा येथील पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भूपेंद्र साबळे पाटील (रा.खुंटवडनगर, नाशिक) याने नाशिक येथे ग्रेप काऊंटी रिसॉर्ट व ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट या नावाने कंपनी स्थापन करून गुंतवणुकीचा व्यवसाय सुरू केला. नोव्हेंबर २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान भूपेंद्र पाटील याने साक्षी जगदीश मानकर (वय २५, रा. मदनमोहन नगर, साईबाबा मंदिराजवळ, शहादा) व त्यांचे पती यांच्याकडून ग्रेप काऊंटी रिसॉर्ट व ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट कंपनीत आठ लाख रुपये व त्यांचे जवळचे नातेवाईक डॉ. दिनेश रामचंद्र महाजन, रामचंद्र गणपत महाजन, जिजाबाई रामचंद्र महाजन, नम्रता दिनेश महाजन, प्रतिभा राजेंद्र पाटील, कल्पना सोपान सोनवणे, रवींद्र नामदेव घरटे, कमल रवींद्र घरटे, ऊर्मिला तुकाराम कणे, रोहन सोनार (सर्व रा. नाशिक) यांच्याकडून सुमारे तीन कोटींपेक्षा अधिक रक्कम घेतली. ही रक्कम शेअर बाजारात गुंतवून अधिकचा परतावा मिळेल, असे आमिष दाखविले. मात्र, संबंधित लोकांना अधिकचा परतावा तर मिळाला नाही; परंतु त्यांना गुंतवणूक केलेले पैसेदेखील परत मिळाले नाहीत. म्हणून त्यांची फसवणूक झाली आहे. याबाबत ज्योती मानकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ग्रेप काऊंटी रिसॉर्ट व ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट कंपनी या नावाने व्यवसाय करणारा भूपेंद्र साबळे पाटील याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील तपास करीत आहेत.

# विफा मुलामुलींच्या राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेला थाटात प्रारंभ

## तांडेच्या मुकेश पटेल सीबीएसई निवासी स्कूलच्या मैदानावर सामने चुरशीत

**शिरपूर** : श्री विलेपार्ले केळवणी मंडळ (मुंबई) आणि द वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्यातर्फे तांडे (ता. शिरपूर) येथील मुकेश पटेल सीबीएसई निवासी स्कूलच्या मैदानावर 'विफा सब-ज्युनिअर बॉइज अँड गर्ल्स स्टेट फुटबॉल चॅम्पियनशिप-२०२५' स्पर्धेस शानदार सुरुवात झाली.

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ व्यवस्थापन समितीचे सदस्य राजगोपाल भंडारी, विजय अग्रवाल, यशवंत बाविस्कर यांच्या हस्ते श्री गणेश मूर्ती, सरस्वती माता मूर्ती व माजी खासदार (स्व.) मुकेशभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन बलून आकाशात सोडून स्पर्धे चे उद्घाटन करण्यात आले. या वेळी राष्ट्रीय फुटबॉलपटू दीपक पाटील, विफा मॅच कमिशनर ललिता सावंत, राजेंद्र सावंत, गुरुप्रसाद राणे, श्रुती लक्ष्मी, दीपाक्षी हवाले, एआरपी सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या स्मिता उगले, एसव्हीकेएम संस्थेचे क्रीडा संचालक किरण अंचन, साहाय्यक क्रीडा संचालक डॉ. आशिष शुक्ला आदींची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धा १९ ते ३० मेदरम्यान होत आहेत. स्पर्धेतील सामने चुरशीत होत आहेत. स्पर्धेत महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांमधून मुलींचे २२, तर मुलांचे ३३ संघ सहभागी आहेत. मुलींचे सामने २४ मेपर्यंत, तर मुलांचे सामने २५ ते ३० मेपर्यंत होतील. या वेळी महाराष्ट्रातून फुटबॉल संघांसह त्यांचे अधिकारी, प्रशिक्षक आदी सहभागी आहेत. संस्थेचे क्रीडा संचालक किरण अंचन यांनी प्रास्ताविकात विफा फुटबॉल स्पर्धेबाबत माहिती देऊन श्री विलेपार्ले केळवाणी मंडळामार्फत दरवर्षी सातत्याने विविध क्रीडा स्पर्धा राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येत असल्याचे सांगितले. साहाय्यक क्रीडा संचालक डॉ. आशिष शुक्ला यांनी आभार मानले. श्री विलेपार्ले केळवणी मंडळ संस्थेचे अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, संस्थेचे सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनात राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा घेण्यात येत आहेत.

# संत मुक्ताई समाधी सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदेंतर्फे महावस्त्र अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, २१ मे**

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेत अत्युच्च स्थान असलेल्या संतांची लाडकी बहीण, आदिशक्ती संत मुक्ताई यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली अपार श्रद्धा व्यक्त करत, संत मुक्ताई चरणी महावस्त्र व पूजा साहित्य अर्पण केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावतीने हे महावस्त्र व पूजेसाठी आवश्यक साहित्य शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प. अक्षय महाराज भोसले यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आले. मुक्ताई यांच्या तेजोविलीन दिनानिमित्त आयोजित समाधी महोत्सवात हे महावस्त्र व पूजावस्तू अर्पण करून राज्य शासनाच्या व शिवसेनेच्या वतीने मुक्ताई मातेप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित भाविकांच्या मनात भक्तिभाव जागृत झाला. संत परंपरेच्या सश्रद्ध जोपासनेत शासनाची भूमिका महत्त्वाची असून, उपमुख्यमंत्र्यांनी



केलेल्या या अर्पणामुळे वारकरी संप्रदायात समाधान आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. संत मुक्ताई ही केवळ नामजप करणारी संत नव्हे, तर ती ज्ञान, भक्ती आणि कर्तृत्व यांची त्रिवेणी संगम होती. तिच्या स्मरणानेच वारकरी भाविकांचे मन शुद्ध होते. या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी तिच्या चरणी अर्पण केलेले महावस्त्र हे एक प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कृतज्ञतेचे प्रतीक मानले जात आहे. या अर्पण सोहळ्यानिमित्त अनेक मान्यवर, वारकरी संप्रदायातील संत मंडळी, भाविक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाधीस्थळी भक्तिमय वातावरणात पूजा, अभिषेक आणि हरिपाठाचे आयोजन करण्यात आले होते.



# बॅटऱ्या चोरणाऱ्या दोघांच्या अकोल्यातून आवळल्या मुसक्या

## एमआयडीसी पोलिसांची कामगिरी; सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**जळगाव** : शहरात बॅटरी चोरीचे प्रकार वाढले असताना, एमआयडीसी पोलिसांनी २४ तासांच्या आत एका चोरीचा छडा लावला आहे. अजिंठा चौफुली येथील चौधरी बॅटरी ट्रेडिंग या दुकानातून ४१ जुन्या बॅटऱ्या चोरून नेणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी तेल्हारा, जिल्हा अकोला येथून अटक केली असून, त्यांच्याकडून ६ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१७ मे रोजी रात्री ८ ते १८ मे रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान, अब्दुल्ला किताबुल्ला चौधरी यांच्या मालकीच्या दुकानाचे शटर वाकवून अज्ञात चोरट्यांनी ४१ हजार रुपये किमतीच्या ४१ जुन्या बॅटऱ्या चोरल्या होत्या. याबाबत १९ मे रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावित यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी संदीप पाटील यांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. डीबी पथकाने घटनास्थळावरील आणि आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली. चोरट्यांनी पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअप वाहन वापरल्याचे निष्पन्न झाले. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी तेल्हारा, अकोला येथे जाऊन अजमदउल्ला अमानतउल्ला खान (वय २४) आणि सैय्यद दानिश सैय्यद ईसमाईल (वय २५) या दोन आरोपींना २० मे रोजी अटक केली.

# दोन लाखांचे मोबाइल लांबविणारा अल्पवयीन मुलगा ताब्यात

### अवघ्या २४ तासात एमआयडीसी पोलिसांनी लावला छडा

**जळगाव** : एमआयडीसी पोलिसांनी एका घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत दोन लाख रुपये किमतीचे तीन आयफोन आणि वन प्लस मोबाइल हस्तगत केले. या प्रकरणी एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे.

नशेमन कॉलनी, के.जी.एन. डेअरीजवळ राहणारे तन्वीर मजहर पटेल यांच्या घरात १८ मे रोजी पहाटे २ ते ३ वाजेच्या सुमारास चोरी झाली होती. अज्ञात चोरट्याने घराचा बंद दरवाजा उघडून घरात प्रवेश करत दोन ॲपल कंपनीचे आयफोन आणि एक वन प्लस कंपनीचा मोबाइल असे एकूण दोन लाख रुपये किमतीचे फोन चोरून नेले होते. तन्वीर पटेल यांच्या फिर्यादीनुसार, एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने घटनास्थळाजवळील नागरिकांची चौकशी केली, गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेतली आणि सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली. तेव्हा त्यांना गुन्ह्याच्या वेळी फिर्यादीच्या घराजवळ एक अल्पवयीन मुलगा फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे तपास पथकाने शहरातील वेगवेगळ्या परिसरात शोध घेऊन त्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. त्याला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेले दोन ॲपल कंपनीचे आयफोन आणि एक वन प्लस कंपनीचा मोबाईल असे दोन लाख रुपये किमतीचे सर्व मोबाइल फोन २४ तासांच्या आत हस्तगत करत गुन्हा उघडकीस आणला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रामकृष्ण पाटील हे करीत आहेत.

**Change In Name**

I HAVE CHANDED MY NAME FROM "JAYKUMAR HITENDRA PATEL (OLD NAME)" TO "JAIKUMAR HITENDRA PATEL NEW NAME"

# सुलवाडे-जामफळ उपसा योजनेच्या माध्यमातून २३ गावे होणार सिंचित

## आमदार भदाणे यांच्याकडून मुख्यमंत्री, पालकमंत्र्यांचे आभार



**धुळे** : शिंदखेडा तालुक्यातील सुलवाडे-जामफळ उपसा सिंचन योजनेच्या ५,३२९ कोटींच्या रकमेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यासह तालुक्यातील २३ गावांना फायदा होणार आहे. धुळे ग्रामीणचे आमदार राघवेंद्र भदाणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, जलसंपदामंत्री गिरीश महाजन व पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांचे आभार मानले.

हा मुख्यतः सिंचन प्रकल्प असून, अवर्षणप्रवण व दुष्काळी भागातील शेतजमिनी सिंचनाखाली येऊन शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. योजनेस ५,३२९.४६ कोटी किमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. यामुळे प्रकल्पासाठी पुढे निधीची अडचण दूर होणार असून, वेळेत शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी मदत होणार आहे.

धुळे तालुक्यात विविध विकासकामे मार्गी लागत आहेत. रस्ते, सिंचन यावर अधिक भर दिला जात आहे. यामध्ये पालकमंत्री जयकुमार रावल यांनी सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून धुळे तालुक्यातील २३ गावांना संजीवनी प्राप्त करून दिली आहे, असे आमदार भदाणे यांनी म्हटले आहे.

# पैशांच्या वादातून एकास मारहाण

**जळगाव** : पैशांच्या वादातून अकबर सत्तार कुरेशी (वय ४२, रा. हरिविठ्ठल नगर) याला दोघांनी शिवीगाळ करीत मारहाण केली. ही घटना सोमवारी (१९ मे) हरिविठ्ठल नगरात घडली. याप्रकरणी दखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. शहरातील हरिविठ्ठल नगरातील जुना बाजारपट्टा परिसरात अकबर कुरेशी हे वास्तव्यास आहे. पैशांच्या देवाण-घेवाणीच्या कारणावरुन १९ रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास दोघा अज्ञात इसमांनी त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच जीवे ठार मारण्याचीदेखील धमकी दिली. दरम्यान, कुरेशी यांनी रामानंद नगर पोलिसात तक्रार दिली असून त्यानुसार अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास पो.हे. कॉ. जितेंद्र राठोड करीत आहेत.

कार्यालयाचा पत्ता- जा.क्र./जे १/१५९०/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगाव विभाग जळगाव
युनिटी चेंबर्स, शुभम प्रोव्हीजनचे वर,
१ ला मजला, गणेश कॉलनी जवळ जळगाव
दि. १४/०५/२०२५

**चौकशी जाहीर नोटीस**

**न्यास अहवाल अर्ज क्र. ९/२०२५**
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र.** - श्री. चंद्रनाथ स्वामीजी संस्थान जैन मंदिर, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगाव अ/३०२/जळगाव
**अर्जदार-** श्री. नितीन कांतीलाल गांधी, रा. कस्तुरबा रोड, बागवान गल्ली, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगाव
सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मा. धर्मादाय उपायुक्त, जळगाव विभाग जळगाव वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल/अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५०अ (३) अन्वये खलील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
वरील अर्जदाराने सदर न्यासासाठी कलम ५०अ (३) अन्वये योजना अर्ज दाखल केलेला आहे.
**संस्थेची जुनी घटना** - योजना अर्ज
**संस्थेची नवीन घटना** - योजना अर्ज
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर अगर पुरावा असेल त्यांनी त्यांची कैफियत हि नोटीस प्रसिद्ध तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
हि नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, जळगाव, विभाग जळगाव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ८/०५/२०२५ रोजी दिली.
शिक्का
सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
(श्री.शक्तीकुमार रा. पाटील)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगांव,

**Public notice**

All the public, Nationalized Banks, Co-operative Banks, Private Banks, Financial Institutions, Credit Institutions are hereby notified that,

NOTICE is hereby given that the Share Certificate bearing Folio No. U-0000571, for 100 Ordinary Shares, certificate no 0245467 bearing Distinctive Nos. 09565444 to 09565493, standing in the name of Smt. Usha Dinkar Chikhalkar, residing at Plot No. 09, Bhadgaon Road, State Bank Colony, Pachora 424201, District Jalgaon, has been reported lost/misplaced and that an application for issuance of a Duplicate Share Certificate has been made to the company.

Any person who has any objection to the issuance of the Duplicate Share Certificate should inform the company at its registered address within 15 days from the date of this notice. If no objection is received within the stipulated time, the company will proceed to issue the duplicate certificate.

The above-mentioned share certificate is not mortgaged or held as security for any loan.

Pachora
Dt. 21/05/2025
STAMP
Sd-
ADV. SACHIN P. DESHPANDE
Plot No. 12, Sant Gadgebaba Nagar, Pachora, Tal. Pachora, Dist. Jalgaon,
Mob.9890942600

थेंब थेंब वाचवा भरपूर पिकवा

ठिबक सिंचन संच
पूर्णतः आधुनिक व वाजवी दरात उपलब्ध.
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी पी.एम.उद्योग, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com



## महत्त्वाचे



### 'नूतन मराठा'चा 'सोयो'शी विद्यार्थ्यांसाठी सामंजस्य करार

**जळगाव** : पदव्युत्तर- पदवीच्या अभ्यासक्रमात भौतिकशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना लवकर नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, संशोधनास वाव मिळावा यासाठी जिल्हा मराठा विद्याप्रसारक संस्थेच्या नूतन मराठा महाविद्यालय आणि सौरऊर्जेच्या संबंधित सोयो सिस्टिम कंपनी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी सोयो सिस्टिमचे संचालक किशोर ढाके, नूतन मराठा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील, प्रा. आर .बी. देशमुख उपस्थित होते. या करारांतर्गत भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी ॲप्रेंटिसशिपची व्यवस्था करण्यात येणार आहे, तसेच विद्यार्थ्यांना सौरऊर्जा व संबंधित अन्य उत्पादनांसंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती मिळणार आहे. यासोबतच ऑन जॉब ट्रेनिंगदेखील करता येणार असल्याचे किशोर ढाके यांनी सांगितले. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच कौशल्य विकासात वाढ होईल, यासाठी कंपनीचे व्यवस्थापक प्रशांत सरोदे हे ऑनजॉब प्रशिक्षण देणार आहेत.




### डॉ. नारळीकरांच्या कार्यास पवन ट्रस्टतर्फे श्रद्धांजली

**जळगाव** : डॉ. जयंत नारळीकर हे विज्ञानाचे पुरस्कर्ते, प्रसारक असून, ते एक महान खगोलशास्त्रज्ञ आणि वैज्ञानिकच नव्हे; तर विज्ञानाच्या प्रसारासाठी झटणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. अनेक पुस्तके, व्याख्याने, सिद्धांत त्यांनी मांडले. अवकाशाशी त्यांनी कायमचे नाते जोडले असल्याचे मत पवन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विलास नारखेडे यांनी व्यक्त केले. श्रद्धांजलीपर कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांच्या सिद्धांतांनी नवीन विचारांची दिशा मिळवून देऊन खगोलशास्त्रात क्रांती घडून आली. त्यांच्या नावे विज्ञान व खगोलशास्त्रात कार्यरत असलेल्या विविध व्यक्तींना शासनाने पुरस्कार द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. त्यांचे जळगावसोबत दृढ नातेसंबंध असून, एक महान वैज्ञानिक विज्ञानप्रेमींच्या स्मरणात राहतील, असेही ते म्हणाले. या वेळी रघुनाथ राणे, रामभाऊ महाजन, नामदेव निकम, संतोष सोनार, महेंद्र पाटील उपस्थित होते.

### मुक्ताई तिरोभूत सोहळा; शहरात आज कीर्तन

**जळगाव** : श्री संत मुक्ताबाईंचा ७२८ वा तिरोभूत सोहळा गुरुवारी (२२ मे) सकाळी नऊला मेहरूणमधील श्री संत मुक्ताबाई पादुका मंदिरात होणार आहे. श्रीधर महाराज जळगावकर यांचे कीर्तन होईल. श्रीराम मंदिरात वैकुंठवासी पुष्पाईंच्या चतुर्थ मासिक पुण्यतिथीनिमित्त सायंकाळी सहाला संस्कृती पवनीकर यांचे कीर्तन होईल. हार्मोनियमवर स्वरा पाठक, तबल्यावर श्रीधर जोशी साथसंगत करतील. बालकलाकार कार्तिकी पाठक, अनुजा कुळकर्णी, भक्ती कुळकर्णी साथसंगत करतील.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# पावसाळा तोंडावर, शहरातील नालेसफाई होणार कधी?

## अवकाळी वादळी पावसामुळे नाले, गटारी तुंबल्या; जळगावकरांमधून महापालिकेवर नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

शहरात पावसाळ्याची चाहूल लागली असतानाच नालेसफाईचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मागील काही आठवड्यांपासून शहरात झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक भागांमधील नाले आणि गटारी तुंबल्या आहेत. त्यामुळे नागरिकांत प्रचंड नाराजी असून, अनारोग्याची समस्या निर्माण होण्यापूर्वी महापालिकेने तातडीने नालेसफाईला सुरुवात करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

पावसाळ्यापूर्वी नालेसफाई करून जलनिचरा व्यवस्थेला सुसज्ज ठेवणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असते. मात्र,



दरवर्षीप्रमाणे यंदाही नालेसफाईच्या कामांमध्ये दिरंगाई होताना दिसत आहे. एप्रिल-मे महिन्यांत हे काम पूर्ण होणे अपेक्षित असतानाच, मे महिना संपत आला तरी अनेक भागांतील नाले अजूनही साफ करण्यात आलेले नाहीत. यामुळे नागरिकांच्या मनात महापालिकेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**नागरिकांमधून नाराजीचा सूर**

शहरातील अनेक झोपडपट्टी आणि दाट लोकवस्ती असलेल्या भागांमध्ये तर नालेसफाईकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले आहे. अशा भागांमध्ये पावसाचे पाणी घरात शिरण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे नागरिकांच्या नाराजीला पर्याय उरलेला नाही. अनेकांनी सोशल मीडियावर यासंदर्भात तक्रारी नोंदवून महापालिकेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

येत्या काही दिवसांत मॉन्सूनचे प्रत्यक्ष आगमन होणार आहे. तसेच यंदा पर्जन्यमान अधिक सांगण्यात आले आहे. त्यामुळे शहरात पूरस्थिती उद्भवण्याचा धोका टाळण्यासाठी महापालिकेने तातडीने कृती आराखडा तयार करून अमलात आणावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. मनपा प्रशासनाने योग्य ती पावले उचलली, तरच संभाव्य संकट टाळता येईल.

### अनेक भागात दूषित पाण्याचा सडा

अनेक भागांमध्ये कचरा, गाळ, प्लास्टिक आणि सांडपाण्यामुळे नाले पूर्णपणे बुजलेले आहेत. अवकाळी पावसामुळे या नाल्यांमधील साचलेले पाणी उफाळून रस्त्यांवर आले असून, त्यामुळे दूषित पाण्याचा सडा रस्त्यावर पसरला आहे. परिणामी आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. डासांची उत्पत्ती वाढून साथीचे आजार पसरण्याचा संभव आहे.

### जूनपूर्वी होणार नालेसफाई

दरम्यान, लवकरच सर्व प्रभागांमध्ये नालेसफाईची मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या सूत्रांनी दिली. काही ठिकाणी काम सुरू असून, उर्वरित ठिकाणी लवकरच सुरुवात होईल. मात्र, नागरिकांचा रोष लक्षात घेता ही आश्वासने कितपत खरी ठरणार, याबाबत शंका निर्माण झाली आहे.





# अन् अहोरात्र सेवेमुळे वीज यंत्रणा पूर्ववत!

## 'महावितरण'चा दावा; अडीच हजार वीजखांब, ६५ रोहित्रांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

'महावितरण'च्या जळगाव परिमंडळातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यात मे महिन्यात गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून अवकाळी वादळी पावसाने थैमान घातले आहे. या नैसर्गिक आपत्तीत परिमंडळातील उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्यांवरील सुमारे दोन हजार ६६६ खांब जमीनदोस्त झाले, तर ६५ ठिकाणी रोहित्र सांगाडे कोसळल्याने वीज यंत्रणेचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे, तसेच बहुतांश ठिकाणी वीजवाहिन्यांवर झाडे उन्मळून पडून पुरवठा खंडित झाला होता.

या आपत्तीकाळात वीज यंत्रणेतील जनमित्र, अभियंते, दुरुस्ती व देखभालीसाठी नेमलेल्या कंत्राटदार एजन्सींच्या कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्वक सतर्कतेने बहुतांश प्रमाणात नादुरुस्त झालेली वीज यंत्रणा पूर्ववत करण्यात यश मिळविले असल्याचे जळगाव महावितरण प्रशासनाने म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मॉन्सूनपूर्व कामे केली जात आहेत. यात विनाअडथळा अखंडित व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी वाकलेले खांब व लोंबणाऱ्या वीजवाहिन्यांची दुरुस्ती, स्पेसर्स बसविणे, वीजवाहिन्यांना अडथळा असलेल्या झाडांच्या फांद्या छाटणे आदी कामे करण्यात येत आहेत. वादळी पावसामुळे वीज यंत्रणेवर अधिकचा ताण आला असून, वीज यंत्रणा प्रभावित झाली आहे. असे असले तरी महावितरण कर्मचाऱ्यांनी नादुरुस्त यंत्रणा पूर्ववत करण्यात यश मिळविले आहे.

शहर आणि ग्रामीण भागातील गावठाण व त्यानंतर कृषिप्रवण भागात प्राधान्यक्रमाने यंत्रणा दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, परिमंडळात सुमारे ६५ ठिकाणी वीज वितरण रोहित्रांचे सांगाडे कोसळून रोहित्र नादुरुस्त झाले होते. वीजवाहिन्यांवर पडलेले वृक्ष बाजूला करण्यासाठी क्रेनचा वापर करण्यात आला.

प्रभावित असलेली सुमारे ४२ वीज उपकेंद्रे तत्काळ दुरुस्त करण्यात आली. लघुदाब-उच्चदाब वाहिन्या, विस्कळीत झालेली वीज यंत्रणा पूर्ववत करण्यासाठी रात्रीच्या वेळी बॅटऱ्यांच्या माध्यमातून काम पूर्ण करीत वीज अपघात होणार नाहीत यासह दुरुस्ती मोहिमेद्वारे वीज यंत्रणा पूर्ववत करण्यात आली आहे.

> प्रतिकूल काळात ग्राहकांनी वीज तक्रारी असल्यास प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी डीएसएस कंट्रोल रूममध्ये संपर्क साधावा. यात जळगाव जिल्ह्यासाठी ७७९८१२०१५५, धुळे ७८७५७६६७६३ व नंदुरबार ७८७५५५४५४३ या क्रमांकावर डीएसएस कंट्रोल रूमशी जिल्ह्यातील ग्राहकांनी संपर्क साधावा. याशिवाय १९१२, १८००२३३४३५ व १८००१०२३४३२ या टोल फ्री क्रमांकांवरही संपर्क साधता येणार आहे. प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी संपर्क केल्याने त्यांच्या कामात अडथळे येऊन प्रसंगी त्यांच्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. दिलेल्या क्रमांकांवरच नागरिकांनी तक्रारी नोंदवाव्यात.
>
> **- डॉ. मोहन दिवटे, जनसंपर्क अधिकारी, महावितरण परिमंडळ, जळगाव.**

# बोदवड तालुक्यात सर्वाधिक २७ मि.मी. 'बेमोसमी'

## जिल्ह्यात सरासरी ४५ मिलिमीटर पावसाची नोंद; 'यलो अलर्ट'चा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

जिल्ह्याचे मॉन्सूनमधील सरासरी पर्जन्यमान ६६३.३०, तर वार्षिक पर्जन्यमान जून ते मेदरम्यान ७१९.७ मिलिमीटर हवामान विभागाच्या अंदाजानुसार आहे. तसेच मे महिन्यात ५.९ मिलिमीटर पर्जन्याचा अंदाज आहे. मात्र, प्रत्यक्षात मे महिन्यात ४५ मिलिमीटरच्या नोंदीसह बेमोसमी पाऊस झाला आहे, तर दुसरीकडे आतापर्यंत जिल्ह्याच्या वार्षिक सरासरी ७१९.७० ऐवजी ७७५.९ मिलिमीटर पर्जन्यमानाची नोंद झाली असल्याचे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे. त्यातही मेमध्ये बोदवड तालुक्यात सर्वाधिक २७ मिलिमीटर बेमोसमी पावसाची नोंद झाली आहे.



गेल्या वर्षी मे महिन्यात उष्णतेच्या उच्चांकाची ४८.७ अंश इतकी नोंद झाली होती. परंतु बेमोसमीऐवजी मॉन्सूनपूर्व पावसाने मेअखेरीस हजेरी लावली होती. यावर्षी जानेवारीपासूनच उष्णतेत वाढ होऊन तापमान ४५ ते ४६ अंशापर्यंत पोहोचले होते. परंतु मेच्या सुरुवातीपासूनच ढगाळ वातावरणासह बेमोसमी पावसामुळे रब्बी पिकांचे तसेच वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला असून, पशुधनहानीही झाली आहे.

### उत्तर महाराष्ट्रात 'यलो अलर्ट'

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून बेमोसमी तसेच मॉन्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. यात गेल्या २४ तासात सर्वांत जास्त २७ मिलिमीटर पावसाची नोंद बोदवड तालुक्यात झाली आहे. आगामी दोन ते तीन दिवसांसाठी नाशिक विभागांतर्गत जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट'चा इशारा देण्यात आला आहे.

| तालुका | सोमवार २०.०५ | मंगळवार २१.०५ | एकूण मि.मी | एकूण वार्षिक |
|---|---|---|---|---|
| चोपडा | ०० | ०० | २६.८ | ६५८.२ |
| यावल | ०.२ | ०.०० | ९.०० | १३६.४ |
| रावेर | १.६ | ०.०० | १२.३ | २२७.८ |
| बोदवड | ०.८ | २७.० | ६५.२ | १०३४.९ |
| भुसावळ | ०.० | ९.४ | ६५.८ | १४६२.२ |
| जळगाव | २.१ | १.१ | २४.८ | ३४४.४ |
| पारोळा | ०.० | १०.९ | ११.६ | १७६१.५ |
| अमळनेर | ०.० | २.५ | ५२.७ | १७५६.७ |
| धरणगाव | १.६ | १.१ | ५९.९ | ५९९.० |
| एरंडोल | १.८ | १५.७ | ९१.६ | १७६१.५ |
| चाळीसगाव | १.४ | १९.२ | ६३.८ | ७५०.६ |
| भडगाव | ४.९ | १०.५ | ७३.१ | १५८९.१ |
| पाचोरा | ३.९ | ८.१ | ४७.० | ९२१.६ |
| जामनेर | ३.५ | ८.१ | ४७.० | ९२१.६ |
| मुक्ताईनगर | ०.२ | ०.२ | ११.५ | १७९.७ |
| एकूण | १.५ | ५.९ | ४५.० | ७७५.९ |

# यंत्रणांनी सतर्कतेसह समन्वयाने कार्य करावे

## मॉन्सूनपूर्व आढावा बैठकीत जिल्हाधिकारी प्रसाद यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

आगामी पावसाळ्यात नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणांनी सज्ज राहावे. कोणतीही दुर्घटना होणार नाही, याची दक्षता घेत नागरिकांना जेथे आवश्यक असेल तेथे तत्काळ मदत मिळेल या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आयुष प्रसाद यांनी दिल्या.

नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात मॉन्सूनपूर्व तयारी आढावा बैठक झाली. या वेळी अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभ क्षेत्र प्राधिकरणाचे गणेश भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे नरवीर रावळ, महापालिकेचे उपायुक्त गणेश चाटे, पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता अदिती कुलकर्णी, शहर अभियंता मनीष अमृतकर, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे साहाय्यक नासिदूल इस्लाम आदी उपस्थित होते.



### अनधिकृत होर्डिंग्स, बॅनर्स तत्काळ हटवा

पावसाळ्यात वादळ-वाऱ्यांमुळे होणारी दुर्घटना अथवा अपघात टाळण्यासाठी जिल्ह्यातील अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर्स तत्काळ हटविण्याची कार्यवाही करावी. पालिका प्रशासनांनी सर्वेक्षण करून अहवाल सादर करावा. महावितरण प्रशासनाने वीजवाहिन्यांसह दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत. आपत्कालीन परिस्थितीत मदतकार्यासाठी कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना 'आपदा मित्र' म्हणून प्रशिक्षण देऊन आपत्ती व्यवस्थापन किट उपलब्ध करून द्यावे.

**नदीतील गाळ काढून पूर नियंत्रण कार्य तत्पर ठेवा**

जिल्ह्यात हतनूर प्रकल्प पाणलोट क्षेत्रांतर्गत मुक्ताईनगर व रावेर तालुक्यातील गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता धरणातून विसर्ग नियंत्रित ठेवावा. नद्यांमधील गाळ तत्काळ काढून योग्य ठिकाणी विल्हेवाट लावा, तसेच पूर निवारणासाठी पाटबंधारे विभागाने उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नदीवरील पूल सुरक्षिततेसंदर्भात खबरदारीचे आदेशही देण्यात आले. जिल्हा परिषद प्रशासनांतर्गत प्राथमिक शाळांची दुरुस्ती करावी, तसेच पावसाळ्यातील साथरोगांचे नियंत्रण करण्यासाठी आरोग्य विभागांतर्गत औषधी साठा, रुग्णवाहिका व ग्रामीण रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचे आदेश द्यावेत. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विभागांना वितरित करण्यात आलेले शोध व बचाव साहित्य तपासून सज्ज ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले. सर्व विभागांनी आपल्या कार्यालयात २४ तास सात दिवस निरंतर नियंत्रण कक्ष सुरू करावा, असेही जिल्हाधिकारी प्रसाद यांनी स्पष्ट केले.

# भुजबळांना मंत्रिपद; जळगाव राष्ट्रवादीत नाराजी

## आमदार अनिल पाटील यांना मंत्रिपदासाठी आढावा बैठकीत ठराव

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

मिस्टर क्लीन असलेले अमळनेरचे पक्षाचे एकमेव आमदार अनिल पाटील यांना डावलून आरोप असलेले छगन भुजबळ यांना मंत्रिपद दिल्याने जळगावच्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात अस्वस्थता पसरली आहे. दरम्यान, बुधवारी (२१ मे) झालेल्या बैठकीत आमदार अनिल पाटील यांना मंत्रिपद द्यावे म्हणून ठराव करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची बैठक बुधवारी (२१ मे) पक्ष कार्यालयात जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला महानगराध्यक्ष अभिषेक पाटील, महिला अध्यक्षा कल्पना पाटील, प्रवक्ते योगेश देसले यांच्यासह तालुकाध्यक्ष व फ्रंटलप्रमुख उपस्थित होते. बैठकीत खगोलशास्त्रज्ञ (स्व.) डॉ. जयंत नारळीकर आणि (स्व.) राजीव गांधी यांना अभिवादन करण्यात आले. तसेच सदस्य नोंदणीसंदर्भातही जिल्हाध्यक्ष पवार यांनी आढावा घेतला.

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवर परिणाम**

जिल्ह्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. महायुतीतील भाजप आणि शिवसेना शिंदे गटाकडे मंत्रिपद असल्याने त्यांची ताकद वाढली आहे. त्यातुलनेत राष्ट्रवादी अजित पवार गटाला मंत्रिपद नसल्याने त्याचा परिणाम आगामी निवडणुकांमध्ये होण्याची शक्यता आहे. निवडणुकांसाठी ताकद हवी तर जिल्ह्याला एक मंत्रिपद हवे, असा सूर बैठकीत व्यक्त करण्यात आला. तसेच भुजबळांऐवजी आमदार अनिल पाटील यांचे पुनर्वसन केले असते तर कदाचित पक्षविस्तारालाही त्याचा लाभ झाला असता. याच मुद्यावरून जळगाव राष्ट्रवादीत अस्वस्थता पसरली आहे.



**मंत्रिपदासाठी अजित पवारांना भेटणार**

जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेसला मंत्रिपद असताना पक्षविस्तार जोमाने सुरू होता. मात्र, नव्या मंत्रिमंडळात राष्ट्रवादीने जळगावला स्थान न दिल्याने आधीच नाराजी होती. आता एक मंत्रिपद देणे शक्य असताना पुन्हा डावलल्याने राष्ट्रवादीचे जिल्हा पदाधिकारी आमदार अनिल पाटील यांना मंत्रिपद मिळावे म्हणून थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहेत.

# शहर-जिल्हा काँग्रेसतर्फे तिरंगा यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २१ मे**

शहर-जिल्हा काँग्रेस समितीतर्फे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार (स्व.) राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने शहरातून तिरंगा यात्रा काढण्यात आली.

(स्व.) राजीव गांधी यांच्या प्रतिमेस जळगाव शहर-जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्यामकांत तायडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी शहर उपाध्यक्ष जाकिर बागवान, शहर प्रवक्ता शफी बागवान, बाबा देशमुख, शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा मीरा सोनवणे, छाया कोरडे, मीनाक्षी जावळे, माया सुरवाडे, शहर पदाधिकारी अण्णा जाधव, रवींद्र चौधरी, गोकुळ चव्हाण, विठ्ठल सोनवणे, रतन सोनवणे, किरण अडकमोल, प्रियंका सुरवाडे, सिद्धांत तायडे, पीयूष तायडे, जतीन बोरसे उपस्थित होते.

'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत भारतीय सैन्यदलाने केलेल्या कामगिरीबद्दल अभिनंदन करण्यासाठी अध्यक्ष श्यामकांत तायडे यांच्या नेतृत्वात शहरातील तांबापुरा परिसरातील (स्व.) शहीद हमीद चौकापासून तिरंगा यात्रेस सुरुवात करण्यात आली. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तिरंगा यात्रेचा समारोप करण्यात आला.



## अग्रलेख...

# साक्षरतेचा ‘मिझो’मार्ग

साक्षरतेचा सध्या सर्वत्र बोलबाला आहे. भारतातील सर्वच राज्ये साक्षरतेबाबत फुशारक्या मारत असतात. आजवर केरळकडे सर्वांत जास्त साक्षरतेची संख्या असलेले राज्य म्हणून पाहिले जात होते. देशात या राज्याची त्यासाठी ख्यातीही होती. देशातील तुलनेने लहान असलेल्या या राज्याच्या साक्षरतेची इतर राज्यांना असूयाही वाटत होती. काही राज्ये यात बढाईखोरी करून आपले नाव पुढे रेटत होते. मात्र आता साक्षरतेबाबत कुणाचा पुढाकार हे सांगताना तुमची जीभ अडखळणार नाही. कारण भारतातील पहिले साक्षर राज्य होण्याचा मान ईशान्य भारतातील मिझोरम या राज्याला मिळाला आहे. जिथे एकही निरक्षर व्यक्ती नाही, असे मिझोरम हे भारतातील पहिले राज्य राहणार आहे. साक्षरता ही विकासाची पाऊलवाट असते. त्या पाऊलवाटेवर पाय रोवत मिझोरम राज्य पूर्णतः साक्षर झाल्याची घोषणा मंगळवारी शिक्षण मंत्रालयाने केली. या निर्णयामुळे ईशान्येकडील या छोट्याशा राज्याने केरळलाच नव्हे, तर देशातील सर्व राज्यांना पिछाडवर सोडले आहे. देशातील पहिले साक्षर राज्य होण्याचा गौरव या राज्याला कसा मिळाला, ही घोषणा झाली याचा काय अर्थ आहे, साक्षरतेमध्ये आघाडीवर असलेली इतर राज्ये कोणती, देशात प्रगतिशील म्हणून गौरविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची साक्षरतेत किती उंची आहे, हे प्रश्न उपस्थित झाले आहे. एक मात्र निश्चित की मिझोरमने १०० टक्के साक्षरता गाठून भारताच्या शैक्षणिक क्षेत्रात नवा कीर्तिमान रचला आहे. याचाच अर्थ राज्यात आता कोणतीच व्यक्ती निरक्षर राहिलेली नाही. राज्यातील १५ वर्षांच्या वरील सर्व व्यक्ती वाचणे, लिहिणे आणि गुणाकार, भागाकार करण्यास सक्षम आहेत, असा याचा अर्थ होतो. मिझोरमला हे यश नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत मिळाले आहे. केंद्र सरकारच्या या योजनेने लाखो लोकांना साक्षर बनविण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. साक्षरता म्हणजे शहाणपणा, साक्षरता म्हणजे बुद्धिवर्धन, साक्षरता म्हणजे प्रगतिशीलतेच्या दृष्टीने टाकलेले पाऊल, अशा कितीतरी व्याख्या केल्या जाऊ शकतात. त्या अर्थाने मिझोरमच्या जनतेने देशाच्या समृद्धीसाठी सुरू असलेल्या यज्ञात आपल्या साक्षरतेच्या समिधा अर्पित केल्या आहेत. आपल्या देशात राष्ट्रीय साक्षरता मिशनने साक्षरतेचे काही निकष ठरविले आहेत. ते निकष पूर्ण केल्यामुळेच मिझोरम ही उंची गाठू शकले आहे. या प्रयत्नांसाठी मिझोरम सरकार, तेथील प्रशासन आणि शिक्षण क्षेत्रातील लोकांनी बजावलेल्या कामगिरीला प्रणाम केला जायला हवा. या मिशननुसार एखादी व्यक्ती आपले नाव लिहू आणि वाचू शकत असेल तर त्या व्यक्तीला साक्षर समजले जाते. १५ ते ५५ वयोगटातील ७५ टक्के लोकांना २००७ पर्यंत साक्षर बनविण्यासाठी १९८८ मध्ये साक्षरता मिशनची सुरुवात झाली होती. त्याचे फायदे मिळाले सुद्धा, पण केवळ साक्षरतेत पहिला क्रमांक मिळाल्याने सर्व समस्या सुटत नाहीत. केवळ लिहिता येणे आणि वाचता येण्याने प्रगतीची उंची गाठता येत नाही. त्यासाठी अजूनही अनेक निकषांची पूर्तता करावी लागते. तरीदेखील साक्षरतेच्या निकषांमध्ये उतरलेल्या मिझोरमने मिळविलेले हे यश यत्किंचितही कमी ठरत नाही.

साक्षरतेच्या क्रमवारीत या राज्यापाठोपाठ गोवा, सिक्कीम, केरळ आणि दिल्लीचा क्रमांक लागतो. २०११ च्या जनगणनेत मिझोरमचा साक्षरता दर ९१.३३ टक्के होता व हे राज्य साक्षरतेत देशात तिसऱ्या क्रमांकावर होते. उल्हास योजनेंतर्गत २०२३ मध्ये या राज्यात सर्वत्र सर्वेक्षण करण्यात आले. त्यात ३,०२६ निरक्षरांची ओखळ पटविली गेली. त्यातील १,६९२ लोकांनी दररोज अभ्यास करून साक्षरतेच्या राज्याच्या प्रगतीत योगदान दिले. यानंतर राज्याची साक्षरता ९८.२० टक्क्यांपर्यंत वाढली. हे काम मुळीच सोपे नव्हते. सरकारने २९२ स्वयंसेवकांची एक चमू तयार केली, ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, तज्ज्ञ आणि समन्वयकांची नियुक्ती केली गेली. या साऱ्यांनी नेटाने निरक्षरांना साक्षर करण्याची किमया केली. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत साक्षरता दरात वाढ झाली आहे. २००१ मध्ये महाराष्ट्राचा साक्षरता दर ७७.२७ होता. २०११ मध्ये वाढून हा दर ८२.९१ झाला. मिझोरमच्या साक्षरता यशात सामुदायिक सहकार्य आणि मिझो संस्कृतीत अंतर्निहित तलॉम्मंगाईहना (निःस्वार्थ सेवा) या भावनेने तर स्थानिक स्वयंसेवी संस्थांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दुसरीकडे, मिझोरमचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी ही कामगिरी मागील सर्व सरकारे, शिक्षक आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांचे परिणाम असल्याचे नमूद केले आहे. ही फक्त एक आकडेवारी नाही. उलट ते मिझो समाजाच्या ताकदीचे आणि प्रगतीचे प्रतीक आहे. आमचे पुढील ध्येय डिजिटल साक्षरता, आर्थिक जागरूकता आणि उद्योजकता कौशल्यांना प्रोत्साहन देणे, हे असल्याचेही त्यांनी नमूद केले. मागास मिझोरमला साक्षरतेमुळे अनेक फायदे होऊ शकतात. साक्षरतेमुळे लोकांना नवीन माहिती व कौशल्य शिकण्याची संधी मिळू शकते, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारेल. शिक्षित व्यक्ती अधिक कार्यक्षम व उत्पादक असतात, त्यामुळे गावांची व एकूणच प्रदेशाची आर्थिक प्रगती होणार आहे. साक्षरता वाढल्यामुळे लोकांना आरोग्याबाबत माहिती मिळेल, ज्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारून आजारांचे प्रमाण कमी होईल. शिक्षणामुळे सामाजिक भेदाभेद कमी होतात व समुदायातील एकात्मता वाढीस लागते. त्या अर्थाने मिझोरममधील जातीय सद्भाव वाढीस लागणार आहे. साक्षरतेमुळे लोकांची आपली समस्या समजून घेण्याची क्षमता वाढते व ते अधिक चांगले निर्णय घेऊ शकतात. शिक्षणामुळे स्थानिक संस्कृती व परंपरा जपल्या जातात आणि नवीन ज्ञान व संस्कृतीचेही दर्शन होते. या सर्व बाबी हमखास मिझोरमच्या विकासातील मैलाचा दगड ठरतील.

पूर्वीच्या काळी निरक्षरांची मोठ्या प्रमाणात फसवणूक व्हायची. मुख्यतः सावकारांकडून या लोकांच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन, त्यांच्याकडून अंगठ्यांचे ठसे घेऊन मोठ्या प्रमाणात जमिनी, आर्थिक मालमत्ता लाटल्या जात असत. ही बाब ध्यानात येताच सरकारकडून सावकारांवर बंधने टाकली गेली. त्यातून असे प्रकार बरेच कमी झाले. निरक्षरतेमुळे समाजाची वाढ खुंटते. व्यवहारी जगात प्रगतीचे अनेक मार्ग उघडे असतानाही निरक्षर समाज पारंपरिक व्यवहारांमध्येच गुंतून पडतो. त्यामुळे त्यांचे आर्थिक प्रगतीचे मार्ग खुंटतात. बालमजुरी, अल्पवयीन गुन्हेगारी, रस्त्यांवर भीक-मागणारी लहान मुले यांच्या प्रमाणात निरक्षरतेमुळे वाढ होते. देशातील अनेक समृद्ध राज्यांना मागे टाकत १०० टक्के साक्षरतेचा सोपान मिझोरमने सहजासहजी गाठलेला नाही. साक्षरतेमुळे येथील लोकांमध्ये शिक्षणाची पातळी वाढली असली तरी तो उद्देश गाठण्यासाठी त्यांना अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवावे लागले. राष्ट्रीय आजीवन शिक्षण अभियान या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात व मागासवर्गीय भागांमध्ये साक्षरता वाढविण्यासाठी विविध शिक्षण शिबिरे तसेच आश्रमशाळा व साक्षरता केंद्रे स्थापन करावी लागली. सरकारने विशेषतः २०१५-२०२० या कालावधीत साक्षरता वाढविण्यासाठी विशेष मोहिमा राबविल्या. या मोहिमांमध्ये घराघरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्राथमिक शिक्षणावर भर देऊन बालकांना व वयोवृद्धांना प्राथमिक शिक्षण देण्याकडे लक्ष केंद्रित केले गेले. विविध स्वयंसेवी संस्था व साक्षरता स्वयंसेवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या भागात साक्षरता मोहिमा राबविण्यास प्रोत्साहन दिले गेले. डिजिटल व मोबाईल मिझोरमच्या साक्षरतेमध्ये सरकारने विविध उपक्रम राबविले. मोबाईल व डिजिटल माध्यमांचा उदाहरणार्थ ई-लर्निंग आणि मोबाईल ॲप्सचा वापर करून साक्षरता वाढविण्याचे प्रयत्न अजूनही सुरू आहेत. शाळा व शिक्षण संस्थांना मदत देऊन साक्षरतेस प्रोत्साहन दिले गेले. साक्षरतेमुळे मिझोरमची होत असलेली प्रगती इतर राज्यांसाठी अनुकरणीय ठरत आहे. ईशान्येकडील राज्ये मागासलेली हे समीकरणही या राज्याने मोडकळीस आणले आहे. साक्षरतेच्या या मिझो मार्गाचे अनुकरण इतर राज्ये कशी करतात, यावर त्यांचे यशापयश ठरणार आहे. ▮

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# भारताची डिजिटल भरारी

काही दिवसांपूर्वी एका जपानी पाहुण्याला पुण्यात फिरवत होतो. अनेक ठिकाणे झाल्यावर एका पेरूवाल्याकडे पेरू घ्यायला गेलो. तिथे क्यूआर कोड बघून जपानी पाहुणा थक्क झाला. जगामध्ये असे कुठेही नाही असं तो म्हणाला. अगदी विकसित अमेरिका, जपानमध्येही डिजिटल योजना तळातल्या व्यक्तीपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. आपल्या देशात आज डिजिटल युग घराघरात पोहोचलेले आढळते. प्रथमतः कॉम्प्युटरमुळे आणि गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये स्मार्टफोनमुळे बहुतेकांची नव्या डिजिटल सुविधांशी तोंडओळख नक्कीच झाली आहे. नेटबँकिंग, डिजिटल वॉलेट यासारख्या संकल्पनांचा वापर दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात दिसतो आहे. डिजिटल इंडिया ही भारत सरकारने २०१५ मध्ये सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी मोहीम आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट भारताला एक डिजिटल अर्थव्यवस्था बनवणे, शासकीय सेवांचे डिजिटलीकरण करणे आणि नागरिकांना डिजिटल साक्षर बनवणे हे आहे. भारतासारखा खंडप्राय, विविधतेने नटलेला देश कधीच डिजिटल होणार नाही असे अनेकांचे मत होते. पण या मोहिमेने अफाट यश मिळवले. मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्ससारख्या सेवांचा वापर भारतात झपाट्याने वाढला आहे. सरकारी कामकाज ‘नेट’वरून वेगात होऊ लागले असल्याने विविध सरकारी योजनांचा लाभ घेणेही शक्य होत आहे. सरकारी कारभाराचा ‘इन-लाईन’ पासून ‘ऑन-लाईन’ पर्यंतचा हा प्रवास बऱ्यापैकी वेगाने झाला. डिजिटल इंडिया मोहिमेमुळे भारतात स्टार्टअप्सची संख्या आणि या क्षेत्रात गुंतवणूक, रोजगारनिर्मिती वाढली आहे.

सार्वजनिक सेवांचे वितरण सुधारण्यासाठी आणि ई-गव्हर्न्मेंटच्या युगाची सुरुवात करण्यासाठी विविध राज्य सरकारे आणि केंद्रीय मंत्रालयांनी अनेक ई-गव्हर्नन्स उपक्रम हाती घेतले आहेत. भारतातील ई-गव्हर्नन्स हे सरकारी विभागांच्या संगणकीकरणापासून नागरिक केंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारखे शासनाचे बारीकसारीक मुद्दे अंतर्भूत करणाऱ्या उपक्रमांमध्ये सातत्याने विकसित झाले आहे. नोटबंदीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर अनेक ‘पेमेंट ॲप्स’चे पेव फुटले आणि बऱ्याच जणांनी ती स्वतःच्या फोनमध्ये उतरवून घेऊन वापरायला सुरुवातही केली. ‘भीम’ हे भारत सरकारद्वारे विकसित केलेले एक मोबाईल पेमेंट ॲप आहे. या ॲपच्या माध्यमातून आपण




आपल्या बँक खात्यातून पैसे त्वरित आणि सुरक्षितपणे पाठवू शकतो आणि प्राप्त करू शकतो. हे ॲप वापरण्यासाठी आपल्याला फक्त आपले बँक खाते लिंक करणे आवश्यक आहे. हे ॲप विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला याचा उपयोग करणे सोपे होते. या ॲपचा वापर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. देशभरातील लाखो व्यापाऱ्यांकडून ते स्वीकारले जाते. रेल्वे ही अनेकांची जीवनदायिनी आहे. आपल्याला बऱ्याचदा रेल्वेने बाहेरगावी जायचे असते. मात्र, वेळेवर तिकीट मिळत नाही. अशा स्थितीत आता रेल्वे (आयआरसीटीसी) ने नागरिकांसाठी ‘रेल कनेक्ट’ ॲप सादर केले आहे. सर्वाधिक वर्दळीच्या वेळी किंवा आपत्कालीन प्रसंगी तिकीट काढण्यासाठी प्रवाशांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांवर तोडगा म्हणून आयआरसीटीसीने हे ॲप प्रवाशांना उपलब्ध करून दिले आहे. या ॲपद्वारे प्रवासी ऑनलाईन बुकिंग आणि ऑनलाईन पेमेंटसुद्धा करू शकतात. आतापर्यंत १३ कोटीहून अधिक लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले असून, ४० कोटींहून अधिक तिकिटांचे बुकिंग हे ॲप वापरून झाले आहे

पासपोर्ट, रेशनकार्ड, वाहन परवाना असे आपली ओळख पटवायचे अनेक मार्ग विसाव्या शतकात होते. २००९ मध्ये आपल्या देशात आधार कार्ड हे एक नवीन ओळखपत्र सादर झाले. हे एक महत्त्वपूर्ण ओळखपत्र आहे, जे सूचित करते की तुम्ही भारतीय नागरिक आहात. आधार कार्ड हे भारतातील पहिले विश्वासपात्र ओळखपत्र आहे. आधार कार्ड मिळवण्यासाठी नागरिकांनी ओळख पडताळण्यासाठीची कागदपत्रे (उदा राहत्या पत्त्याचा पुरावा- मतदार आयडी, चालक परवाना, वीज बिल) तसेच बायोमेट्रिक तपशील (जसे बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे ठसे) सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर व्यक्तीला एक ओळख क्रमांक दिला जातो, जो तो भारतीय नागरिक असल्याची पुष्टी करतो आणि त्याची सर्व माहिती एका अद्वितीय भारतीय डेटाबेसमध्ये रेकॉर्ड केली जाते. प्रत्यक्ष कार्ड जवळ बाळगायचे नसल्यास ‘एम आधार’ ॲपचा वापर करता येतो. हे ॲप तुम्ही फोनमध्ये सहज डाऊनलोड करू शकता व याचा कुठेही वापर करणे शक्य आहे. ओळखपत्राचा पुरावा दाखवायचा असतानाही एम आधार उपयोगी येईल. परदेशी प्रवास करायचा असेल तर पासपोर्ट ही अत्यावश्यक गोष्ट ठरते. पहिल्यांदाच परदेशात जाण्याची तयारीच मुळी पासपोर्टपासून सुरू होते; पण त्याखेरीजही पासपोर्ट हा एखाद्या व्यक्तीसाठी महत्त्वपूर्ण पुरावा ठरू शकतो. एके काळी पासपोर्ट काढणे हे परदेशात जाण्याइतकेच कठीण आणि कटकटीचे काम होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये ही प्रक्रिया अतिशय सुटसुटीत आणि जलद बनली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करत पासपोर्ट विभागाने पासपोर्ट मिळवण्याची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. याचाच पुढचा भाग म्हणून आता स्मार्टफोनवरून पासपोर्ट मिळवणे सोपे झाले आहे. भारतीय नागरिकांना जलद, सहज आणि पारदर्शकपणे पासपोर्ट मिळवता यावा, यासाठी केंद्र सरकारने टाटा कन्सल्टन्सीच्या सहकार्यातून ‘पासपोर्ट सेवा’ हे ॲप सुरू केले आहे.

२०२५ पर्यंत डिजिटल इंडिया मोहिमेने अनेक महत्त्वपूर्ण अंगांनी यश मिळवले आहे. पहिले म्हणजे डिजिटल पेमेंटमध्ये वाढ झाली आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेसद्वारे होणारे व्यवहार डिसेंबर २०२४ मध्ये २३,२४,६९९.९१ कोटींवर पोहोचले आहेत. हेच तंत्रज्ञान आता सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशस यासारख्या ७ देशांमध्ये लाईव्ह व्यवहार सुलभ करत आहे. दुसरे म्हणजे मार्च २०२३ पर्यंत १३६.६५ कोटींहून अधिक आधार कार्ड जारी करण्यात आली आहेत. जानेवारी २०२५ मध्ये आधार फेस ऑथेंटिकेशन सुविधेने शंभर कोटींचा टप्पा ओलांडला आहे. तिसरे म्हणजे १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत डिजिलॉकर वापरकर्त्यांची संख्या ४६.५२ कोटींवर पोहोचली आहे. चौथे म्हणजे जानेवारी २०२५ पर्यंत २.१४ लाख ग्रामपंचायती इंटरनेटद्वारे जोडल्या गेल्या असून ६.९२ लाख किलोमीटर लांबीची ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे. १.०४ लाख वाय-फाय हॉटस्पॉट ग्रामपंचायतींमध्ये स्थापित करण्यात आले आहेत. या ॲपने ७.१ कोटींहून अधिक वापरकर्त्यांना ३२ राज्यांमधील २०७७ सरकारी सेवांशी जोडले असून २३ भाषांमध्ये समर्थन पुरवले आहे. हे जगातील सर्वांत मोठे शिक्षण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म ठरले आहे. ‘डिजिटल इंडिया’ मोहिमेने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यावर, सरकारी सेवा ऑनलाईन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# फुकट मिळणाऱ्या योजनांचे वास्तव

आजच्या घडीला शासनाकडून विविध प्रकारच्या मोफत (फुकट) योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. गरबि, दुर्बल व वंचित घटकांना मदत करण्यासाठी अशा योजना उपयुक्त ठरतात. शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य, वीज, गॅस, निवारा आदी मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार अनेक मोफत योजना राबवते. उदाहरणार्थ, प्रधानमंत्री अन्न योजना, उज्ज्वला गॅस योजना, मोफत आरोग्य विमा योजना, शालेय पोषण आहार योजना, मोफत वीज/पाणी आदी योजनांचा समावेश होतो. परंतु, या फुकट योजनांमुळे काही गंभीर समस्या उद्भवत आहेत. सर्वसामान्य जनतेमध्ये श्रम न करता मिळविण्याची मानसिकता वाढू लागली आहे. परिणामी, काम करण्याची प्रेरणा कमी होते आणि दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक विकासावर त्याचा परिणाम होतो. याशिवाय, या योजनांतून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार देखील होताना दिसतो. योजनेच्या लाभार्थींची यादी तयार करताना अपात्र व्यक्तींना समाविष्ट करणे, निधीचा अपव्यय करणे, स्थानिक राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप हे सर्व प्रकार सर्रास घडतात. गरजूंना लाभ मिळण्याऐवजी, बड्या मंडळींना याचा फायदा होताना दिसतो. मोफत योजना अनेकदा राजकारणाचे साधन बनतात.

निवडणुकीच्या काळात मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध ‘मोफत’ घोषणांची बरसात केली जाते. शिक्षण, आरोग्य, वीज किंवा इंटरनेट मोफत देण्याच्या आश्वासनांचा उपयोग मतांसाठी केला जातो. यावेळी अगदी निवडणुकीच्या तोंडावर घोषित करण्यात आलेली लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक आहे. या योजनेमुळे महाराष्ट्र सरकारला प्रचंड आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. अशा योजनांमुळे इतर कल्याणकारी योजनांवर खर्च झालेल्या निधीची पूर्तता करताना अडचणी येतात. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारचे आर्थिक बजेट कोलमडले असून कंत्राटदारांची देयके देण्यात सरकारकडून उशीर केला जात आहे. वास्तविक गरज आणि आर्थिक शाश्वतता लक्षात न घेता योजना जाहीर केल्या जातात, ज्या पुढे अर्थव्यवस्थेवर ताण आणतात. अनेक वेळा खऱ्या गरजू व्यक्ती योजनांपासून वंचित राहतात, कारण त्यांना माहिती नसते, किंवा मध्यस्थ व स्थानिक अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे त्यांना लाभ मिळत नाही. काहीवेळा तर ओळखीच्या लोकांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे या योजनांचा उद्देश मोडीत निघतो. या योजनांचा उद्देश गरजू लोकांपर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवणे हा आहे. मोफत योजना हे एक अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कल्याणकारी साधन असले तरी त्याचे अनेक सकारात्मक व नकारात्मक पैलू आहेत. फुकट मिळणाऱ्या शासकीय योजनांचे स्वरूप, फायदे, नुकसान, त्यातून उद्भवणाऱ्या समस्या, राजकारण, भ्रष्टाचार आणि त्या योजना बंद झाल्यास निर्माण होणाऱ्या समस्या याचा देखील विचार करण्याची गरज आहे.

अशा योजना गरजूंना जीवनावश्यक सुविधा मिळवून देतात. मात्र आता याच योजना भ्रष्टाचाराचे कुरण ठरत आहे. या उद्देशाने या कल्याणकारी योजना अमलात आणल्या तो उद्देश मात्र पूर्ण होताना दिसत नाही. ज्याला गरज आहे त्याला त्या योजनेचा लाभ निश्चितच मिळायला हवा. मात्र ज्याला गरज नाही असेही लोक शासनाच्या या मोफत योजनांचा लाभ घेत आहे. लाडकी बहीण ही योजना चांगली असली तरी या योजनेचे गरजू लाभार्थी कोण आहेत आणि ही योजना लाटणारे, या योजनेसाठी पात्र नसणारे शोधण्याची खरंच गरज आहे. योजना गरिबांसाठी आहे मात्र या योजनेचा लाभ खरे लाभार्थी न घेता इतर लोक लाटू लागले आहेत. योजना मोफत आहे म्हणून आयतेच सरकारकडून सर्व काही मिळत असल्याने श्रम न करण्याची वृत्ती जी समाजात बळावत चालली आहे हे देखील देशहिताच्या दृष्टीने चुकीचे आहे. या सगळ्यांना जबाबदार कोण? या सगळ्याला जबाबदार ठरतात ते प्रशासनातील भ्रष्ट कर्मचारी, राजकारणी आणि एकप्रकारे आम्ही नागरिक देखील. कारण आम्ही पारदर्शकतेची मागणी करत नाही किंवा योग्य ठिकाणी तक्रार देखील करत नाही. जर अचानक या सर्व मोफत योजना बंद झाल्या, तर अनेक गरजूंना मोठा फटका बसेल. गरीब आणि श्रमिक वर्ग संकटात सापडेल. त्यांना मूलभूत सेवा मिळणे कठीण होईल. त्यामुळे या योजना पूर्णपणे बंद करणे योग्य नाही, परंतु त्यांचे स्वरूप सुधारण्याची नक्कीच गरज आहे. फुकट योजनांचा उद्देश चांगला असला तरी, त्यांची अंमलबजावणी पारदर्शक, गरजू केंद्रित आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत असावी. भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे. गरजू आणि पात्र लोकांपर्यंतच लाभ पोहोचविणे हेच खरे प्रशासनाचे यश ठरेल. ▮

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# काँग्रेसचे ‘हात’ दाखवून अवलक्षण

‘ऑपरेशन सिंदूर’ यशस्वी झाल्यानंतर जगात पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी विविध देशांत सात संसदीय प्रतिनिधी मंडळ पाठवण्याचा महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने घेतला आहे. विशेष म्हणजे हे प्रतिनिधी मंडळ सर्वसमावेशक राहणार आहे, म्हणजे काँग्रेससह विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांचाही त्यात समावेश करण्यात आला आहे. मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या खासदारांचा फक्त या प्रतिनिधी मंडळात समावेशच केला नाही तर यातील एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व काँग्रेसचे शशी थरुर यांच्याकडे सोपवले आहे. विशेष म्हणजे या सातपैकी दोनच प्रतिनिधी मंडळांचे नेतृत्व भाजपा सदस्यांकडे आहे, उर्वरित पाचचे नेतृत्व भाजपेतर पक्षांच्या नेत्यांकडे सोपविण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रात मोठ्या पदावर शशी थरुर यांनी काम केले असल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचे वेगळे महत्त्व आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांच्याजवळ वक्तृत्वही आहे, तसेच मुत्सद्दी म्हणून त्यांची जगात ओळख आहे. महत्त्वाचे म्हणजे जगात त्यांना मान्यताही आहे. त्यामुळे दहशतवादाने बरबटलेला पाकिस्तानचा काळा चेहरा जगात उघडा पाडण्यासाठी थरुर यांच्यासारखा दुसरा योग्य वक्ता नाही. या प्रतिनिधी मंडळात सहभागी करण्यासाठी नावे सुचवा अशी औपचारिक विनंती सरकारने काँग्रेससह अन्य पक्षांना केली होती. सरकारने काँग्रेसला चार नावे मागितली होती. मात्र काँग्रेस पक्षाने अंतर्गत राजकारण करत लायक नेत्यांची नावे वगळत ‘ना’लायक नेत्यांची नावे पाठवली होती. काँग्रेसकडून अपेक्षित नावे न आल्यामुळे मोदी सरकारने आपल्या अधिकारात शशी थरुर यांच्यासह गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा आणि सलमान खुर्शीद यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश केला. थरुर काँग्रेसमध्ये गांधी घराण्याचे विरोधक म्हणून ओळखले जातात. मल्लिकार्जुन खडगे यांच्याविरोधात त्यांनी काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूकही लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला, ही गोष्ट वेगळी. त्यामुळे खडगे आणि गांधी घराणे या दोघांनाही थरुर यांचे नाव चालणार नव्हते. त्यामुळे थरुर यांना डावलण्यात आले. काँग्रेसला गुणांची पारख नसली तरी



मोदी यांना चांगल्या आणि कर्तृत्ववान माणसांची पारख आहे. सरकार जगाच्या वेगवेगळ्या देशात सात प्रतिनिधी मंडळे पाठविणार असून त्यांचे नेतृत्व भाजपाचे रविशंकरप्रसाद आणि बैजयंत पांडा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे, द्रमुकच्या कनिमोझी आणि जदयूचे संजयकुमार झा करणार आहेत. विशेष म्हणजे मोदी सरकारने थरुर यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश केल्यानंतर, थरुर यांचे नाव आम्ही सुचवले नव्हते, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत काँग्रेसने त्यांच्या नावावर एकप्रकारे आक्षेपही घेतला होता. असे करत गांधी घराणे आणि काँग्रेस नेतृत्वाने आपले हसे करून घेतले. काँग्रेसने गौरव गोगोई, राजा बरार, डॉ. सय्यद नासीर हुसेन आणि आनंद शर्मा अशी चार नावे पाठवली होती. सरकारने यातील तीन नावे फेटाळून लावत फक्त आनंद शर्मा यांचे नाव कायम ठेवले. जगात भारताची बाजू मांडण्यासाठी असे प्रतिनिधी मंडळ पाठवण्याची ही पहिली वेळ नाही. काँग्रेस सरकारच्या काळातही याआधी एक-दोन वेळा भारताने असे प्रतिनिधी मंडळ पाठवले होते आणि त्यात विरोधी पक्षाच्या नेत्याचा समावेश केला होता. राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८८ मध्ये एक प्रतिनिधी मंडळ आपल्याला अमेरिकेत पाठवायचे होते. भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांना काही शारीरिक त्रास होता आणि त्यावर अमेरिकेत ऑपरेशन करणे आवश्यक होते. पण काही आर्थिक अडचणींमुळे ऑपरेशनसाठी अमेरिकेत जाणे वाजपेयींना शक्य होत नव्हते. त्यामुळे पंतप्रधान असलेल्या राजीव गांधींनी अटलबिहारी वाजपेयी यांचा या प्रतिनिधी मंडळात जाणीवपूर्वक समावेश केला, जेणेकरून वाजपेयी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची बाजू प्रभावीपणे मांडू शकतील, तसेच परत येताना आपले ऑपरेशनही करून घेऊ शकतील. राजीव गांधींची १९९१ मध्ये हत्या झाल्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांनीच ही बाब पत्रकारांना सांगितली होती.

काँग्रेसच्याच सरकारने दुसऱ्यांदाही अटलबिहारी वाजपेयी यांना भारताची बाजू मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रमध्ये पाठवले होते. २७ फेब्रुवारी १९९४ ला संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत पाकिस्तानने इस्लामिक देशांच्या संघटनेच्या माध्यमातून काश्मीरमध्ये मानवाधिकारचे उल्लंघन होत असल्याचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव यदाकदा पारित झाला असता तर जगात भारताची नाचक्की झाली असती. त्यामुळे संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या परिषदेत भारताची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी अटलबिहारी वाजपेयी यांना पाठवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा वाजपेयी फक्त साधे खासदार होते. वाजपेयींच्या नेतृत्वातील प्रतिनिधी मंडळात तत्कालीन परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री सलमान खुर्शीद यांचाही समावेश होता. विशेष म्हणजे यात काही गैर आहे, असे त्यावेळी पंतप्रधान असलेल्या नरसिंहराव यांनाही वाटले नाही आणि साधे खासदार असलेल्या वाजपेयींच्या नेतृत्वात आपण कसे जायचे असा प्रश्न खुर्शीद यांनाही तेव्हा पडला नाही. वाजपेयी यांनी अतिशय प्रभावीपणे मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत भारताची बाजू मांडत काश्मीरमध्ये मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा पाकिस्तानचा आरोप खोडून काढला होता. त्यामुळे हा प्रस्ताव बारगळला. अटलजी विरोधी पक्षांचे नेते असले तरी जेव्हा देशाचा मुद्दा आला तेव्हा अटलजी आमचे नेते होते, असे सलमान खुर्शीद यांनी तेव्हा म्हटले होते. देशहिताच्या मुद्यावर तेव्हा असा आदर्श घालून देणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांनी आज परदेशात आपल्या देशाची बाजू मांडण्यासाठी आपल्या पक्षाच्या नेत्याच्या नावालाच पक्षांतर्गत राजकारणातून विरोध केला.

परदेशात भारताची बाजू मांडण्यासाठी पाठवण्यात येणाऱ्या प्रतिनिधी मंडळात नाव निवडण्याचा अधिकार सरकारचा असतो, विरोधी पक्षांनी सुचवलेली नावे मान्य केलीच पाहिजे, असे कोणतेही बंधन सरकारवर नसते. १९८८ आणि १९९४ ला भाजपाने अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव सुचवले नव्हते, तर तेव्हाच्या काँग्रेस सरकारनेच अटलबिहारी वाजपेयी यांची निवड त्यांच्या कर्तृत्वावर केली होती. त्यामुळे या मुद्यावरून सरकारवर टीका करण्याचा कोणताही नैतिक अधिकार काँग्रेसला नाही. या मुद्यावरून काँग्रेस जेवढी आदळआपट करेल, तेवढे काँग्रेसचे नुकसान आणि बदनामी होणार आहे. त्यामुळे आता आमच्या पक्षाच्या नेत्याने परदेशात भारताची बाजू प्रभावीपणे मांडली, याचे श्रेय घेण्याचा फुकाचा प्रयत्न करत काँग्रेसने आपली झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवली पाहिजे, त्यातच त्याचे हित आहे. ▮

९८८१७१७८१७

## प्रेरक विचारपुष्प

‘तरुण भारत’ने ‘विचारपुष्प’ या शीर्षकाखाली पुण्यपुरुषांचे संदेश देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम अभिनंदनीय आहे. या थोर पुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या उत्थानासाठी समर्पित केले. हा देश हिंदूंचा आहे. हिंदूची परिभाषा देखील त्यांनी स्पष्ट शब्दांत जगासमोर मांडली. जे या मातृभूमीला आपले मानतात ते सर्व हिंदू अशी सरळ आणि सोपी परिभाषा त्यांनी केली. सर्व जातींचे, सर्व धर्मांचे आणि सर्व पंथांच्या नागरिकांना आपल्यात सामावून घेण्याची क्षमता हिंदू धर्मात आहे. हेच विचारधन सोबत बाळगत या पुण्यपुरुषांनी आपले जीवन देशासाठी खर्ची घातले. संसाराच्या मोहपाशापासून ते दूर राहिलेत. त्याग, तपस्या आणि बलिदानाचे ज्वलंत उदाहरण म्हणून या महानुभावांचा उल्लेख वारंवार करता येईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. संघाला येत्या २ ऑक्टोबरला १०० वर्षे पूर्ण होतील. जागतिक स्तरावर अशी एकही संघटना नाही ज्यांनी १०० वर्षे अविरत संघ शाखेच्या माध्यमातून देशसेवा करण्याचे व्रत घेतले आणि निरंतर त्याचे पालन केले. विचारपुष्प या सदराखाली ज्यांचे संदेश प्रकाशित होत आहेत ते सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाईक आहेत. त्यामुळे वंदनीय आहेत. नवीन पिढीला त्यांचे हे संदेश मार्गदर्शक ठरू शकतात, त्यांच्या आयुष्याला दिशादर्शन देणारे ठरू शकतात. याच पुण्यपुरुषांच्या मार्गदर्शनाखाली लाखो स्वयंसेवक घडलेत जे आज विविध क्षेत्रांत निष्ठेने कार्य करीत आहेत आणि भारत भूमीच्या सर्वांगीण विकासात आपले योगदान देत आहेत.

**वसंत पिंपळापुरे**

●● ●●

### ‘नरकातला स्वर्ग’मध्ये मूळ मुद्याला बगल

संजय राऊत यांनी ‘नरकातला स्वर्ग’ हे पुस्तक लिहून प्रकाशित केले आहे आणि त्यात बरेच गौप्यस्फोट(!) केल्याचा दावा केला आहे. मात्र हे पुस्तक म्हणजे मूळ मुद्याला बगल देऊन केलेले एक विषयांतरच आहे. मुख्य विषय असा आहे की, २०१९ मधील विधानसभा निवडणुकीसाठी तत्कालीन शिवसेना आणि भाजप यांची निवडणूकपूर्व युती झालेली होती. त्या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रीवादी काँग्रेस यांच्याबद्दल तिरस्कार असलेल्या हिंदुत्वप्रेमी मतदारांनी युतीला भरभरून मतदान करून स्पष्ट बहुमत दिले होते. मात्र निवडणुकीचे निकाल जाहीर होताच उद्धव ठाकरे यांनी पलटी मारली. राऊतांनी आम्हाला सर्व पर्याय खुले आहेत असे जाहीर केले. त्या दिवसांत देवेंद्र फडणवीस यांचा फोनदेखील मातोश्रीवर घेतला जात नव्हता! प्रत्यक्षात त्या गद्दारीची सुरुवात २०१९ मधील लोकसभा निवडणुकीच्या नंतर लगेचच झाली होती. त्या निवडणुकीतील मतदानाचा विधानसभा मतदारसंघनिहाय विचार करता, युतीला २८८ पैकी जवळपास २२० मतदारसंघांत मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सत्तेत येण्याची सुतराम शक्यता नव्हती. तेव्हापासूनच एजंट राऊत यांना हाताशी धरून कटकारस्थान रचण्यात आले. शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपायी, मतदारांनी स्पष्टपणे नाकारलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीशी अनैतिक आघाडी करून सत्ता स्थापन केली. त्यासाठी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी १०, जनपथ येथे जाऊन सोनिया गांधींपुढे लोटांगण घालून प्रखर हिंदुत्वाला सोडचिठ्ठी दिली आणि मराठी अस्मिता खुंटीला टांगली. पुढे योग्य वेळ पाहून एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी शिवसेनेचे पुनरुज्जीवन केले आणि भाजपसोबत सरकार स्थापन केले. तेव्हा राऊतांनी आता मनगटे चावून काय उपयोग आहे?

**अविनाश वाघ**

●● ●●

### ब्लॅकआऊट किंवा प्रकाशबंदी

युद्धकाळात शत्रूला दिसू नये म्हणून सर्व दिवे बंद करण्याचा काळ म्हणजे ब्लॅकआऊट. प्रकाशबंदी हा अगदी तंतोतंत प्रतिशब्द आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात देशातील अनेक शहरांनी ही स्थिती अनुभवली आहे. १९७१ साली युद्धपरिस्थितीत काही काळासाठी ब्लॅकआऊट झाल्याचे अनेकांना स्मरत असेलच. त्यावेळी पथदिवे बंद ठेवणे , सर्व खिडक्यांच्या काचांवर काळा कागद चिकटवणे, वाहनांच्या हेडलाईटच्या वरच्या अर्ध्या भागावर काळे स्टिकर लावणे यासारखे उपाय संपूर्ण देशात करण्यात आले. काही शहरांत संपूर्ण प्रकाशबंदी पण करण्यात आली. ब्लॅकआऊटमुळे आजकालच्या आधुनिक अत्यंत वेगवान विमानांना टार्गेट लॉक करणं शक्य होत नाही. मिसाईल आणि ड्रोन यांना नष्ट करणाऱ्या यंत्रणा अंधारात अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतात याचा अनुभव आपण नुकताच घेतलेला आहे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सरकारने अनेक ठिकाणी मॉक ड्रील आयोजित केल्या होत्या. ब्लॅकआऊटच्या प्रसंगी प्रत्येक नागरिकाने सरकारला आणि प्रशासनाला सहकार्य करणे गरजेचे आहे. सैन्यदलांना आणि सरकारला जबाबदार नागरिक म्हणून मदत व सहकार्य करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. ▮

**डॉ. मदन काकडे**

## थोडक्यात महत्त्वाचे...



भुसावळ : श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र मुक्ताई मंदिर (मूळ मंदिर कोथळी) पालखी २१ मे रोजी सायंकाळी भुसावळ येथील श्री विठ्ठल मंदिर वार्डात आली. तेव्हा पादुकांचे दर्शन घेताना मंदिर संस्थानचे अध्यक्ष सुहास फालक, माजी नगराध्यक्ष उमेश नेमाडे, हभप हरणे महाराज आदी भाविक.

### फैजपूरला महाराणा प्रताप जन्मोत्सवानिमित्त २९ मे रोजी शोभायात्रा व कीर्तन सेवा



**फैजपूर, ता. यावल :** शहरात सालाबादप्रमाणे या वर्षीसुद्धा २९ मे रोजी सार्वजनिक महाराणा प्रतापसिंह जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. ४८५ व्या जन्मोत्सवानिमित्त २८ मे रोजी रात्री ८ वा. युवा कीर्तनकार शब्द प्रभू - ह.भ.प. भरत महाराज म्हैसवाडीकर यांची कीर्तन सेवा कार्यक्रम देविवाडा, दत्तमंदिराजवळ होईल. २९ मे रोजी दुपारी ४ वाजता गावातील श्रीराम मंदिरापासून महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात शहरातील तमाम हिंदू बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराणा प्रतापसिंह जन्मोत्सव समितीने केले आहे.

### राष्ट्रीय आदिवासी साहित्य महोत्सवात आसाम येथे सुनील गायकवाड यांची निवड



**चाळीसगाव :** तालुक्यातील भवाळी येथील आदिवासी साहित्यिक सुनील गायकवाड यांची राष्ट्रीय आदिवासी साहित्य महोत्सव दीपू, आसाम येथे निवड झाली आहे. डी.एल.एफ., आसाम तथा जांबली साहित्य फाउंडेशन आयएलएफ दिपूव्दारा आयोजित राष्ट्रीय आदिवासी साहित्य महोत्सव १३ ते १५ जून जिरसोंग असोंग दीपू येथे होणार आहे. या महोत्सवात राष्ट्रीय आदिवासी साहित्य, महाविद्यालय आणि विद्यापीठीय सत्र आयोजित केले आहेत. या आदिवासी साहित्य महोत्सवासाठी साहित्यिक सुनील गायकवाड यांना निमंत्रित केले आहे. या राष्ट्रीय आदिवासी साहित्य संमेलनात सुनील गायकवाड यांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या जीवनावर आधारित आदिवासी साहित्य अकादमी द्वारा 'जोहार' नावाचा ग्रंथ प्रकाशित होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा ग्रंथ हिंदी व मराठीतून पहिल्यांदाच प्रकाशित होत आहे. 'जोहार' ग्रंथ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या जीवन संघर्षाचा जीवनग्रंथ आहे. यापूर्वी सुनील गायकवाड यांचे भोंगऱ्या, गल्लुर, तारपा, भिलाटी, कोलदांडा, पावरी, कोयता, मासोली, डकैत देवसिंग भिल के बच्चे, बाडगी नी धार, आदिवासी इतिहास व संशोधन पुस्तके प्रकाशित झाले आहेत. सन २०२२ ते २०३२ हे दशक संयुक्त राष्ट्र संघटना युनोने आदिवासी भाषा दशक जाहीर केले आहे. या महोत्सवात भारतीय आदिवासी भाषा व संवर्धनाबाबतीत राष्ट्रीय स्तरावरील आदिवासी साहित्यिकांना निमंत्रित केले आहे.

### प्रद्युम्न जोशी याचे दहावीच्या परीक्षेत यश



**जळगाव :** येथील उज्ज्वल स्कूलचा विद्यार्थी प्रद्युम्न ऋषिकेश जोशी याने दहावीच्या बोर्ड परीक्षेत ९३ टक्के गुण मिळवत शाळेतून चतुर्थ क्रमांक मिळविला. प्रद्युम्न हा सद्‌गुरू दादा महाराज जोशी (जळगाव) यांचा पौत्र असून, ऋषिकेश जोशी व रागिणी जोशी यांचा सुपुत्र आहे. त्याचा शाळा व जळगाव शहरातील विविध घटकांकडून सत्कार करण्यात आला.



### ऑपरेशन सिंदूर अभियानांतर्गत एरंडोल येथे रक्तदान शिबिर

**एरंडोल :** येथे भाजप व सर्व शहरवासी मिळून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात जळगाव रेड प्लस या संस्थेने रक्त संकलनाचे काम केले. शिबिरात एकूण ३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या वेळी माजी नगराध्यक्ष रमेशसिंग परदेसी, दशरथ महाजन, राजेंद्र चौधरी, माजी नगरसेवक योगेश देवरे, रामदास (भगत) चौधरी, संदीप बोडरे, नीलेश परदेशी, पिंटू राजपूत, अरुण महाजन, बाजीराव पांढरे, सुनील महाजन, विक्की खोकरे, दीपक महाजन, श्याम ठाकूर, दिगंबर महाजन यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.



### घोडगावचा शहीद जवान सुनील पाटीलच्या स्मारकास केंद्रीय राज्यमंत्री खडसे यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, २१ मे**

तालुक्यातील घोडगाव येथील जवान सुनील धनराज पाटील हे वीरगतीस प्राप्त झाले होते. नुकतेच त्यांच्या मूळ गावी त्यांचे स्मारक उभारण्यात आले असून या स्मारकास केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी भेट देऊन शहीद जवान यांना श्रद्धांजली अर्पण केली.

या वेळी त्यांनी शहीद जवान यांच्या परिवारातील सदस्य, वीरमाता व वीरपत्नी यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर विजय पांडुरंग पाटील यांच्या घरी जाऊन गावातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधला. या वेळी प्रणिता पाटील, विजय पाटील, प्रकाश रजाळे, राजेंद्र पाटील, जागृती पाटील यांनी ना. रक्षा खडसे यांचा सत्कार केला. या वेळी प्रकाश रजाळे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी अनेक शेतकऱ्यांनी शेती रस्त्यासंदर्भात अडचणी सांगितल्या. त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना. रक्षा खडसे यांनी सांगितले.

या वेळी तहसीलदार भाऊसाहेब थोरात, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर पाटील, माजी सभापती आत्माराम म्हाळके, शहराध्यक्ष नरेंद्र पाटील, ग्रामीण पश्चिम अध्यक्ष कांतीलाल पाटील, पूर्व अध्यक्ष पिंटू पावरा, भाजपा कार्यकर्ते भरत सोनगीरे, माजी जि.प. सदस्य गजेंद्र सोनवणे, बाजार समितीचे मनोज सनेर, पंकज पाटील, प्रभाकर पाटील, राजेंद्र पाटील, विजय पाटील, युवराज कोळी, जवरीलाल जैन, गुणवंत पाटील, उद्धव पाटील, अनिल पाटील, विनोद पाटील, प्रल्हाद मराठे, बाबुलाल पाटील, विजय रजाळे, भूषण पाटील यांच्यासह चोपडा तालुक्यातील भाजपा पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आडगाव-चिंचोली रस्त्यावर भीषण अपघात आजोबा ठार, तर १६ वर्षीय नातू गंभीर

**तभा वृत्तसेवा**
**यावल, २१ मे**

तालुक्यातील आडगाव येथून आपल्या १६ वर्षीय नातवासह आजोबा चिंचोली येथे दहावीच्या निकालाची मार्कशीट घेण्यासाठी दुचाकीने जात होते. दरम्यान, त्यांच्या दुचाकीला चिंचोली गावाजवळील आडगाव फाट्यावर पीकअप वाहन क्रमांक एमएच-०४- केएफ-८४४० वरील अज्ञात चालकाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातामध्ये आजोबा जागीच ठार झाले तर नातू गंभीर जखमी झाला आहे. सुभाष बाबुराव पाटील (वय ७०) असे मयताचे नाव आहे, तर गंभीर जखमी झालेल्या कल्पेश उत्तम पाटील (वय १६) असे नातवाचे नाव आहे. हा अपघात मंगळवारी (२० मे) दुपारी घडला.



मयत सुभाष पाटील



जखमी कल्पेश पाटील

यावल तालुक्यातील आडगाव येथील रहिवासी सुभाष बाबुराव पाटील (वय ७०) हे दुचाकी क्रमांक एमएच-०४- बीएक्स-४५६८ द्वारे आपल्या सोबत नातू कल्पेश उत्तम पाटील (वय १६) याला घेऊन चिंचोली येथील विद्यालयात इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आणि मार्कशीट घेण्यासाठी जात होते. दरम्यान चिंचोली गावाजवळील आडगाव फाट्यापासून काही अंतरावर त्यांच्या दुचाकीला पिकअप वाहन क्रमांक एमएच-०४-केएफ-८४४० वरील अज्ञात चालकाने धडक दिली. या अपघातामध्ये सुभाष पाटील हे जागीच मरण पावले तर कल्पेश पाटील याला गंभीर दुखापत झाली आहे. अपघाताचे वृत्त कळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली व अपघाताची माहिती यावल पोलिसांना कळविण्यात आली.

घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक मकसूद शेख, हवालदार संदीप सूर्यवंशी यांनी प्रत्यक्ष भेट दिली. अपघाताचा पंचनामा केला. तत्पूर्वी अपघातात गंभीर दुखापतग्रस्त कल्पेश पाटील यास पुढील उपचारांसाठी जळगावच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. मयत सुभाष पाटील यांचा मृतदेह यावल ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता.

या अपघातासंदर्भात यावल पोलीस ठाण्यात वासुदेव बाबुराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पिकअप वाहनावरील अज्ञात वाहन चालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताचा तपास यावलचे पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मकसूद शेख व पोलीस करीत आहेत.

## पंतप्रधानांच्या हस्ते आज अमृत भारत अंतर्गत सावदा स्टेशनचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव २१ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत देशातील १०३ स्थानकांचे लोकार्पण होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १५ स्थानकांचा समावेश आहे. यात सावदा रेल्वे स्थानकाचेही लोकार्पण होणार असून याप्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे उपस्थित राहणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेच्या सेवा आणि पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी सरकार कटिबद्ध असून महाराष्ट्रात सध्या रु. १,५५,८७४ कोटींच्या प्रकल्पांवर काम सुरू आहे. आगामी आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात राज्याला रु. २३,७७८ कोटींचा विक्रमी निधी मंजूर झाला आहे. याशिवाय, राज्यातील १३२ रेल्वे स्थानकांना जागतिक दर्जाची रूपरेषा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून संपूर्ण देशातील रेल्वे प्रकल्प झपाट्याने मार्गी लागत असून रेल्वे स्थानके, गाड्या, ट्रॅक आणि सिग्नलिंग व्यवस्था यांना जागतिक दर्जा प्राप्त व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. २०२३-२४ मध्ये पंतप्रधानांनी एक हजाराहून अधिक स्थानकांचे भूमिपूजन केले होते. या पुढील टप्प्यात २२ मे रोजी लासलगाव, परळ, मूर्तिजापूर जंक्शन, चंदा फोर्ट, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, आमगाव, केडगाव, देवळाली, धुळे, सावदा, चिंचपोकळी, वडाळा रोड, माटुंगा, शहाड आणि लोणंद या स्थानकांचा विकास स्थानिक प्रवाशांसह देश-विदेशातील पर्यटकांना आधुनिक, सुरक्षित व सुविधा संपन्न सेवा देणारा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## फैजपुरात बालसंस्कार शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, २१ मे**

झपाट्याने बदलत असलेली दिनचर्या, सोशल मीडियाचा अनावश्यक प्रभाव, मोबाइलचे व्यसन व शस्त्र आणि शास्त्र याबद्दल वाढत जाणारी अनास्था या सर्वांवर सर्वोत्तम सकारात्मक पर्याय म्हणून बालसंस्कार शिबिर आयोजित केले आहे. यातून सक्षम युवा पिढी घडवण्याचे माध्यम बाल संस्कार शिबिरे होतील, असे प्रतिपादन श्रीकृष्ण महानुभाव मंदिर मठाधिपती राजधरबाबा पूजदेकर यांनी फैजपूर येथे बाल संस्कार शिबिराच्या सांगता प्रसंगी केले.

बालसंस्कार शिबिरात फैजपूरसह पंचक्रोशीतील तथा मुंबई, चोपडा, अमळनेर येथील शिबिरार्थींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. शिबिरातील विविध उपक्रमात जसे चित्रकला स्पर्धा, भगवद्‌गीता अध्याय पठण, लाठी-काठी प्रशिक्षण आदी स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या शिबिरार्थींचे बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले. सर्वच सहभागी शिबिरार्थींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या वेळी ज्यांनी शिबिराला यशस्वी करण्यासाठी सेवा दिली अशा सेवाव्रतींचाही सन्मान करण्यात आला. ध्यानधारणा योगा यांचे प्रशिक्षण देणारे गुणवंत जोशी, लाठीकाठी प्रशिक्षण देणाऱ्या परी जीवराम महाजन, अथपासून इतिपर्यंत शिबिरात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्रज्ञा चौधरी यांचा सन्मान करण्यात आला.



**यांची होती उपस्थिती**

या वेळी मंचावर उल्हास निंबा महाजन, डॉ. शैलेंद्र खाचणे, डॉ. भरत महाजन, गुणवंत जोशी, कॅप्टन डॉ. राजेंद्र राजपूत आदी मान्यवर, शिबिरार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा चौधरी यांनी केले तर आभार यशवंत कपाटे यांनी मानले. बालसंस्कार शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीकृष्ण महानुभाव मंदिराचे उपासक व सेवेकरी यांनी परिश्रम घेतले.

## फैजपूरला श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा दर्शन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, ता. यावल, २१ मे**

ऐतिहासिक फैजपूर नगरीत २० मे रोजी सकाळी अक्कलकोट येथून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांचे आगमन टाळ-मृदंग श्री स्वामी समर्थ संकीर्तनाच्या मोठ्या भक्तिमय जल्लोषात करण्यात आले.

श्रींची पालखी बसस्थानक शिवाजीनगर येथून मार्गस्थ होत हुतात्मा बापू वाणी चौक, सुभाषबाबू चौक, खुशालभाऊ मार्ग, देवी मंदिर मार्गे स्वामी भक्त जितेंद्र ओमप्रकाश वर्मा यांच्या निवासस्थानी येत फुले-रांगोळ्यानी सजविलेल्या मंचावर पालखी विराजमान करण्यात आली.



जितेंद्र वर्मा यांनी सपत्नीक पादुकांची वेदमंत्रोच्चारात महापूजा, सामूहिक महाआरती, नामजप मंत्र केले. शेकडो स्वामी सेवेकरी भक्तांनी पालखी पादुकांवर पुष्प अभिषेक करीत दर्शन घेऊन नतमस्तक होत कृपा आशीर्वाद घेतले.

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथून ही पालखी महाराष्ट्र भ्रमंतीचे सलग २८ वे वर्ष आहे. अल्पोपाहार व प्रसाद वितरण करण्यात आले.

याप्रसंगी अक्कलकोट येथील पालखी संयोजक सीताराम कल्याणी, पुजारी संजय कुलकर्णी, नरेंद्र नारखेडे, विजयकुमार परदेशी, अनिल लढे, सुरेश परदेशी, डॉ. उमेश चौधरी, डॉ. सुनील पाटील, राजेंद्र महाजन, पप्पू चौधरी, अनंत नेहेते, प्रा. पद्माकर पाटील, रमेश सराफ, रवी सरोदे, सिद्धेश्वर वाघुळदे, किरण चौधरी, किरण वाघुळदे आदी उपस्थित होते.



# फैजपूरला काँग्रेसच्या तिरंगा वीरस्मरण यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, ता. यावल, २१ मे**

जळगाव जिल्हा ग्रामीण काँग्रेसच्या वतीने आयोजित 'तिरंगा वीर स्मरण यात्रे'ला फैजपूर येथे बुधवारी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशभक्तीचा संदेश देणारी ही यात्रा ध. ना. महाविद्यालयातील प्रेरणास्तंभ येथून सुरू होऊन हुतात्मा बापू वाणी चौकातील स्वातंत्र्य स्मारकापर्यंत काढण्यात आली.

यात्रेच्या माध्यमातून २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय सेनेने पाकिस्तानला दिलेल्या प्रत्युत्तराचा गौरव करण्यात आला. या कारवाईत भारतीय सेनेने शेकडो अतिरेक्यांचा खात्मा केला. या भारतीय सेनेच्या अभ्यासपूर्ण मोहिमेमुळे पाकिस्तान हा अतिरेक्यांचा आश्रयदाता देश असल्याचे पुन्हा एकदा जगासमोर स्पष्ट झाले.

यात्रेदरम्यान हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना व निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या बलिदानाचा सन्मान करत उपस्थितांनी एक मिनिट मौन पाळले. यावेळी काँग्रेस अधिवेशन स्थळ प्रेरणास्तंभ येथे देशाचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

**यांचा होता सहभाग**

कार्यक्रमात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, रावेर-यावलचे माजी आमदार शिरीष चौधरी, युवानेते धनंजय चौधरी, जि.प.चे माजी सदस्य प्रभाकर सोनवणे, डॉ. राजेंद्र पाटील, पं. स.चे माजी सभापती लीलाधर चौधरी, शेखर पाटील, संजू जमादार, राजू सवरने, हरीश गनवाणी, जावेद जनाब, बापू पाटील, जिजाबराव चौधरी, हयात शेठ, डॉ.सुरेश चौधरी, आशुतोष पवार, काँग्रेस शहराध्यक्ष रियाज शेख मेंबर, माजी उपनगराध्यक्ष केतन किरंगे, कलिम मनियार, देवेंद्र बेंडाळे, अय्युब मेंबर, भूपेंद्र जाधव, अनिल जंजाळे, डॉ.दानिश शेख, युवक शहराध्यक्ष वसीम तडवी, योगेश भावसार, वसीम जनाब, ज्ञानेश्वर कोळी, भागवत सूर्यवंशी, सुनील पाटील, संजीव सोनवणे, नंदकिशोर सांगाळे, भरत पाटील, दिनेश पाटील, पुरुषोत्तम पाटील, रवींद्र निकम, शैलेश बोदडे, संजय पाटील, शरद पाटील, देविदास पाटील, उद्धव वाणी, जगदीश गाढे, प्रदीप सोनवणे, मनोहर महाले, गोविंद देशमुख, एजाज, रामदास लहासे, ज्ञानेश्वर बऱ्हाटे, पिरन तडवी, हमीद शेठ, विठ्ठल चौधरी, नदीम पिंजारी, भरत चौधरी, नईम शेख, भरत चौधरी, मनोहर चौधरी, कबीर मेंबर, कबीर मोमीन मेंबर, उमर कच्छी, हाकीम शेठ, अक्कउल्ला शेठ, आसिफ मेकॅनिक, गयास शेख, यशवंत धनके, संतोष पाटील, सउद शेख, साजिद मेंबर, सफिक कच्छी, हानिफ पहिलवान, इकलास सय्यद, गुरव व काँग्रेसचे पदाधिकारी, नागरिक व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## सरस्वती MG, जळगावचा ऐतिहासिक कामगिरीचा विक्रम ४००+ कार्सची विक्री

**भारतातच बनलेल्या MG गाड्यांना उत्कृष्ट प्रतिसादाने 'मेक इन इंडिया'ला बळ**

**जळगाव :** उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य MG डीलर सरस्वती MG जळगाव यांनी चारशीहून अधिक MG कार्सची विक्री करून व्यवसायात एक नवे शिखर गाठले आहे. ही आकडेवारी सरस्वतीसाठी अभिमानास्पद ठरली आहे. संपूर्ण उत्तर महाराष्ट्रासाठी ही कामगिरी आदर्शवत ठरत आहे.

ग्राहकांच्या पसंतीस उतरलेली मॉडेल्स म्हणजे MG Hector, Gloster, ZS EV, Astor, Comet EV, तसेच Windsor आणि Windsor Pro. या मॉडेल्सना त्यांच्या सुरक्षितता, स्टायलिश डिझाईन, आधुनिक फीचर्स व उत्तम इंधन कार्यक्षम तेमुळे अप्रतिम प्रतिसाद मिळाला आहे. विशेषतः MG Comet EV आणि MG Windsor EV या मॉडेल्ससाठी लाइफटाईम बॅटरी वॉरंटी (अटी व शर्ती लागू) ही सुविधा देण्यात आली आहे. ही अनोखी संकल्पना भारतात सर्वप्रथम MG Motors ने सादर केली आहे. पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन समाधानकारक पर्याय म्हणून या कार्सना ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

JSW आणि MG India यांच्यात ६ मार्च २०२४ रोजी ऐतिहासिक भागीदारी होऊन भारतीय ऑटोमोबाईल क्षेत्रात नवा अध्याय भारतातील नामवंत उद्योगसमूह JSW Group आणि जागतिक दर्जाचा



ब्रिटिश ऑटो ब्रँड Morris Garages (MG) India यांनी ६ मार्च २०२४ रोजी अधिकृतपणे रणनीतिक भागीदारीची घोषणा केली. या भागीदारीमुळे उत्पादन, चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, स्मार्ट मोबिलिटी आणि 'मेक इन इंडिया' धोरणाला नवे बळ मिळाले आहे.

सरस्वती ग्रुप जळगावकरांच्या सेवेत मागच्या ७ दशकांपासून म्हणजेच सन १९५१ साली कै. तुलसीदास टेकवानी यांनी सुरू केलेल्या दुधाच्या व्यवसायापासून सरस्वती डेअरी ते सरस्वती एमजी. सरस्वती ग्रुप हे नाव केवळ डीलरशिपपुरते मर्यादित नसून, सरस्वती डेअरी, सरस्वती फोर्ड, सरस्वती एंटरप्रायझेस व सरस्वती MG या विविध क्षेत्रांतही उत्तम सेवा देणारा एक विश्वासार्ह ब्रँड आहे गुणवत्तेवर आधारित सेवांमुळे सरस्वती ग्रुपने जळगाव जिल्ह्याच्या ग्राहकविश्वात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : सरस्वती, जळगाव

## डोंगर कठोरा येथे बालसंस्कार शिबिर
### कीर्तन सोहळ्यानिमित्ताने दिंडी सोहळा

**यावल :** तालुक्यातील डोंगर कठोरा येथे श्री गुरुदेव दत्त गुरुकुल आश्रम माळसांगवी संचलित ह.भ.प. श्री महंत देवेंद्रदास महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद मराठी शाळेत १ ते २१ मे या कालावधीत बालसंस्कार शिबिर व कीर्तन सोहळा पार पडला. यातून संस्कारी बाल कीर्तनकार, नीतिवान, शूरवीर, साहसी व आदर्श व्यक्तिमत्त्वे निर्माण व्हावीत हा उद्देश आहे. यातून एक नवीन भारताचा उदय व्हावा हा या शिबिराचा उद्देश्य आहे. या शिबिरात गायन, वादन व कीर्तनादी कार्यक्रम बालकीर्तनकारांना शिकविण्यात आले. दरम्यान, या कार्यक्रमाचा परिपाक म्हणून २० मे रोजी दिंडी सोहळा पार पडला. या दिंडी सोहळ्यादरम्यान बालकीर्तनकारांनी पावली, फुगडी व अभंग सादर करून गावकऱ्यांची मने जिंकली.



या दिंडी सोहळ्यात ह.भ.प. रवी पाटील महाराज, ह.भ.प. दत्तात्रय गुरव महाराज, आयोजक ह.भ.प. खुशाल महाराज, ह.भ.प. दिनेश महाराज, ह.भ.प. गणेश महाराज, ह.भ.प. मोहिनी महाराज, डालू फेगडे, दिनकर पाटील, मधुकर पाटील, नितीन पाटील, प्रवीण गाजरे, युवराज फेगडे, डिगंबर तेली, प्रशांत लोहार यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. दरम्यान, बाल संस्कार शिबिर व कीर्तन सोहळ्याचा २१ मे रोजी समारोप झाला. या वेळी महाप्रसाद वाटण्यात आला, असे ह.भ.प. खुशाल महाराज यांनी कळवले आहे.

## देविदास सोनवणे यांचा सूतगिरणी संचालकांच्या बैठकीत सत्कार

**चोपडा :** चोपडा-धरणगाव रस्त्यावरील तापी शेतकरी सहकारी सूतगिरणीच्या आज बुधवारी (२१ मे) झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत नर्मदा परिक्रमा पूर्ण करून घरी आलेले सूतगिरणीचे संचालक देविदास सोनवणे (हातेड बुद्रूक) यांना गौरविण्यात आले.

प्रारंभी मान्यवरांच्या उपस्थितीत पहेलगाम हल्ल्यातील नागरिकांना तसेच भारत-पाकिस्तान युद्धातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. चेअरमन, माजी आमदार कैलास पाटील व व्हाईस चेअरमन प्रल्हाद रामभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सूतगिरणीत फक्त



५००० चात्या कुशल कामगारांच्या माध्यमातून सुरू करण्यात येतील, अशी माहितीही या वेळी कार्यकारी संचालक हेमंत पांडे यांनी दिली.

या बैठकीत एकूण नऊ विषयांवर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. १८ संचालक या वेळी उपस्थित होते. या बैठकीत ज्येष्ठ पत्रकार तथा कवी, लेखक व साहित्यिक रमेश जे. पाटील यांनी लिहिलेले ''नांगर फाळ'' व ''अमरस्वर'' हे काव्यसंग्रह कार्यकारी संचालकांना भेट म्हणून देण्यात आले.

संजय पाटील यांनी प्रास्तविक केले. रमेश नाना सोनवणे, ॲडव्होकेट एस. डी. पाटील, चौधरी, वजाहत अली काझी, राजेंद्र पाटील, के. डी. चौधरी, शशिकांत पाटील, चंद्रकांत पाटील, जवरीलालजी जैन, भारती बोरसे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### तळोदा नगरपरिषदेतर्फे गाळ्यांची लिलाव प्रक्रिया

**तळोदा** : नगरपरिषदेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळ्यांचा लिलाव सोमवारी (१९ मे) नगरपरिषद कार्यालयात पार पडला. नंदुरबार पालिकेचे मुख्याधिकारी राहुल वाघ अध्यक्षस्थानी होते. लिलाव प्रक्रिया खुल्या व पारदर्शी पद्धतीने पार पडली. लिलावाचा सर्व्हे नंबर २ व ३, आरक्षण क्रमांक ६, शॉपिंग कॉम्प्लेक्समधील तळमजल्यावरील (जुन्या शॉपिंगजवळील जागा) नऊपैकी सर्व गाळ्यांचा लिलाव यशस्वी झाला. सर्व्हे नंबर २ व ३-ब, आरक्षण क्रमांक ६, शॉपिंग कॉम्प्लेक्समधील पहिल्या मजल्यावरील ५९ पैकी तीन गाळ्यांचा लिलाव यशस्वी झाला. सर्व्हे नंबर २५/२, तळमजल्यावरील रस्त्यालगतच्या चारपैकी सर्व चार दुकानांचा लिलाव यशस्वी झाला. सर्व्हे नंबर २५/२, पहिल मजल्यावरील हॉलसाठी कोणतीही मागणी न आल्यामुळे तो अद्याप लिलाव प्रक्रियेत अपूर्ण आहे. लिलाव प्रक्रियेमुळे नगरपरिषदेच्या महसुलात वाढ होणार असून, ही प्रक्रिया भविष्यातही अशाच पारदर्शकतेने राबविण्यात येईल, असे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रसंगी मुख्याधिकारी विक्रम जगदाळे, प्रशासकीय अधिकारी कमलेश काळे, कर निरीक्षक दीपक पाटील, लेखापाल लखन कंडरे, नगररचनाकार सनी ठाकरे, स्वच्छता निरीक्षक किशोर मोरे, संगणक अभियंता सुशीलकुमार बोधडे, अश्विन परदेशी, राजेंद्र माळी, दिगंबर माळी, नारायण चौधरी, नितीन शिरसाट, अजय वाघ, बटू नगराळे, जगदीश सागर आदी उपस्थित होते.



### धुळ्याच्या विद्यार्थ्यांचे एनपीटीईएलमध्ये यश

**धुळे** : येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी एनपीटीईएल प्रोग्राम ऑन टेक्नॉलॉजी एन्हान्स लर्निंग परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. ही परीक्षा केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयातर्फे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध विषयांमध्ये परीक्षेत सहभाग घेतला. ६७ विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र प्राप्त केले असून, त्यात ११ विद्यार्थ्यांना रौप्य प्रमाणपत्र, तर ३१ विद्यार्थ्यांना एलिट ग्रेड प्राप्त झाली आहे. याव्यतिरिक्त काही विद्यार्थ्यांनी कोर्सेरा, इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड, युडेमी अशा ऑनलाइन स्तरावरील परीक्षांमधून प्रमाणपत्र मिळविले. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या परीक्षेची नोंदणी व इतर काही संबंधित बाबींबाबत समन्वयक प्रा. उमाकांत मांडवकर यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, स्नेहा पारीख, राजगोपाल भंडारी, संजय अग्रवाल, अजय पसारी, प्राचार्य डॉ. नीलेश साळुंके, डॉ. मकरंद शहाडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करताना अशा शैक्षणिक उपक्रमांनी विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान व कौशल्य वृद्धिंगत होत असल्याचे सांगितले.



### दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा

**नंदुरबार** : येथील नगरपालिकेतर्फे दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. नगरपालिकेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात देशाच्या हिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करू, अशी प्रतिज्ञा घेण्यात आली. या वेळी लेखा अधिकारी वैशाली जगताप, लेखापाल प्रतिभा गवळी, मनोहर म्हात्रे, नीलेश बोरसे, जयसिंग गावित, गणेश गावित, सुभाष मराठे, राजेश परदेशी, विपिन शेळके, मानसी भापकर, दीपक पाटील, गणेश परदेशी, मोतीलाल मराठे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### धुळे एसव्हीकेएम अभियांत्रिकीत करिअर मार्गदर्शन सत्र

**धुळे** : येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनीयरिंग विभाग व बंगळुरू येथील आयएमएस गेट अकादमीच्या सहकार्याने प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेलतर्फे 'गेटद्वारे करिअर संधी' या विषयावर करिअर मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. मुख्य मेंटर प्रतीक मिश्रा प्रमुख वक्ते होते. त्यांनी गेट परीक्षेचे महत्त्व, एम. टेक प्रवेश या विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. अचल अग्रवाल, प्रा. दीपकसिंग बघेल यांच्या स्वागत भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मोहक रेलन, कीर्ती देवरे आणि नेहा जिसेजा या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्राचार्य डॉ. नीलेश साळुंके, विभागप्रमुख डॉ. श्रीकांत रंधवणे यांचे मार्गदर्शन लाभले.



### धुळ्यात 'मॅकलॉड्स'तर्फे 'प्लेसमेंट ड्राइव्ह'

**धुळे** : येथील एसव्हीकेएम फार्मसी महाविद्यालयात मॅकलॉड्स फार्मास्युटिकल्स या औषधनिर्माण कंपनीतर्फे प्लेसमेंट ड्राइव्ह घेण्यात आला. त्यात बी. फार्म आणि एम. फार्मच्या अंतिम वर्षातील २२० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होत ज्ञान, कौशल्य आणि तयारी यांची प्रात्यक्षिके सादर केली. प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी सांगितले की, केवळ पुस्तकांमधील शिक्षण पुरेसे नसते. उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, स्पर्धात्मकता आणि व्यावसायिक संवाद या कौशल्यांचे प्रशिक्षण देणे हे ध्येय आहे. अशा प्लेसमेंट उपक्रमांमुळे विद्यार्थी शिक्षण पूर्ण करतानाच रोजगाराच्या दिशेने वाटचाल करतात, हे विशेष आहे. प्रा. करण शर्मा, डॉ भूषण द्रवंकर, प्रा.सुमित राठोड, डॉ. मृगेंद्र पोतदार, प्रा. जुगल मंदन, प्रा. श्रद्धा सुखदेवे व प्रा. गौरव पाटील यांनी नियोजन केले.



### स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**दोंडाईचा (शिंदखेडा)** : महाराष्ट्र स्टेट बोर्डतर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत येथील स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. गुंजन अनिल दर्डा (८५.६०) प्रथम, तेजस्विनी अशोक शिंदे (८३) द्वितीय, मिताली संजय बडगुजर (८३) तृतीय, हर्ष चंद्रलाल कुकरेजा (८२.६०) चौथा, यश पुंडलिक सूर्यवंशी (८२) पाचवा व कोमल दिलीप कोळी (८१.८०) सहावी आली. यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेचे चेअरमन, माजी आमदार वृक्षमित्र बापूसाहेब रावल, सचिव क्षिप्रा रावल यांनी गौरव केला.

# धुळ्याच्या बाजार समितीत बेकायदेशीर गोवंश तस्करी!

## आमदार अग्रवालांकडून पर्दाफाश; शेकडो पशुधनाचे वाचविले प्राण; सूत्रधारांवर कठोर कारवाईचे निर्देश

**धुळे** : आमदार अनुप अग्रवाल यांनी मंगळवारी (२० मे) रात्री साडेअकराच्या सुमारास येथील बाजार समितीच्या आवारात होणाऱ्या बेकायदेशीर गोतस्करीचा पर्दाफाश केला. यामुळे शेकडो गोवंशांचे प्राण वाचविण्यात यश आले असून, हा बेकायदेशीर गोतस्करीचा धंदा करणाऱ्यांवर व यामागील सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश आमदार अग्रवाल यांनी आझादनगर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना दिले.

दरम्यान, गोतस्करी उघडकीस आणल्यानंतर पोलिसांनी सुमारे ११ गायी, ५६ बैल, ४९ गोऱ्हे, ९ वासरे, २ पारडू आदी जनावरे ताब्यात घेत ती चाळीसगाव रोडवरील नवकार गोशाळेत पाठविली. या प्रकरणी पोलिसांकडून चौकशी सुरू असून, अद्याप कोणाविरुद्ध गुन्हा दाखल झालेला नाही.

**१२७ पशुधन नवकार गोशाळेत**

मंगळवारी (२० मे) रात्री अशीच ईअर टॅग नसलेली शेकडो पशुधन बाजार समितीत खरेदी-विक्रीसाठी दाखल झाल्याची व ती तेथून अवैध कत्तलीसाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती आमदार अग्रवाल यांना मिळाली. त्यानुसार रात्री साडेअकराच्या सुमारास आमदार अग्रवाल यांच्यासह भाजप ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष हिरामण गवळी, भिकन वराडे, धीरज परदेशी, प्रणील मंडलिक, भुराभाऊ माळी यांच्यासह गोरक्षक मोठ्या संख्येने बाजार समितीत दाखल झाले. त्यांनी तेथे ईअर टॅग नसलेली सुमारे १२७ गुरे खरेदी-विक्रीसाठी आणली असल्याचे पाहिले. याबाबत आमदार अग्रवाल यांनी तातडीने पोलीस प्रशासनाला माहिती दिली. त्यानुसार जिल्हा पोलीस उपअधीक्षक राजकुमार उपासे, आझादनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती पवार, पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याचे साहाय्यक निरीक्षक तुषार देवरे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शरद लेंडे यांच्यासह आझादनगर पोलीस ठाण्याच्या शोधपथकातील कर्मचारी दाखल झाले. त्यांनी सर्व गुरे ताब्यात घेत ती चाळीसगाव रोडवरील नवकार गोशाळेत पाठविली.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

शहरातील पारोळा रोडवरील बाजार समितीचे आवार जणू बेकायदेशीर गोवंशांची खरेदी-विक्रीचे केंद्र झाल्याची तक्रार श्री शिवछत्रपती गोरक्षा जनआंदोलनचे संस्थापक संजय शर्मा व प्राणीन फाउंडेशनच्या संस्थापक नेहा पटेल यांच्या मार्गदर्शनात प्रणील मंडलिक, भुराभाऊ माळी व त्यांच्या गोरक्षकांच्या पथकाने आमदार अनुप अग्रवाल यांच्याकडे केली. विशेष म्हणजे येथील बाजर समितीत खरेदी-विक्रीसाठी आणण्यात येणाऱ्या प्रत्येक पशुच्या कानाला बिल्ला (ईअर टॅग) असणे बंधनकारक आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट आदेश असताना, तसेच गोवंश संरक्षण व वाहतुकीचे विविध कायदे असतानाही येथील बाजार समिती प्रशासनाला पशुधनाचा बाजार भरविताना या कायद्यांचा विसर पडला होता. हे कायदे सर्रास पायदळी तुडवीत राजरोसपणे विनाईअर टॅग असलेल्या पशुधनाची बेकायदेशीर वाहतूक व खरेदी-विक्री सुरू होती. यातून छुप्या मार्गाने ही जनावरे सर्रासपणे कत्तलीसाठी पाठविण्यात येत होती.



### आमदार अग्रवाल यांचे कठोर कारवाईचे आदेश

आमदार अग्रवाल यांनी या वेळी पोलीस अधिकाऱ्यांना संबंधितांवर कठोर कारवाईचे आदेश दिले. ते म्हणाले, की धुळे बाजार समितीत खरेदी-विक्रीसाठी येणाऱ्या प्रत्येक पशुधनाच्या कानाला बिल्ला असणे बंधनकारक आहे. त्यासाठी पशुपालक व व्यापाऱ्यांनी पशुवैद्यकीय केंद्रातून पशुधनांच्या कानाला १२ अंकी ईअर टॅग मारून त्याची ऑनलाइन नोंदणी करावी, असा जिल्हाधिकाऱ्यांचा २५ एप्रिल २०२४ चा आदेश आहे. असे असताना धुळे बाजार समितीत नियमांना पायदळी तुडविण्याचे काम सुरू आहे. बाजार समिती प्रशासनानेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवीत गुरांच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीला प्रोत्साहन दिले आहे. यामुळे बाजार समितीच्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांसह यातील सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी, अशी सूचनाही आमदार अग्रवाल यांनी केली.



# जलस्रोत बळकटीकरण करणे ग्रामपंचायत प्रशासनाची जबाबदारी

## विवेक गुंड : नंदुरबारला जि. प., पं. स.तर्फे कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, २१ मे**

जलस्रोत व्यवस्थापन जलजीवन मिशनचा महत्त्वाचा भाग असून, प्रभावी जलव्यवस्थापनासाठी जलस्रोतांची सुरक्षितता व शाश्वततेला एकत्रितपणे करणे महत्त्वाचे आहे. सुरक्षितता, पाण्याची तत्काळ उपलब्धता सुनिश्चित करते तर शाश्वतता हमी देते की, हे स्रोत भविष्यातील पिढ्यांसाठी कार्यरत राहतील, पुढील पिढीसाठी जलस्रोत बळकटीकरण करणे, ही ग्रामपंचायत प्रशासनाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गुंड यांनी केले.

जिल्हा परिषद स्वच्छता व पाणीपुरवठा विभाग, पंचायत समिती व नवनिर्माण सर्व समाजहितार्थ संस्था यांच्यातर्फे शहरातील हॉटेल डी. एस. के. सभागृहात आयोजित जलस्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण या विषयांवरील दोनदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जयवंत उगले अध्यक्षस्थानी होते. सुनील पाटील, योगेश कोळपकर, राजेश ईशी, सुलभा महिरे आदी उपस्थित होते. कार्यशाळेत १२ ग्रामपंचायतींमधील ६० प्रशिक्षणार्थी सहभागी होते. कार्यशाळेसाठी गटविकास अधिकारी जयवंत उगले, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे कार्यक्रम अधिकारी, क्षमताबांधणीतज्ज्ञ सुनील पाटील, योगेश कोळपकर यांचेही मार्गदर्शन लाभले. ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीतील प्रत्येक ग्रामपंचायतीतील पाच सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम समन्वयक प्रतीक कदम यांनी प्रास्ताविक केले. सुषमा सूर्यवंशी यांनी आभार मानले.

### जलस्रोतांच्या विषयांवर मंथन, मार्गदर्शन

जलस्रोतांचे बळकटीकरण करणे व शाश्वतता वाढवण्यासाठी व्यवस्थापनाने गांभीर्याने लक्ष घालणे गरजेचे आहे. यासाठी गावातील अनुभवी शेतकऱ्यांचा सहभाग घ्यावा, असेही आवाहनही विवेक गुंड यांनी केले. कार्यशाळेत जलस्रोत आणि त्यांचे महत्त्व, स्रोत शाश्वतता, स्रोत व्यवस्थापनाची सद्यःस्थिती, समुदाय आधारित स्रोत बळकटीकरण, भूजल पुनर्भरणाचे महत्त्व, भूजल पुनर्भरणाच्या पद्धती, जलचक्र आणि भूपृष्ठावरील पाणी, भारतातील जलधोरण, राज्य जलधोरण, प्रमुख पाणी योजना, भूजल संशोधनाच्या पद्धती आणि तंत्रे, भूजल मोजण्याच्या पद्धती, भूजल डेटा संकलनाच्या प्रमुख पद्धती, जलस्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण, पर्जन्यमापक प्रणाली व त्याचे महत्त्व, पाण्याची अंदाजपत्रक प्रक्रिया, भूजल पुनर्भरणाचे महत्त्व, भूजल पुनर्भरणाच्या पद्धती आणि तंत्रे, भूजल पुनर्भरणाचे फायदे, पर्यवेक्षण आणि गुणवत्ता नियंत्रण, भूजल पुनर्भरणासाठी वापरली जाणारी ड्रेनेज लाइन तंत्रे आदी विषयांवर तज्ज्ञ प्रशिक्षक राजेश ईशी, रवी गोसावी, सीमा पाडवी, कचरू अहिरे, संजय वळवी, राकेश वळवी यांनी मार्गदर्शन केले.


# धुळ्यातील पुनर्निर्मित रेल्वेस्थानकाचे आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

## माजी खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रयत्नाने कायापालट

**धुळे** : केंद्र शासनाच्या 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत येथील रेल्वेस्थानकाचा आता कायापालट झाला असून, गुरुवारी (२२ मे) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे या पुनर्निर्मित रेल्वेस्थानकाचे उद्घाटन होणार आहे.

केंद्र शासनाने ऑगस्ट २०२३ मध्ये 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत देशातील विविध रेल्वेस्थानकांची पुनर्निर्माणासाठी निवड केली होती. यात धुळे रेल्वेस्थानकाचा समावेश नसल्याने तत्कालीन खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी धुळे लोकसभा मतदारसंघातील धुळे रेल्वेस्थानकाला केंद्र शासनाच्या 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी यशस्वी पाठपुरावा करून तब्बल १० कोटींचा निधी मंजूर करण्यात यश मिळविले होते. या पुनर्निर्मित धुळे रेल्वेस्थानकाचे गुरुवारी (२२ मे) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.

डॉ. सुभाष भामरे यांनी देशाचे दूरदर्शी नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी व रेल्वेमंत्र्यांकडे सततचा पाठपुरावा करून धुळे रेल्वेस्थानकाचे आधुनिकीकरण, एकात्मिक वाहतूक व जागतिक दर्जाच्या प्रवासी सुविधा मिळाव्यात, असा आग्रह केला होता. पंतप्रधान मोदी यांनी २६ फेब्रुवारी २०२४ रोजी धुळे रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली होती. त्यात नऊ कोटी १३ लाखांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. यात रेल्वेस्थानकात प्रवाशांसाठी विविध लक्षणीय सुविधा वाढविण्यात आल्या आहेत.



"हे अत्याधुनिक सोयी-सुविधांनीयुक्त रेल्वेस्थानक धुळेकरांच्या सेवेसाठी उपलब्ध झाले आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री तसेच मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार. या पुनर्निर्मित रेल्वेस्थानकाचे गुरुवारी (२२ मे) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येत आहे. जिल्हावासियांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे.

**- डॉ. सुभाष भामरे (माजी खासदार, धुळे)**

### रेल्वेस्थानकात या आहेत सुविधा

रेल्वेस्थानकात फलाटावर नवीन सीओपीचे काम. पुरुष आणि महिलांसाठी सामान्य शौचालये. दिव्यांगजन शौचालय. फलाटासह फिरत्या क्षेत्रात नवीन फरशी. नवीन व्हीआयपी कक्ष. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयाचे नूतनीकरण. प्रतीक्षागृह. प्रवेश आणि बाहेर जाण्याचे आकर्षक प्रवेशद्वार. रेल्वेगाड्यांची घोषणा प्रणाली. साइनेज बोर्ड. कोच इडिकोर. ट्रेन इन्फोर्मेशन सिस्टिम बोर्ड. हेरिटेज नॅरो गेज कोचमध्ये नवीन आरक्षण कक्ष. आजूबाजूच्या क्षेत्राचा विस्तार. कारंजे असलेले नवीन मोठे सुंदर बाग. फिरत्या क्षेत्रात आणि कंपाउंड वॉलमध्ये सुंदर सजावटीची रोषणाई. स्टेशन साइन बोर्ड. नवीन वीज उपकेंद्र व वीज जनित्र.





# नंदुरबारला जिल्हा काँग्रेस समितीतर्फे सैन्यदलाच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा

**नंदुरबार** : जिल्हा काँग्रेस समितीतर्फे भारतीय सैन्यदलाच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा काढण्यात आली. शहीद स्मारकाजवळ पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. देशभक्तिपर घोषणा देण्यात आल्या.

काश्मीरमधील पहेलगाम येथील हिंदू पर्यटकांवर केलेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली व 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारतीय सैन्यदलातील वीर जवानांच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरापासून जळका बाजार, शहीद स्मारक, हाटदरवाजा ते पंडित नेहरू पुतळ्यापर्यंत सघोष पथसंचलनाने करण्यात आली. शहीद स्मारकस्थळी शहिदांना मानवंदना देत आदरांजली वाहण्यात आली. यात पथराई (ता. जि. नंदुरबार) येथील के. डी. गावित सैनिकी विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील सैनिकी गणवेशातील विद्यार्थ्यांचा समावेश होता. नेहरू पुतळा, पोलीस मैदानाजवळ सभा घेण्यात आली. या वेळी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी खासदार ॲड. गोवाल पाडवी, माजी मंत्री ॲड. के. सी. पाडवी, आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्रकुमार गावित, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप नाईक, सुभाष पाटील, काँग्रेस किसान आघाडीचे सचिव देवा चौधरी, पंडित पवार, शहादा तालुकाध्यक्ष सुरेश नाईक, काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष एजाज बागवान, जालमसिंग गावित यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाकड्यांनो, कुरापती काढल्या, तर याद राखा

## शिवसैनिकांनी दिला इशारा; नंदुरबारला शिवसेनेतर्फे तिरंगा दुचाकी फेरी

**नंदुरबार** : हिंदुस्थानशी 'पंगा' घेणाऱ्यांची कशी अवस्था होते, हे 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले आहे. पाकड्यांनो, कुरापती काढल्या तर जशास तसे उत्तर आमचे जांबाज सैनिक देतील, असा इशारा शिवसेनेतर्फे तिरंगा दुचाकी फेरीच्या माध्यमातून देण्यात आला. फेरीतून अभिमान, कृतज्ञता, एकात्मतेची भावना निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

काश्मीरमधील पहेलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांनी 'ऑपरेशन सिंदूर' राबवून दहशतवाद्यांची पाळेमुळे खणून त्यांचे मनसुबे उधळून लावले. सैनिकांनी केलेल्या या शौर्यामुळे प्रत्येक नागरिकाचे ऊर भरून आले. सैनिकांचे मनोबल वाढवून त्यांच्यात आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये आणि शिवसेना संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या नेतृत्वात शहरातून तिरंगा दुचाकी फेरी काढण्यात आली. या वेळी 'भारत माता की, जय', 'वंदे मातरम'च्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. या वेळी शिवसैनिक, स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

शहरातील सीबी पेट्रोल पंपापासून सकाळी दहाला तिरंगा दुचाकी फेरीला सुरुवात झाली. ती सिंधी कॉलनी, गिरीविहार गेट, रेल्वे उड्डाणपूल, हाटदरवाजा, महाराष्ट्र व्यायामशाळा, सोनार खुंट, टिळक रोड, जळका बाजार, शिवाजी रोड, मोठा मारुती मंदिर चौक, छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर परिसर, अंधारे चौक, आमदार कार्यालय, जुनी नगरपालिकामार्गे स्टेशन रोड येथून नेहरू चौकापर्यंत काढण्यात आली. फेरी नेहरू चौकात आल्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत झाले. नंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

"तिरंगा यात्रा हे देशप्रेमाचे जिवंत प्रतीक ठरते. हातात तिरंगा, ओठांवर भारत माता की जयच्या घोषणा आणि डोळ्यांत देशासाठी अभिमानाची चमक हे सर्व दृश्य उपस्थितांच्या मनात अभिमान, कृतज्ञता आणि एकतेची भावना निर्माण करतात. विशेषतः युवापिढीमध्ये राष्ट्रभक्ती जागृत करण्याचा हा एक प्रभावी मार्ग आहे.

**- ॲड. राम रघुवंशी, जिल्हाप्रमुख, शिवसेना, नंदुरबार**



# ‘सिंधू’वरून पाकिस्तानात जाळपोळ

## गृहमंत्र्याचे घर जाळले, निदर्शकांवर गोळीबार, चार ठार

**◆ इस्लामाबाद, २१ मे**

भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू जल करार स्थगित केला असला तरी आतापर्यंत पाकिस्तानकडे जाणाऱ्या सिंधू नदीच्या पाण्याच्या प्रवाहावर कोणताही परिणाम झालेला नाही, परंतु त्यापूर्वीच तेथे अराजकतेची परिस्थिती निर्माण झाली. पाकिस्तान सरकारने सिंधू नदीचे पाणी पंजाब प्रांतात वळविण्यासाठी सहा कालवे बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला. सरकारच्या निर्णयाविरोधात सिंध प्रांतात बुधवारी आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी पाकिस्तानच्या गृहमंत्र्याचे घर जाळले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चार नागरिकांचा मृत्यू झाला.

पंजाबकडे पाणी वळविण्याच्या निर्णयाच्या विरोधात आंदोलकांनी मोठ्या प्रमाणात जाळपोळ केली, तसेच सिंधचे गृहमंत्री झियाउल हसन लांजर यांचे नौशहरो फिरोज जिल्ह्यातील घराला आग लावली. याशिवाय घराबाहेर उभी असलेली वाहने पेटवून दिली. यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चार निदर्शकांचा मृत्यू झाला.





### शासकीय मालमत्तेची तोडफोड, महामार्गावरील वाहतूक रोखली

आक्रमक झालेल्या निदर्शकांनी शासकीय वाहने आणि मालमत्तेची तोडफोड केली, तसेच सिंधमधील महामार्गावरील वाहतूक रोखली. राष्ट्रीय महामार्गाजवळील मोरो शहरात असलेल्या मंत्र्यांच्या निवासस्थानाला निदर्शने करणाऱ्यांनी लक्ष्य केले आणि जवळच उभ्या असलेल्या दोन ट्रेलरनाही आग लावली. ■

सरकारकडून पंजाब केंद्रित धोरणे का राबविली जात आहे, असा प्रश्न उपस्थित करीत पाकिस्तानातील सिंध, खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तानमध्ये यापूर्वीच बंडखोरीच्या घटना घडल्या असताना आता पुन्हा सिंध प्रांतात अराजकची परिस्थिती निर्माण झाली. पाकिस्तान सरकारने सिंधू नदीवर सहा कालवे बांधून त्याद्वारे पाणी वळविण्याचा निर्णय घेतला. या कालव्यांद्वारे चोलिस्तानमधील सिंचन व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याविरोधात सिंध प्रांतातील लोक रस्त्यावर उतरले.

**पाकिस्तान पीपल्स पार्टीचा विरोध**

पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे, की सहा कालवे बांधून चोलिस्तान भागात सिंधू नदीचे पाणी वळविण्याला पाकिस्तान पीपल्स पार्टीसह, धार्मिक संघटना, कार्यकर्ते आणि वकिलांकडून तीव्र विरोध होत होता. याशिवाय सिंधमधील इतर पक्षही याच्या विरोधात आहेत. चोलिस्तान कालवा प्रणालीद्वारे चार लाख एकर जमीन सिंचनाखाली आणता येते असे पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे. त्याचवेळी, सिंधमधील लोकांनी सिंधूचे पाणी वळविण्यास विरोध केला. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू आहे.

**काय आहे प्रकल्पाचा वाद?**

- चोलिस्तान कालवा प्रकल्पावरून पाकिस्तान पीपल्स पार्टी अर्थात् पीपीपी यांच्या नेतृत्वाखालील सिंध सरकार आणि केंद्रातील शाहबाज शरीफ सरकार यांच्यात वाद
- कालवा प्रकल्पाची अंदाजे किंमत २११.४ अब्ज रुपये आहे आणि या प्रकल्पांतर्गत ४,००,००० एकर जमीन सिंचनाखाली आणली जाईल
- गेल्या महिन्यात हा प्रकल्प कॉमन इंटरेस्ट कौन्सिल सीसीआयने नाकारला
- सीसीआयच्या निर्णयानंतरही, सिंधमध्ये प्रकल्पाविरुद्ध निदर्शने सुरूच. ■

# इराणच्या अणू ठिकाणांवर हल्ला होण्याची शक्यता

## अमेरिकन गुप्तचर अहवालातून माहिती उघड


**◆ वॉशिंग्टन, २१ मे**

अमेरिकेला मिळालेल्या नवीन गुप्तचर माहितीनुसार इस्रायल इराणच्या अणू सुविधांवर हल्ला करण्याची तयारी करत आहे. ही माहिती एका अमेरिकन वृत्तसंस्थेशी परिचित असलेल्या अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिली.

इस्रायली नेत्यांनी यावर काय निर्णय घेतला आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. इस्रायलने काही कारवाई करावी की नाही यावर अमेरिकन सरकारमध्ये मतभेद आहेत. या अहवालाची त्वरित पुष्टी झाली नाही.

इराणवर इस्रायलचा कोणताही हल्ला झाल्यास राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी मोठा वाद होईल. यामुळे व्यापक प्रादेशिक युद्ध सुरू होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

गुप्तचर यंत्रणेशी परिचित असलेल्या एका सूत्राने सीएनएनला सांगितले की, अलिकडच्या काही महिन्यांत इराणी अणुसुत्रावर इस्रायलच्या हल्ल्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढली आहे. जर अमेरिकेने इराणशी असा करार केला की ज्यामुळे देशाचे सर्व युरेनियम काढून टाकले गेले नाही, तर हल्ल्याची शक्यता जास्त असेल, असे सूत्रांनी सांगितले. इराणच्या अणुकार्यक्रमावर राजनैतिक करार करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे प्रशासन तेहरानशी राजनैतिक चर्चा करत आहे. इस्रायल हल्ला करेल की नाही आणि कसा करेल हे अमेरिका-इराण अणु चर्चेबद्दल जेरुसलेमच्या मतांवर अवलंबून आहे.



# भारताचा आर्मेनियासोबत करार

## तुर्की, अझरबैजानला धक्का, आकाश १-एस क्षेपणास्त्राची दुसरी खेप देणार

**◆ नवी दिल्ली, २१ मे**

तुर्की आणि अझरबैजानसोबतच्या तणावाच्या पृष्ठभूमीवर भारताने आर्मेनियासोबत करार केला. यातंर्गत आर्मेनियाला शस्त्रास्त्रांचा पुरवठा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. भारत आर्मेनियाला आकाश १-एस क्षेपणास्त्र प्रणालीची दुसरी खेप देणार आहे. आकाश १-एस हे जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र असून, त्याची पहिली खेप नोव्हेंबर २०२४ मध्ये आर्मेनियाला देण्यात आली होती. या करारातून भारताचा तुर्की अन् अझरबैजानला शह देण्याचा प्रयत्न आहे.

आर्मेनिया आणि अझरबैजान शेजारील देश असून, त्यांच्यात कट्टर वैर आहे. अझरबैजान पाकिस्तान आणि तुर्की यांच्या जवळ आहे, तर आर्मेनियाचे भारताशी चांगले संबंध आहेत.

२०२० पासून भारत आणि आर्मेनिया सरकारमधील संरक्षण संबंध सातत्याने वाढत आहेत. हा देश आपल्या पारंपरिक शस्त्रास्त्र पुरवठादार रशियावरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. करारांतर्गत आर्मेनियाला आकाश-१ एस जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीची दुसरी खेप पुरवण्याची योजना आखत आहे. यासोबतच, भारत आर्मेनियाला हॉवित्झर तोफा आणि पिनाका मल्टिपल लॉन्च रॉकेट सिस्टमसह विविध प्रकारची शस्त्रे पुरवण्याच्या योजनेवरही काम करत आहे. युक्रेनविरुद्धच्या युद्धात आर्मेनियाने रशियाला उघडपणे पाठिंबा दिलेला नाही. रशियासोबतच्या संबंधांमध्ये दुरावा वाढत असताना आर्मेनिया भारताच्या जवळ आला असून, आता भारत त्याचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र पुरवठादार बनला आहे.


अर्मेनियाने भारताकडून २०२२-२०२४ दरम्यान त्याच्या एकूण शस्त्रास्त्र खरेदीपैकी ४३ टक्के खरेदी केली.

## बलुचिस्तानात बसवर हल्ला, ४ ठार

**◆ क्वेट्टा, २१ मे**

पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये एका शाळेच्या बसवर आत्मघातकी हल्ला करण्यात आला, यात चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर ३८ जण जखमी आहेत.

विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जात असताना बलुचिस्तान प्रांतातील खुजदार जिल्ह्यात हा हल्ला झाला, अशी माहिती स्थानिक पोलिस उपायुक्त यासिर इक्बाल यांनी दिली. या हल्ल्याची अद्याप कोणीही जबाबदारी स्वीकारलेली नाही. पण बलोच फुटीरतावाद्यांनी हा हल्ला केल्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे.



चित्रबलाक हे पक्षी दलदली, सरोवर आणि भातशेतीत दिवसभर उभे राहून मासोळ्या, बेडूक, साप, गोगलगाय आदी पाण्यातील जीव खातात. भक्ष्य शोधण्यासाठी श्रीहरिकोटा येथील पुलिकत सरोवरात उतरलेला चित्रबलाक ऊर्फ चामढोक ऊर्फ रंगीत करकोचा पक्ष्यांचा थवा.

## चित्रपट वार्ता

### ‘चिडिया’ चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित



**मुंबई :** राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविलेला ‘चिडिया’ हा चित्रपट येत्या ३० मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर समाज माध्यमावर प्रदर्शित झाला आहे. स्मायली फिल्म्स यांनी या चित्रपटाची निर्मिती केली. तर मेहरान अमरोही यांनी चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले. या चित्रपटात विनय पाठक, अमृता सुभाष, श्रेयस तळपदे, इनामूल हक, ब्रिजेंद्र काळा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. संगीत शैलेंद्र बर्वे, संकलन मोहित टाकळकर, कलादिग्दर्शन प्रितेश खुशवाह यांचे आहे. ■

# दहशतवादाविरोधात सर्व देशांनी एकत्र यावे

### भारताने मांडली संयुक्त राष्ट्रांत भूमिका

**◆ न्यूयॉर्क, २१ मे**

सागरी क्षेत्रातील सर्व देशांनी परस्पर वादांवर शांततापूर्ण उपाय शोधले पाहिजे. आंतरराष्ट्रीय संस्थांनी दिलेल्या निर्णयांचा आदर करीत समावेशकता आणि सहकार्य ही भारताच्या सागरी धोरणाची मुख्य तत्वे आहेत. जागतिक शांततेसाठी सर्व देशांनी दहशतवादाविरोधात एकत्र येऊन योजना तयार करण्याची आवश्यकता असल्याचे भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत म्हटले आहे.

मंगळवारी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या उच्चस्तरीय खुल्या चर्चेत बोलताना भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश म्हणाले, सागरी सुरक्षा आणि दहशतवादाविरुद्धची लढाई राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि आर्थिक हितांसाठी महत्त्वाची आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेशातील बदलती परिस्थिती आणि नवीन धोके लक्षात घेता, भारत सातत्याने त्यावर काम करीत आहे. भारताकडे लांब किनारपट्टी, मजबूत नौदल शक्ती आणि सागरी समुदाय आहे. या कारणास्तव भारत एका जबाबदार सागरी शक्तीची भूमिका बजावत आहे.

भारताची रणनीती पारंपरिक धोक्यांना आणि अपारंपरिक धोक्यांना तोंड देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या समुद्री कायद्याच्या तरतुदीनुसार भारत मुक्त, खुल्या आणि नियमांवर आधारित सागरी व्यवस्थेला प्रोत्साहन देत आहे. भारत सागरी क्षमता बांधणी, सागरी रणनीती, सुरक्षा आणि प्रशासन मजबूत करण्यावर काम करत आहे.

### सागरी सुरक्षा भारताच्या आर्थिक विकासाचा कणा



राजदूत हरीश म्हणाले, सागरी सुरक्षा ही भारताच्या आर्थिक विकासाचा कणा आहे कारण आमचे व्यापार मार्ग, ऊर्जा पुरवठा आणि धोरणात्मक हितसंबंध महासागरांशी जोडलेले आहेत. भारत प्रादेशिक राजनैतिकता, मजबूत संरक्षण, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि देशांतर्गत चौकटीचा समतोल साधून पुढे जात आहे. ऑगस्ट २०२१ मध्ये सागरी सुरक्षेवरील पहिल्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या खुल्या चर्चेत पंतप्रधान मोदींनी पाच मूलभूत तत्त्वे मांडली होती. ■

**सायबर हल्ले नवे आव्हान : अँटोनियो गुटेरेस**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी चर्चेत म्हटले की, सागरी सुरक्षेसाठी सर्व देशांनी संयुक्त राष्ट्रांच्या सनद आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करणे आवश्यक आहे. २०२५ च्या पहिल्या तिमाहीत सागरी हल्ल्यांच्या संख्येत ४७.५ टक्के वाढ नोंदली गेली. आशियामध्ये, विशेषतः मलाक्का सामुद्रधुनी आणि सिंगापूरमधील घटनेत दुप्पट वाढ झाली. लाल समुद्र आणि एडनच्या आखातात हुथी बंडखोरांनी व्यापारी जहाजांवर केलेल्या हल्ल्यांमुळे व्यापारावर परिणाम होत आहे. बंदरे आणि शिपिंग कंपन्यांसाठी सायबर हल्ले एक नवीन आव्हान बनले आहे.

# ब्रिटन, युरोपियन युनियनने रशियावर लादले निर्बंध

## झेलेन्स्की म्हणाले, युद्धबंदीसाठी केवळ दबावच काम करेल

**◆ कीव, २१ मे**

ब्रिटन आणि युरोपियन युनियनने रशियावर अनेक नवीन आर्थिक आणि व्यापाराशी संबंधित निर्बंध लादले. यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी ब्रिटिनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांचे आभार मानत म्हणाले की, अशा प्रकारच्या उपायांमुळे दबाव येऊन रशिया युद्धबंदी करू शकेल आणि शांतता निर्माण होईल.

ब्रिटनने रशियन बँका, तेल व्यवसाय, शस्त्रास्त्र पुरवठा आणि प्रचार यंत्रणेशी संबंधित संस्थांना लक्ष्य करून १०० नवीन निर्बंध लादले आहेत. याशिवाय युरोपियन युनियननेदेखील १७ निर्बंध लादले, ज्यामध्ये रशियन लष्करी तंत्रज्ञानावर पूर्णपणे बंदी घालण्याचील घोषणा केली. झेलेन्स्की यांनी ब्रिटिश पंतप्रधानांशी फोनवर चर्चा केली आणि यावेळी त्यांनी यावर भर दिला की आता सर्व देशांनी एकत्र येऊन रशियावर दबाव आणण्याची वेळ आली आहे, विशेषतः अमेरिकेने अधिक कठोर पावले उचलावी जेणेकरून युद्ध रोखता येईल आणि कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करता येईल. झेलेन्स्की यांनी एक्सवर लिहिले की, मी ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर यांच्याशी बोललो. रशियावर शांततेसाठी दबाव आणणाऱ्या नवीन ब्रिटिश निर्बंधांबद्दल मी त्यांचे आभार मानले. आज आपण ब्रिटन आणि युरोपियन युनियनकडून कडक निर्बंध पाहिले आहेत आणि अमेरिकाही त्यात सामील झाली तर ते चांगले होईल.

# बसमध्ये चढणाऱ्या महिलेचे दागिने चोरले

## जिल्हापेठ पोलिसांत चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल



**जळगाव :** बसमध्ये चढताना महिलेच्या बॅगेतील डब्बीत ठेवलेले दागिने चोरट्याने लंपास केले. ही घटना २० मे रोजी दुपारी चारच्या सुमारास शहरातील नवीन बसस्थानकात घडली. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चोपडा तालुक्यातील चहार्डी येथील वरचा पुरा भागात रत्ना प्रताप कंडारे (वय ५२) या वास्तव्यास आहेत. २० मे रोजी त्या मुलीसह तिच्या दोन्ही मुलांसह गावी जाण्यासाठी नवीन बसस्थानक परिसरात आल्या. या वेळी त्यांनी खांद्याला बॅग लटकविली होती. चोपडा बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने बॅगेत ठेवलेल्या प्लास्टिकच्या डबीतील सोन्याचे दागिने लंपास नेले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर महिलेने तत्काळ जिल्हापेठ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नरेश सोनवणे तपास करीत आहेत.

**पारोळा नगरपरिषद कार्यालय, पारोळा जि. जळगांव.**

जा.क्रं./न.पा./पा.पु/६४८/२०२५ दिनांक. २१/०५/२०२५

E-mail:-pmcparolajal@gmail.com Ph.No - (०२५९७)२९२३०१

**जाहीर निविदा सुचना**

तमाम अनुभवी/नोंदणीकृत कंत्राटदार/ठेकेदार यांचेकडून १) न.पा. मालकीचे १६० Kva ट्रांसफार्मर मजुरीसह दुरुस्ती करणे २) पाणीपुरवठा विभागासाठी देखभाल दुरुस्ती साठी ८० hp व १०० hp पंप, मोटार दुरुस्ती करणे. ३) अग्निशमन विभागासाठी आवश्यकते नुसार लागणारे साहित्य पुरविणे. ४) न.प. मालकीच्या वाहनासाठी आवश्यकते नुसार लागणारे टायर पुरविणे याकामांची निविदा मागविण्यात येत आहे. सदर काम ज्यांना करून घ्यावयाचे असतील त्यांनी आपले दराचे कामाची निविदा व्दिलिफाफा पद्धतीने बंद लिफाफ्यात दि. २९/०५/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवावेत. कामसंबंधी विविध अटी शर्ती व निविदा फॉर्म रु.१०० प्रमाणे पाणीपुरवठा विभागात दि. २२/०५/२०२५ पासून उपलब्ध होतील.

**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद पारोळा**

# ईपीएफओने जोडले १४.५८ लाख निव्वळ सदस्य

**◆ नवी दिल्ली, २१ मे**

मार्च २०२५ मध्ये ईपीएफओने १४.५८ लाख निव्वळ सदस्य जोडले. मागील वर्षीच्या तुलनेत यात १.१५ टक्के वाढ झाली आहे, असे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने बुधवारी जारी केलेल्या त्यांच्या वेतन आकडेवारीत म्हटले. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने मार्च २०२५ मध्ये सुमारे ७.५४ लाख नवीन सदस्यांची नोंदणी केली. ती फेब्रुवारी २०२५ च्या तुलनेत २.०३ टक्के वाढली, असे कामगार मंत्रालयाने म्हटले आहे. नवीन सदस्यांच्या संख्येत ही वाढ वाढत्या रोजगार संधी, कर्मचाऱ्यांच्या फायद्यांविषयी वाढती जागरूकता आणि ईपीएफओच्या यशस्वी जनतेपर्यंत पोहोचलेल्या कार्यक्रमांमुळे झाली आहे. अहवालानुसार, १८ ते २५ वयोगटातील ४.४५ लाख नवीन ग्राहक जोडले गेले. ते मार्च २०२५ मध्ये जोडलेल्या एकूण नवीन ग्राहकांच्या ५८.९४ टक्के आहे. या महिन्यात जोडलेल्या १८ ते २५ वयोगटातील नवीन ग्राहकांमध्ये मागील महिन्याच्या तुलनेत ४.२१ टक्के वाढ दिसून आली.

# . . . तर रशियावर आणखी निर्बंध लादणार

## अमेरिकेने दिला इशारा, तणाव वाढण्याची शक्यता

**◆ वॉशिंग्टन, २१ मे**

रशिया जर युक्रेनसोबतचे युद्ध संपवण्यासाठी शांतता चर्चा करण्यास तयार नसेल तर त्याच्यावर नवीन निर्बंध लादले जातील, असा कडक इशारा अमेरिकेने पुतीन यांना दिला आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी सिनेटच्या परराष्ट्र व्यवहार समितीसमोर हे विधान केले.

रशिया युद्धबंदीसाठी आपल्या अटी लेखी स्वरूपात तयार करत आहे. यामुळे पुढील वाटाघाटींचा मार्ग मोकळा होऊ शकतो. पुतिन यांचे खरे हेतू उघड करण्यासाठी आम्ही त्या प्रस्तावांची वाट पाहत आहोत, असे रुबियो म्हणाले. रशिया केवळ युद्ध चालू ठेवू इच्छितो आणि वाटाघाटींमध्ये रस नाही, असे समोर आल्यास नवीन निर्बंध हे आमचे पुढचे पाऊल असेल. राजनैतिक चर्चेवर परिणाम होऊ नये म्हणून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या कोणत्याही निर्बंधांची धमकी देण्याचे टाळू इच्छितात, असेही रुबियो म्हणाले. जर आपण आगाऊ धमक्या देऊ लागलो तर रशिया चर्चेतून मागे हटू शकेल, असे राष्ट्रपतींचे मत आहे, असे ते म्हणाले.

### ट्रम्प आणि पुतिन यांच्यात दोन तास संवाद

अलीकडेच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि पुतिन यांच्यात फोनवरून दोन तास संवाद झाला. या संभाषणानंतर, रशिया आणि युक्रेनने तात्काळ युद्धबंदी संपवून शांतता चर्चा सुरू करण्यास सहमती दर्शविली आहे, असे रुबियो म्हणाले. दोन्ही नेत्यांमधील चर्चा सकारात्मक झाली. दरम्यान, व्हॅटिकनने एक नवीन पुढाकार घेतला आहे आणि या संभाव्य चर्चा आयोजित करण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. ■

# काश्मीरला हवामान विभागाचा अलर्ट

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरला हवामान विभागाने अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पुढील काही दिवसांत जम्मू-काश्मीरमधील लोकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. विशेषतः गुरुवार आणि शुक्रवारी तापमान असामान्यपणे जास्त राहण्याची शक्यता आहे. सामान्यतः थंड मानल्या जाणाऱ्या या प्रदेशात तीव्र उष्णतेचा अंदाज असल्याने लोकांची चिंता वाढली आहे.

# सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढणाऱ्यावर कारवाई

**जळगाव :** अजिंठा चौफुली परिसरात सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढणाऱ्या सागर जीवन आढाळे (रा. यावल) याच्यावर एमआयडीसी पोलिसांनी कारवाई करण्यात आली. त्याच्याकडून शंभर रुपयांचा गांजा व चिलीम जप्त करण्यात आली. याप्रकरणी मजरखान रशीदखान यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार ईश्वर लोखंडे तपास करीत आहेत.

# धरणगाव पंचायत समितीत तक्रार निवारण सभा

**जळगाव :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जिल्हा परिषद आपल्या दारी उपक्रमांतर्गत तालुकास्तरीय तक्रार निवारण सभेस धरणगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



धरणगाव पंचायत समिती सभागृहात बुधवारी (२१ मे) जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुखांनी प्राप्त तक्रारींचे तत्काळ निवारण केले. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आर. एस. लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता गणेश भोगावडे, समाजकल्याण अधिकारी विजय रायसिंग, तालुका आरोग्य अधिकारी प्रमोद पांढरे, सिंचन विभाग अभियंता अमोल पाटील, धरणगाव गटविकास अधिकारी किशोर वानखेडे आदी अधिकारी उपस्थित होते.

या वेळी तक्रारदार स्वतः उपस्थित राहून तक्रारी उपस्थित अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. १६ तक्रारी प्राप्त झाल्या. यात घरकुल योजनेसंदर्भात तांत्रिक स्वरूपाच्या तक्रारी सोडविण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक लोखंडे यांनी स्वतंत्र शिबिराद्वारे मुख्यालयाशी संपर्क साधत तांत्रिक अडचणींचे निवारण केले. लोखंडे यांनी ग्रामसेवकांना मार्गदर्शन करीत नियमित ऑनलाइन अद्ययावत पद्धती राखल्यास घरकुलांच्या कोणत्याही तक्रारी राहणार नाहीत व नागरिकांना देखील घरकुलासंदर्भात माहिती मिळेल यासाठी ग्रामसेवकांनी सजग राहणे गरजेचे आहे. जलजीवन मिशनअंतर्गत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने या वेळी सुरू असलेल्या बांधकामांचा गावनिहाय आढावा घेण्यात आला. ग्रामअधिकाऱ्यांकडून उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे यांनी आढावा घेत सूचना केल्या.

## थोडक्यात महत्त्वाचे...

### शासनाने पाठ्यपुस्तकात संस्कृत भाषेचा समावेश करण्याची मागणी

**धरणगाव :** दिवसेंदिवस बदलणारी व्यवस्था, विद्यार्थी व विद्यार्थिनींची शिक्षणातील गुणवत्ता पाहता सर्वच भाषा अवगत असणे क्रमप्राप्त झाले आहे. बदलत्या काळानुसार व शिक्षण विभागातील अभ्यासक्रमात आजतागायत सर्वच भाषांचा समावेश करण्यात आला असला तरी संस्कृत भाषेच्या अभ्यासापासून विद्यार्थी वंचित आहेत. खरं म्हणजे अभ्यासक्रमात सर्व भाषांचा समावेश असून नव्याने संस्कृत भाषेचादेखील समावेश व्हावा, अशी मागणी जनतेतून होत आहे. आता पुढील काळात पाठ्यपुस्तकातून संस्कृत भाषेचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी जनतेतून पुढे येत आहे. मुख्यमंत्र्यांनीदेखील याचा गंभीर विचार करून निर्णय घ्यावा व भविष्यातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना पहिलीपासून एम. ए. व बी. ए.पर्यंत संस्कृत भाषा सक्तीची करावी, अशी मागणी होत आहे.



### महात्मा फुले हायस्कूलचा ९७ टक्के निकाल मुख्याध्यापकांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार

**धरणगाव :** शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूलचा दहावीच्या शालांत परीक्षेचा निकाल ९७ टक्के लागला. दहावीच्या निकालात सावित्रीमाईंच्या लेकींनी उंच भरारी घेतली आहे. शाळेतून प्रथम नंदिनी तुळशीराम भोई ९० टक्के, द्वितीय चेतना संजय जावरे ८७.६० टक्के, तर तृतीय तेजस्विनी हरी माळी ८७.२० टक्के या विशेष गुण मिळवणाऱ्या विद्यार्थिनींचा मुख्याध्यापक जे. एस. पवार, वर्गशिक्षक पी. डी. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे ज्येष्ठ लिपीक जे. एस. महाजन, पी. डी. बडगुजर, जीवन भोई तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.



### पिंपळगाव ग्रामपंचायतीत मृत पतीच्या रिक्त जागेवर पत्नीच्या नियुक्तीची मागणी

**पाचोरा :** मृत पतीच्या रिक्त जागेवर सफाई कामगार म्हणून पत्नीची नियुक्ती करावी आणि तसे पत्र संबंधित महिलेस द्यावे या मागणीचे निवेदन पिंपळगाव (हरेश्वर) ग्रामपंचायतीला देण्यात आले. पाचोरा येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच महाराष्ट्र राज्य एकता सफाई कामगार संघटनेचे अध्यक्ष आतिष चांगरे यांनी तालुक्यातील पिंपळगाव (हरेश्वर) येथील ग्रामपंचायतमधील बलराज बाबूलाल चनाल या मृत सफाई कामगाराच्या जागेवर त्यांची पत्नी सुनीता बलराज चनाल या ग्रामपंचायत कार्यालयात सफाई कामगार म्हणून काम करीत आहेत. मात्र त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र दिलेले नाही. मृत कामगाराचे दीड वर्षापूर्वी निधन झाले. बलराज बाबूलाल चनाल यांच्या निधनानंतर मिळणारी वारस हक्क रक्कम अजूनसुद्धा मिळालेली नाही. पतीच्या निधनानंतर मिळणारी वारस हक्क नोकरी मयताच्या पत्नीस लेखी नियुक्तीपत्र द्यावे, सुनीता बलराज चनाल यांना कायमस्वरूपी नोकरी व आकृती बंधनात समविष्ट करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



### वकील संघ अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ॲड. महेंद्र चौधरी यांचा समाजातर्फे सत्कार

**धरणगाव :** येथील ॲडव्होकेट महेंद्र चौधरी यांची धरणगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली. याबद्दल धरणगाव तेली समाजातर्फे सत्कार करण्यात आला. येथील तेली समाजाचे माजी अध्यक्ष सुभाष दरवाजा, विभागाचे माजी अध्यक्ष ॲड. व्ही. एस. भोलाणे तसेच तेली सम ाजाचे माजी अध्यक्ष रतिलाल चौधरी यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी तेली समाजाचे अध्यक्ष नितीन चौधरी तसेच जय गुरुदेव माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास चौधरी, तेली समाजाचे खजिनदार दीपक चौधरी, सुनील एकनाथ चौधरी तसेच राजू भोलाणे उपस्थित होते.

## झिपरू अण्णांच्या जीवनावरील 'तरुण भारत'च्या विशेषांकाचे प्रकाशन



नशिराबाद, ता. जळगाव येथील नागरिकांचे दैवत, श्रद्धास्थान असलेले परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज यांची ७६वी पुण्यतिथी बुधवारी साजरी झाली. यानिमित्त 'जळगाव तरुण भारत'ने तयार केलेल्या विशेषांकाचे प्रकाशन झिपरू अण्णा महाराज मंदिरामध्ये मान्यवरांच्या हस्ते थाटात करण्यात आले. या वेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विनायक वाणी, सरकारी वकील मोहन देशपांडे, ॲड. प्रदीप देशपांडे, माजी सरपंच पंकज महाजन, शिवसह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चव्हाण, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी करिष्मा जैन, सामाजिक कार्यकर्ते संदीप माळी, मुकुंद देशपांडे, समितीचे सदस्य कैलास व्यवहारे, हरीश पाटील, दीपक खाचणे, भूषण पाटील, बापू शिंदे, 'तरुण भारत'चे संपादक चंद्रशेखर जोशी, शाखा व्यवस्थापक भावना शर्मा, विपणन व्यवस्थापक मनोज बोरसे, विपणन सहायक जयंत वैद्य, पंकज महाजन आदी उपस्थित होते.

झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथीनिमित्त

## नशिराबादमध्ये पालखी मिरवणूक

### महिलांचा गरबा, तरुणांचा डीजेवर ठेका

**तभा वृत्तसेवा**
**नशिराबाद, ता. जळगाव, २१ मे**

नशिराबाद येथे परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवारी सकाळी गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत महिला, पुरुष, तरुण, लहान मुले अशा सर्वच घटकांनी उत्साहाने सहभाग घेतला. मिरवणुकीच्या प्रारंभापूर्वी अण्णा महाराज मंदिरात पूजन, आरती आणि धार्मिक विधी करण्यात आले. यानंतर सजवलेल्या पालखीत श्री झिपरू अण्णा महाराज यांची भव्य प्रतिमा विराजमान करून मिरवणुकीला सुरुवात झाली.

मिरवणुकीदरम्यान महिलांनी पारंपरिक वेशभूषेत गरबा खेळत सहभाग घेतला. त्यांच्या पावलांतील लयबद्ध चालींनी संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि सांस्कृतिक रंगात न्हालं. दुसरीकडे, तरुण मंडळींनी डीजेच्या तालावर जल्लोषात नृत्य करत उत्साह वाढवला. ही मिरवणूक झिपरू अण्णा महाराज मंदिरापासून सुरू होऊन ग्रामपंचायत, शिवाजी चौक, फ्रुटसेल चौक, विविध मुख्य रस्त्यांवरून मार्गक्रमण करत पुन्हा श्रींच्या मंदिरात सांगता झाली. मार्गावर विविध ठिकाणी ग्रामस्थांकडून मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. श्रींच्या पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.



'जळगाव तरुण भारत'ने झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथीच्या अनुषंगाने प्रकाशित केलेल्या 'परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथी विशेष' पुरवणीचे नशिराबाद येथे पारावर सामूहिक वाचन करताना वाचक.





नशिराबाद येथे बुधवारी झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथीनिमित्त काढण्यात आलेल्या पालखी मिरवणुकीत सहभागी भाविक.

**पाराशार कुटुंबाकडून भजी-जिलेबी वाटप**

परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथीनिमित्त मिरवणुकीदरम्यान पाराशार (वाणी) परिवाराकडून मिरवणुकीमध्ये ५० किलो भजे आणि ३५ किलो जिलेबी प्रसाद म्हणून वाटप करण्यात आली.

## सिल्लोड येथे महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, २१ मे**

सिल्लोड शहरातील सोनार रुग्णालयात सुरू करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या पंतप्रधान आयुष्मान भारत आणि राज्य सरकारच्या आरोग्य योजनेंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेचे उद्घाटन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले.

या योजनेंतर्गत पालकांना त्यांच्या मुलांवर सिल्लोड येथे आता सरकारी खर्चाने सोनार या खाजगी रुग्णालयात उपचार घेता येणार असल्याने रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी आमदार सत्तार यांनी केले. सर्वसामान्य कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांतर्गत सिल्लोड येथे लाभ मिळणार आहे. कोरोना साथीच्या काळात सोनार रुग्णालयात बाल कोविड सेंटर सुरू करण्यात आले होते, असे



सांगत आता सरकारी योजनांतर्गत गरीब कुटुंबांमधील मुलांवरही या रुग्णालयात उपचार केले जातील, असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

**योजना गरिबांसाठी वरदान**

महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना गरिबांसाठी वरदान असल्याचे प्रतिपादन या वेळी आमदार सत्तार यांनी केले. गंभीर आजारांवरील दर्जेदार उपचार पूर्णतः मोफत उपलब्ध करवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, असे आ. सत्तार म्हणाले. या वेळी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर, राजश्री निकम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, श्रीरंग पाटील साळवे, अब्दुल आमेर, कुणाल सहारे, माजी नगरसेवक अकील वसईकर, शिवसेना पदाधिकारी देविदास पा. लोखंडे, डॉ. पी. टी. सोनार, डॉ. एम. पी. सोनार, स्वप्नील सोनार, जयश्री सोनार आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. एस. पी. सोनार यांनी केले आणि सूत्रसंचालन रेणुका विसपुते यांनी केले. डॉ. रूपाली सोनार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनार कुटुंबासह रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.



## नशिराबाद नगर परिषदेत परमपूज्य झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नशिराबाद, ता. जळगाव, २१ मे**

येथील नगर परिषदेमध्ये परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. पुण्यतिथीनिमित्त झिपरू अण्णा महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या वेळी परमपूज्य झिपरू अण्णा महाराज यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला.

पूजन नगर परिषदेचे मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे, आझाद पटेल, दौलत गुटे, पराग रुले, अतुल चौधरी, सचिन पल्हाडे, मनोज गोरे, गीतांजली राऊत, समीर पिंजारी, राहुल धनवडे, शुभम जाधव व नशिराबाद नगर परिषदेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## भडगाव शहरात तिरंगा यात्रेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**भडगाव, २१ मे**

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून गाजविलेल्या अतुलनीय पराक्रमाबद्दल भारतीय जवानांच्या सन्मानार्थ भडगाव शहरात बुधवारी (२१ मे) सकाळी नऊ वाजता तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेत सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

तिरंगा यात्रेची सुरुवात बाजारचौक-नगरपरिषद-मेन रोडमार्गे- मारोती मंदिर- शहीद जवान स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, ते छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून वळसा घेत तहसील कार्यालयासमोर समारोप करण्यात आला. यात्रेदरम्यान मेन रोडवरील शहीद जवान स्मारक येथे माजी सैनिकांच्या वतीने पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी भाजप जळगाव पश्चिमचे जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, शिवसेनेचे युवा नेते सुमित किशोर पाटील, उबाठा शिवसेनेच्या नेत्या वैशाली सूर्यवंशी, ज्येष्ठ मार्गदर्शक विनय जकातदार, माजी सैनिक किशोर पाटील यांनी प्रमुख मनोगत व्यक्त केले. श्रद्धांजलीपर मनोगत सामाजिक कार्यकर्ते इमरानअली सय्यद यांनी तर शांतीमंत्र प्रा. डी. डी. पाटील यांनी म्हटला. प्रास्ताविक ॲड. अमोल पाटील यांनी तर सूत्रसंचालन ॲड. नीलेश तिवारी यांनी केले. ऑपरेशन सिंदूरमध्ये शहीद झालेले जवान व पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करत राष्ट्रगीताने यात्रेचा समारोप झाला.

**तिरंगा यात्रेत यांचा होता सहभाग**

या वेळी भडगाव तालुक्यातील सर्व आजी-माजी सैनिक, भाजप, शिवसेना, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट), भारतीय काँग्रेस पक्षाचे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वि.हिं.प., बजरंग दल, अल्पसंख्यक आघाडी, वकील संघ, डॉक्टर असोसिएशन, शिक्षक संघटना, प्राध्यापक संघटना, कृषी केंद्र असोसिएशन, पत्रकार संघ, केमिस्ट असोसिएशन, भडगाव व्यापारी संघ, केशवसुत ज्ञानप्रबोधिनी, जागृती मित्र मंडळ, ध्यास फाउंडेशन, चालक-मालक संघटना, राष्ट्रीय चर्मकार महासंघ, ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरुष, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या वेळी भडगाव नगरपालिकेच्या वतीने अग्निशमन दलाचा मिनी बंब व कर्मचारी यांची उपस्थिती होती. भडगाव पोलिसांच्या वतीने पोलीस निरीक्षक पांडुरंग पवार यांनी सहकाऱ्यांसोबत चोख बंदोबस्त ठेवला. यात्रेदरम्यान विविध घोषणांनी परिसर दणाणून निघाला होता.



www.tarunbharat.net
तरुण भारत
# माGोवा
नागपूर, गुरुवार, २२ मे २०२५




## चौफेर

मेजर जनरल (निवृत्त) ध्रुव सी. कटोच

# नवीन भारताचा शक्तिशाली हुंकार



पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणात दहशतवाद हा एक प्रमुख घटक राहिला आहे, तरीही भारताने नेहमीच संयमाने प्रतिक्रिया दिली आहे आणि बचावात्मक रणनीती अवलंबली आहे. परंतु याचा पाकिस्तानवर कोणताही परिणाम झाला नाही आणि त्याच्या उत्पाती, विध्वंसक कारवाया आणि कुरापती थांबल्या नाहीत. १३ डिसेंबर २००१ रोजी भारताच्या संसदेवर झालेला हल्ला, २४ सप्टेंबर २००२ रोजी गांधीनगरमधील अक्षरधाम मंदिरावर झालेला हल्ला आणि २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील हल्ला हे गेल्या अडीच दशकांतील भारताविरुद्धच्या सर्वांत घातक दहशतवादी घटना आहेत.

### भारताचे नवे रूप

सप्टेंबर २०१६ मध्ये मात्र प्रथमच भारताने आपले स्वरूप बदलले. भारताची प्रतिक्रिया व स्वर प्रथमच आक्रमक, तीव्र झाला. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपलीकडे उरी येथील दहशतवाद्यांचे अड्डे सर्जिकल स्ट्राईकद्वारे उद्ध्वस्त करून, आता दहशतवाद मुळीच सहन केला जाणार नाही, असा खणखणीत संदेश भारताने दिला. त्यानंतरही दहशतवादी घटना पूर्णपणे थांबवता आल्या नाहीत. फेब्रुवारी २०१९ मध्ये पुलवामा येथे सीआरपीएफच्या ताफ्यावर झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात ४० जवान हुतात्मा झाले होते. यावर भारताने हवाई हल्ला करून पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात सुमारे १०० किलोमीटर आत जाऊन बालाकोटमधील दहशतवादी तळ पार उद्ध्वस्त केला.

ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरला लागू असलेले कलम ३७० रद्द केल्यानंतर, नव्याने निर्माण झालेल्या केंद्रशासित प्रदेशात शांतता वेगाने प्रस्थापित होत होती. दहशतवादी कारवायांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्यामुळे खोऱ्यातील पर्यटकांची संख्या वाढू लागली होती. जणू काही दशकांपासून रक्तरंजित वातावरणात गुदमरलेले जम्मू आणि काश्मीर आता मोकळ्या हवेत श्वास घेऊ लागले आहे, असे वाटत होते. त्यानंतर २२ एप्रिल २०२५ रोजी जिहादी दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये निष्पाप आणि निःशस्त्र पर्यटकांची निर्घृणपणे गोळ्या घालून हत्या केली. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी २६ जणांची धर्म विचारून निर्घृणपणे हत्या केली. या भ्याड, क्रूर आणि घृणास्पद कृत्यामुळे संपूर्ण राष्ट्र संतापले. पाकिस्तानला जबरदस्त आणि कायमचे लक्षात राहील असा धडा शिकवायलाच हवा असे संपूर्ण देशातील जनमानसाला तीव्रतेने वाटू लागले; नव्हे आता सणसणीत उत्तर दिलेच पाहिजे, ही भारतीयांची प्रबळ भावना उघडपणे व्यक्त होऊ लागली.

### आणि शिकवला धडा...

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ एप्रिल रोजी बिहार दौऱ्यात, देश आणि जगाला स्पष्ट संदेश दिला की या घृणास्पद गुन्ह्याच्या गुन्हेगारांना शिक्षा होईल. ६-७ मे २०२५ च्या मध्यरात्री झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत, भारतीय सेनेने जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा आणि हिजबुल मुजाहिदीनचे मुख्यालय आणि पायाभूत सुविधा नष्ट केल्या. हा हल्ला राष्ट्रीय शक्तीच्या सर्व घटकांचा वापर करून संयुक्त आंतर-सेवा लष्करी अभियान होते, ज्यामध्ये भारतीय नौदल पश्चिम महासागरात धोरणात्मक पद्धतीने तैनात होते. भारतीय हवाई दलाने त्यांच्या हवाई प्लॅटफॉर्मवरून स्वदेशी शस्त्रास्त्र प्रणालींचा वापर करून दहशतवाद्यांच्या तळांवर अचूकपणे हल्ला केला आणि ते तळ पार उद्ध्वस्त करून टाकले. या सर्व धडाकेबाज व आक्रमक लष्करी कारवाया २०१६ आणि २०१९ च्या कारवाईपेक्षा अगदी वेगळ्या होत्या. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने हा स्पष्ट संदेश दिला की, पाकिस्तानचा कोणताही भाग भारताच्या प्रत्युत्तर हल्ल्यापासून वाचू शकत नाही. पहिल्या टप्प्यात, भारताने दहशतवादविरोधी कारवाई अंतर्गत आपले लक्ष्य निवडून केवळ दहशतवाद्यांच्या तळांवरच हल्ले केले. तेथून अगदी काही अंतरावरच असलेल्या लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य केले गेले नाही. बहावलपूर (जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय) आणि मुरीदके (लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय) येथील दहशतवादी तळांवर केलेले हल्ले हेच दर्शवितात की, पाकिस्तानात जिथे जिथे दहशतवाद्यांनी त्यांचे तळ स्थापित केले आहेत तिथे त्यांचा संपूर्ण खात्मा केला जाईल. या कारवाईनंतर भारताने आपली भूमिका स्पष्ट केली की, त्यांची लढाई ही केवळ दहशतवादाविरुद्ध आहे आणि दहशतवाद्यांचा संपूर्ण खात्मा करणे हेच भारताचे उद्दिष्ट आहे आणि तरीही जर पाकिस्तानने कोणत्याही प्रकारचा हल्ला केला तर त्याला सडेतोड उत्तर देण्यास भारत सक्षम आहे. पाकिस्तानने प्रतिवार केला, परंतु त्यांचे प्रत्येक हल्ले हाणून पाडण्यात आले. पाकिस्तानचे प्रत्येक ड्रोन, प्रत्येक क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्यात भारत १०० टक्के यशस्वी झाला.

भारताने ८-९ मे च्या मध्यरात्री पाकिस्तानला जबरदस्त प्रत्युत्तर देत त्यांचे अनेक लष्करी तळ व प्रतिष्ठान नष्ट केले. यामध्ये रफीकी, नूर खान (चक लाला), मुरीदके आणि रहीम यार खान येथील पाकिस्तानी हवाई दलाच्या तळांचा समावेश होता, ज्यांचे प्रचंड नुकसान झाले. भारताच्या सणसणीत प्रत्युत्तराच्या हल्ल्यात पाकिस्तानचे लॉजिस्टिक्स हब आणि हवाई संरक्षण प्रतिष्ठानांचेही मोठे नुकसान झाले. रावळपिंडीजवळील पाकिस्तानच्या स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग डिव्हिजनशी संबंधित ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आले. या सगळ्यातून, एकच धोरणात्मक संदेश दिला जात होता आणि तो म्हणजे भारत पाकिस्तानच्या महत्त्वाच्या कमांड स्ट्रक्चरलाही पार उद्ध्वस्त करू शकतो. भारताच्या अतिशय आक्रमक व कणखर भूमिकेपुढे अण्वस्त्रे वापरण्याच्या पाकिस्तानच्या धमक्याही पोकळ ठरल्या. भारताच्या दणक्यामुळे पार हादरलेल्या व घाबरलेल्या पाकिस्तानला युद्धबंदीचा मार्ग निवडण्यास भाग पडले. मात्र, जर पाकिस्तानने कोणत्याही प्रकारे युद्धबंदीचे उल्लंघन केले तर त्याला तीव्र प्रतिक्रियेला सामोरे जावे लागेल, अशी स्पष्ट अट युद्धबंदीला संमती देताना भारताने घातली.

भारत आणि पाकिस्तानमधील या लष्करी संघर्षाचे विश्लेषण केल्यास हे स्पष्टपणे दिसून येते की, भारताची संरक्षण व्यवस्था पाकिस्तानपेक्षा खूपच मजबूत आहे. पाकिस्तानकडे हवाई संरक्षण प्रणाली कवच म्हणून चिनी एचक्यू-९ (हांगक्यूआय-९/ रेड बॅनर-९) ही यंत्रणा होती. पण, ती भारतीय सैन्याच्या हल्ल्याला निष्प्रभ करू शकली नाही. सध्या ऑपरेशन सिंदूर तात्पुरते थांबवण्यात आले आहे. पण जर भविष्यात पाकिस्तानने भारतावर पुन्हा हल्ला केल्यास ते पुन्हा सक्रिय केले जाईल. १२ मे रोजी राष्ट्राला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''जेव्हा भारतीय क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने पाकिस्तानमधील लष्करी तळांवर हल्ला केला तेव्हा केवळ दहशतवादी संघटनांच्या इमारतीच हादरल्या नाहीत तर त्यांचे साहसही डळमळीत झाले. बहावलपूर आणि मुरीदके सारखे दहशतवादी तळ ही जागतिक दहशतवादाची विद्यापीठे होती. जगातील सर्व मोठे दहशतवादी हल्ले, ज्यात ९/११ किंवा भारतातील मोठ्या दहशतवादी हल्ल्यांचा समावेश आहे, हे कुठल्या ना कुठल्या स्वरूपात या दहशतवादी तळांशी जोडलेले आहेत.'' त्यांनी राष्ट्रीय धोरणाची एक नवीन रूपरेषा सादर केली आणि ती म्हणजे यापुढे कोणताही दहशतवादी हल्ला युद्ध मानले जाईल. अणुबॉम्बची धमकी मुळीच सहन करणार नाही आणि दहशतवादी आणि त्यांचे म्होरके व आश्रयदाते यांच्यात फरक करणार नाही. भारताविरुद्ध दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांनाही गंभीर परिणाम भोगावे लागतील. हा पाकिस्तान आणि अशा देशांना स्पष्ट संदेश आहे, जे दहशतवाद्यांना आश्रय देतात आणि त्यांचा भारताविरुद्ध वापर करतात. भारताने पाकिस्तानबाबत काही अटीही घातल्या आहेत, चर्चा आणि दहशतवाद एकत्र नांदू शकत नाहीत. जर काही चर्चा होणार असेल तर ती फक्त आणि फक्त व्याप्त काश्मीरवरच असेल. पाकिस्तान आपल्या परराष्ट्र धोरणाचे एक साधन म्हणून दहशतवादाचा वापर थांबवत नाही तोपर्यंत सिंधू पाणी करार स्थगित राहील. भविष्यात काय घडणार हे फक्त काळच सांगू शकेल. पण आज देशाचे हे नवीन धोरण दहशतवादाविरुद्ध भारताच्या राजकीय आणि लष्करी प्रतिष्ठानच्या नवीन संकल्पाचे प्रतीक आहे. एका नवीन युगाची सुरुवात होत आहे. एक नवीन सिद्धांत, नवीन तत्त्व अमलात येत आहे. एक नवीन भारत उदयास येत आहे. हे सर्व ऑपरेशन सिंदूरच्या यशातून जन्माला आले आहे, कारण न्याय स्थापित झाला आहे.

(पांचजन्यवरून साभार)

> पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणात दहशतवाद हा एक प्रमुख घटक राहिला आहे, तरीही भारताने नेहमीच संयमाने प्रतिक्रिया दिली आहे आणि बचावात्मक रणनीती अवलंबली आहे. परंतु याचा पाकिस्तानवर कोणताही परिणाम झाला नाही आणि त्याच्या उत्पाती, विध्वंसक कारवाया आणि कुरापती थांबल्या नाहीत. आता मात्र नवीन भारताने कणखरपणा व आपले सामर्थ्य दाखवून दिले आहे. भविष्यात जर पाकिस्तानशी काही चर्चा होणार असेल तर ती फक्त त्या देशातून व व्याप्त काश्मीरमधून होणाऱ्या दहशतवादी कारवायांवर आळा घालण्यावर असेल, हे भारताने निर्धारपूर्वक ठणकावले आहे.

### दहशतवाद्यांच्या अन्त्यसंस्कारात लष्करी अधिकारी

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, भारताने पाकिस्तानात राहणाऱ्या १०० हून अधिक दहशतवाद्यांना ठार मारले. त्या दहशतवाद्यांच्या दफनविधीला पाकिस्तानी लष्करी अधिकारी उपस्थित राहिले तेव्हा जगही थक्क झाले. पाकिस्तानी लष्कर व दहशतवादी संघटना यांचे उघड संबंध आहेत, हे या घटनेमुळे सिद्ध झाले. लेफ्टनंट जनरल फय्याज हुसेन शाह, एचआय (एम) कोअर कमांडर (लाहोर), मेजर जनरल राव इम्रान सतराज, ब्रिगेडियर मोहम्मद फुरकान शब्बीर, कमांडर १५ हाय मॅक बीडीई, लाहोर (पूर्वीची ११ इन्फंट्री डिव्हिजन/४ कॉर्प्स), डॉ. उस्मान अनवर (पंजाबचे पोलिस महानिरीक्षक), एवढेच नव्हे तर पंजाब राज्य विधानसभेचे सदस्य मलिक सोहेब अहमद भेरथ इत्यादी महत्त्वाची मंडळी यावेळी उपस्थित होती. पाकपोषित दहशतवाद्यांना भारताने ढगात पाठविल्याने या सर्वांना प्रचंड धक्का बसला.

## दृष्टिक्षेप

प्रफुल्ल केतकर

# धाडसी सैनिकांचे यशस्वी अभियान

सीमेवर गोळीबार थांबवण्याची व युद्धबंदीची घोषणा झाली तेव्हा 'व्याप्त जम्मू-काश्मीर (पीओजेके) परत घेण्याची किंवा आणखी एका विघटनासह पाकिस्तानला धडा शिकवण्याची संधी आपण गमावली' अशीच सर्वसामान्य भारतीयांची भावना होती. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आम्ही ज्या पद्धतीने जलद राजनैतिक हल्ल्यासह प्रत्युत्तर दिले आणि ज्या प्रकारे आमच्या सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूरच्या अचूक अंमलबजावणीमध्ये तीनही सेनादले आणि तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणाचे प्रदर्शन केले त्यामुळच देशवासीयाच्या अपेक्षा वाढल्या. म्हणूनच, 'समजूतदार'पणाची घोषणा अनपेक्षित घटकांकडून 'युद्धविराम' म्हणून आली आणि त्यामुळे सुरुवातीला काही गोंधळ निर्माण झाला. मात्र, सेनादलांच्या संयुक्त पत्रकार परिषदेने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या स्पष्ट आणि प्रेरणादायी भाषणाने परिस्थिती एकदम बदलली आणि देशाचा 'विजयी मूड' परत आणला. ऑपरेशन सिंदूरची उद्दिष्टे आणि परिणामांचे मूल्यांकन करताना, आपण याबद्दल धोरणात्मकदृष्ट्या स्पष्ट असले पाहिजे की, या लष्करी कारवाईने राजनैतिक आणि राष्ट्रीय पातळीवर दहशतवादावरील लाल रेषेची कशी पुनर्व्याख्या केली आहे.

१५ दिवस हा कोणत्याही देशासाठी युद्धास प्रारंभ करण्यासाठी पुरेसा कालावधी नाही. कारण त्यासाठी तपशीलवार नियोजन, व्यवस्थित आखणी आणि एकत्रीकरण आवश्यक आहे, जसे आपण १९७१ च्या युद्धादरम्यान पाहिले होते. पाकिस्तान पुरस्कृत व वित्तपोषित दहशतवाद्यांनी केलेल्या पहलगाम हल्ल्यानंतर, भारताने पाकिस्तानच्या राजनैतिक मोहिमेचा दर्जा कमी करून (डाऊनग्रेड), सिंधू पाणीवाटप करार (आयडब्ल्यूटी) स्थगित करून आणि पाकिस्तानी नागरिकांसाठी व्हिसा सुविधा निलंबित करून राजकीयदृष्ट्या एक सुस्पष्ट संदेश दिला. एवढेच नव्हे तर सीमेपलीकडून गोळीबार थांबल्यानंतरही, आम्ही या आघाड्यांवर कोणतीही सवलत दिलेली नाही.

दहशतवादी तळांना लक्ष्य करण्याचे आमचे स्पष्ट लष्करी उद्दिष्ट होते. २०१६ मध्ये सर्जिकल स्ट्राईक आणि त्यानंतर बालाकोट हवाई हल्ल्यादरम्यान, आम्ही अनुक्रमे नियंत्रण रेषा (एलओसी) आणि आंतरराष्ट्रीय सीमा (आयबी) ओलांडून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, आमच्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानमध्ये बसवलेल्या चीन-निर्मित हवाई संरक्षण प्रणालीला ठप्प (जाम) केले आणि कट्टरवादी शेजाऱ्याचे नऊ दहशतवादी तळ पार उद्ध्वस्त केले. आवश्यक पुरावे देऊन पाकिस्तानी लष्करी नेतृत्वाला सूचित केल्यानंतरही, लष्करशासित देशाने ड्रोन हल्ल्यांच्या माध्यमातून प्रकरण वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यांचे लक्ष्य भारताचे सर्वसामान्य नागरिक आणि प्रार्थनास्थळे होती, ज्याला भारतीय सशस्त्र दलांनी अतिशय सडेतोड प्रत्युत्तर दिले. एवढेच नव्हे, तर पाकिस्तानच्या ११ हवाई तळांवर केलेला जबरदस्त हल्ला हा लष्करी तयारीच्या बाबतीत पाकिस्तानला आरसा दाखविण्याचा एक मास्टर स्ट्रोक होता. प्रत्येक वेळी, आम्ही वाढत्या शिडीवर एक पाऊल पुढे होतो. माध्यमांनी, विशेषतः इलेक्ट्रॉनिक चॅनेल्सनी, भारतीय सेनदलाच्या या यशाला भरपूर प्रसिद्धी दिली, ज्यामुळे भारतीयांच्या अपेक्षा वाढल्या. प्रत्यक्षात, भारताने कधीही युद्ध घोषित केले नाही आणि पहिल्याच दिवशी विशिष्ट लक्ष्यांवर हल्ला करून लष्करी उद्दिष्ट साध्य केले. जेव्हा पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे बेलआऊट पॅकेज स्वीकारण्याचा निर्णय घेतला, तेव्हा भारताला आमच्या अटींवर शांतीचा प्रस्ताव स्वीकारण्यास कोणतीही अडचण नव्हती. बदल हा आमच्या युद्ध सिद्धांतात आहे, ज्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, 'कोणताही दहशतवादी हल्ला हा युद्धच मानले जाईल.' डीजीएमओंची पत्रकार परिषद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाने माहिती युद्ध आघाडीवरचे चित्र बदलले. ''दहशतवाद आणि चर्चा एकत्र राहू शकत नाहीत... दहशतवाद आणि व्यापार एकत्र नांदू शकत नाहीत... पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही'', हा पंतप्रधान मोदींचा स्पष्ट संदेश होता. तथ्यांची अर्थात वस्तुस्थितीची तपासणी करून आणि सत्य सादर करून आम्ही पाकिस्तानच्या खोट्या नॅरेटिव्हचा अर्थात बनावट कथांचा पर्दाफाश केला. आम्ही स्वदेशी संरक्षण प्रणालींची चाचणी केली आणि त्यांचे यशस्वी प्रदर्शन केले. भारतीय सेनादलांनी शत्रूची अत्याधुनिक संरक्षण यंत्रणा पार उद्ध्वस्त करून टाकल्याने लष्करी व औद्योगिकदृष्ट्या प्रगत बडे देशही घाबरले.

पाकव्याप्त काश्मीर (पीओजेके) परत घेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट लष्करी कारवाईच्या या टप्प्याचा भाग नव्हते. वास्तविक २२ फेब्रुवारी १९९१ रोजी संसदेत एका प्रस्तावाच्या माध्यमातून याला मंजुरी देण्यात आली होती. आम्हाला हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राजकीय, लष्करी आणि राजनैतिकदृष्ट्या (मुत्सद्देगिरी) अधिक तयारी करण्याची आवश्यकता आहे. भारतीय सशस्त्र दलांनी जमिनीवरील सर्व लढाया जिंकल्या आहेत आणि ते यापुढेही जिंकतील असा पूर्ण विश्वास आहे. राजनैतिकदृष्ट्या तसेच अराजक आणि पक्षपाती जगात, आयडब्ल्यूटीची मध्यस्थी आणि पुनर्स्थापनेसाठी आव्हाने आणि दबाव असतील. सरकारला अशा कठीण काळात युक्तीने मार्ग काढण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोन आणि जबाबदारीने व व्यावहारिकतेने सर्व गोष्टी हाताळण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर निष्काळजीपणा आणि प्रासंगिक विरोध हा आणखी एक चिंतेचा विषय आहे, ज्याचा आपल्याला यशस्वीपणे सामना करावा लागेल. माहिती युद्ध आणि अंतर्गत ०.५ आघाडीच्या शत्रूंचा सामना करण्यासाठी, प्रत्येक राष्ट्रवादी नागरिकाची महत्त्वाची भूमिका आहे. पाकिस्तानच्या संकल्पनेत रुजलेले इस्लामिक दहशतवादाविरुद्धचे अंतिम युद्ध १९३० च्या दशकात ही संकल्पना मांडल्यापासून सुरू आहे. अधर्माविरुद्ध धर्माचे अंतिम युद्ध जिंकण्यासाठी, नेतृत्वावर विश्वास ठेवणे, सशस्त्र दलांना मदत करणे आणि राष्ट्राविरुद्ध कृती करण्यासाठी लोकशाही संस्थांचा गैरवापर रोखणे हे तीन महत्त्वाचे पैलू आहेत ज्यावर आपण काम केले पाहिजे. दरम्यान, दहशतवादावरील लाल रेषा अचूकता आणि एकत्रीकरणासह परिष्कृत करणाऱ्या आमच्या धाडसी सैनिकांच्या विजयी प्रवासाचा उत्सव साजरा करूया.

*(ऑर्गनायझरवरून साभार)*



> ''दहशतवादाविरुद्ध भारताची लक्ष्मणरेषा आता अगदी स्पष्ट आहे. जर आता पुन्हा दहशतवादी हल्ला झाला तर भारत त्याला अतिशय सडेतोड उत्तर देईल. सर्जिकल स्ट्राईक दरम्यान आपण हे पाहिले. आता, ऑपरेशन सिंदूर हा भारताचा न्यू नॉर्मल आहे.''
>
> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ मे २०२५ रोजी आदमपूर हवाई दल तळावर ऑपरेशन सिंदूर दरम्यान हवाई संरक्षण सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी हे रोखठोक प्रतिपादन केले.

## रोखठोक

हितेश शंकर/८१७८८१६१२३

# 'ते' थरथर कापत आहेत...

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त म्हटले की, 'ही वेळ युद्धाची नाही तर शांतीची आहे. पण शांतीचा मार्गही सामर्थ्यातून जातो.' पंतप्रधानांचे हे विधान केवळ भारताच्या सांस्कृतिक परंपरेचाच नाही तर त्याच्या धोरणात्मक ताकदीचाही पुरावा आहे. त्यांच्या भाषणाचा हा संपादित अंश...**




**'क्षमा शोभती उस भुजंग को, जिसके पास गरल हो;
उसको क्या जो दंतहीन, विषरहित विनीत, सरल हो'**

राष्ट्रकवी रामधारी सिंह 'दिनकर' यांच्या उपरोक्त ओळी यावेळी, भारताच्या धोरणाला अक्षरशः लागू होतात. निर्णायक लष्करी आघाडी आणि संपूर्ण उद्दिष्ट साध्य झाल्यानंतरच भारताने युद्धबंदी स्वीकारली आणि आता युद्ध आणि शांती या दोन्हींच्या अटी आम्हीच ठरवू, असे अतिशय स्पष्ट शब्दांत सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त म्हटले की, 'ही वेळ युद्धाची नाही तर शांतीची आहे. पण शांतीचा मार्गही सामर्थ्यातून जातो. पंतप्रधानांचे हे विधान केवळ भारताच्या सांस्कृतिक परंपरेचाच नाही तर त्याच्या धोरणात्मक ताकदीचाही पुरावा आहे.

पाकिस्तानने केवळ सीमावर्ती भागात आणि लष्करी तळांवरच नव्हे तर सायबर आघाडीवरही भारताला लक्ष्य केले. एका आठवड्यात १५ लाखांहून अधिक सायबर हल्ले झाले, परंतु भारताच्या सायबर सुरक्षा एजन्सींनी ९९.९ टक्के हल्ले हाणून पाडले. 'शक्ती आणि संयम' यांचे हे एक अद्वितीय उदाहरण आहे. संघर्षादरम्यान, पाकिस्तानच्या डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स (डीजीएमओ) ने भारताला हल्ले थांबवण्याचे आवाहन केले, त्यानंतर भारताने स्वतःच्या अटींवर युद्धबंदी स्वीकारली. भविष्यातील कोणताही दहशतवादी हल्ला 'युद्धाची कृती' मानला जाईल, असेही भारताने सुस्पष्ट शब्दात सांगितले.

'यातनाम ऑस्ट्रियन लष्करी इतिहासकार टॉम कूपर यांनी भारताच्या लष्करी कारवाईचे वर्णन 'स्पष्ट विजय आणि सामरिक अचूकतेचे उत्कृष्ट उदाहरण' या शब्दात केले. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास, 'भारताचे नियोजन निर्णायक होते, पाकिस्तानची अण्वस्त्र हल्ला करण्याची धमकी अपयशी ठरली.' अर्बन वॉरफेअर स्टडीजचे प्रमुख जॉन स्पेन्सर यांनी 'रणनीतिक संयम आणि निर्णायक हल्ल्याचे हे एक दुर्मिळ उदाहरण असल्याचे सांगून, भारत आता कोणत्याही बाह्य दबावाशिवाय आपल्या शत्रूंना प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहे, असे स्पष्टपणे नमूद केले.

पाकिस्तानच्या तथाकथित 'इस्लामिक डेमोक्रॅटिक' सरकारचे वास्तवही समोर आले आहे. वस्तुस्थिती ही आहे की, त्या देशात खरीखुरी सत्ता लष्कराच्याच हातात आहे, जी 'खाकी' राजवट चालवत आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री अतिशय उघडपणे मदरशांना 'संरक्षणाची दुसरी फळी' (सेकंड लाईन ऑफ डिफेन्स) म्हणतात; हेच मदरसे कट्टरतावाद आणि जिहादचे केंद्र बनले आहेत.

अंतर्गतदृष्ट्या, पाकिस्तान विघटनाच्या उंबरठ्यावर आहे - बलुचिस्तान, पश्तून आणि फाटा प्रदेशात बंडखोरी, संसाधनांची लूट आणि स्थानिक असंतोष शिगेला पोहोचला आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारताच्या समर्थनार्थ मोर्चे आणि निदर्शनेही झाली आहेत; इंटरनेटवरील शेकडो व्हिडिओ आणि छायाचित्रे याला दुजोरा देतात.

पाकिस्तानच्या संसदेतही असंतोषाचे प्रतिध्वनी उमटले - 'आमच्या भागातून गॅस प्राप्त होतो, पण आम्हाला पिण्याचे पाणीही मिळत नाही.' एका खासदाराने त्यांच्या पंतप्रधानांना 'गीदड' आणि हा खासदार भारताच्या पंतप्रधानांचे नाव घेण्यासही घाबरतो. 'आता पाकिस्तान जेव्हा आपल्या भूमीवरून दहशतवाद पूर्णपणे नष्ट करेल तेव्हाच त्या देशाशी संवाद होईल,' असा अंतिम संदेशही भारताने या युद्धबंदीसोबत दिला. 'जो कोणी दहशतवादाला पाठिंबा देईल त्याची गणना शत्रू म्हणून केली जाईल', हे भारताचे धोरण आता अगदी स्पष्ट आहे. शांतीची इच्छा त्यालाच शोभून दिसते जो शक्तिशाली, सामर्थ्यवान आहे. भारताने हे सिद्ध केले आहे की तो निश्चितच शांतीचा पुरस्कर्ता आहे. परंतु 'अहिंसा परमो धर्म' सह शक्ती आणि सामर्थ्याने समीकरण कसे सिद्ध करायचे हे देखील भारताला चांगले माहीत आहे. कवी दिनकर यांच्या 'शक्ती और क्षमा' या कवितेतील ओळी पुढीलप्रमाणे आहेत-

*सच पूछो तो शर में ही,*
*बसती है दीप्ति विनय की...*
*संधि वचन संपूज्य उसी का,*
*जिसमें शक्ति विजय की।*
*'शांतीचा मार्ग सत्तेतून जातो'*



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ मे रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात स्पष्ट केले की 'ऑपरेशन सिंदूर' हे आता दहशतवादाविरुद्ध भारताचे नवीन धोरण आहे. ते म्हणाले की, पाकिस्तान कोणत्याही दहशतवादी कारवाया आणि लष्करी कारवाईत सहभागी होणार नाही या आश्वासनानंतर भारताने डीजीएमओ स्तरावरील चर्चेचा विचार केला आहे. जर पाकिस्तानला आपले अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर त्याला त्याच्या दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट कराव्या लागतील. भारताचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आहे, दहशतवाद आणि चर्चा (टेरर अँड टॉक) एकत्र चालू शकत नाहीत, दहशतवाद आणि व्यापार (टेरर अँड ट्रेड) एकत्र राहू शकत नाहीत आणि पाणी आणि रक्त देखील एकत्र वाहू शकत नाही. पाकिस्तानमधील दहशतवादी आणि लष्करी तळांविरुद्ध भारताची प्रत्युत्तरात्मक कारवाई आता केवळ स्थगित करण्यात येत आहे, याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

## राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन

९०९६७०१२५३

# ऑपरेशन सिंदूर : खरे मित्र कोण, शत्रू कोण?

ज्योती मल्होत्रानंतर आयएसआयच्या आणखी एका एजंटला अटक करण्यात आली. तसेच लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी रझाउल्ला निजामनी खालिद ऊर्फ अबु साइउल्ला याला देखील पाकिस्तानच्या सिंध प्रांतामध्ये रविवारी अज्ञातांनी ठार मारले.

ऑपरेशन सिंदूरने जगातील राष्ट्रांचे भारताप्रती असलेले खरे दृष्टिकोन उघड केले. इस्रायलसारख्या मित्रांनी भारताच्या बाजूने खंबीरपणे उभे राहून आपली निष्ठा दर्शविली. युरोपियन युनियनने सावध भूमिका घेत समतोल राखण्याचा प्रयत्न केला, तर मुस्लिम राष्ट्रांमध्ये भारताच्या भूमिकेबद्दल तीव्र प्रतिक्रिया दिसून आली. या ऑपरेशनमुळे भारताला आपल्या मित्र आणि शत्रूंना अधिक चांगल्या प्रकारे ओळखण्याची संधी मिळाली.

दहशतवादाविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' हेच भारताचे धोरण असेल. 'ऑपरेशन सिंदूर' अद्याप संपलेले नाही, जेथे जेथे दहशतवाद असेल; तेथे तेथे त्याच्या मुळावर असाच घाव घातला जाईल. पाकिस्तानसोबच चर्चा केवळ दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीरवरच होईल असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रास संबोधित करून 'ऑपरेशन सिंदूर'चा पराक्रम देशातील माता-भगिनींना समर्पित केला. या ऑपरेशनमध्ये कोणी भारताचा खरा मित्र ठरला, तर कोणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या विरोधात गेला.



### भारतासाठी धोक्याची घंटा

तुर्कस्तान (तुर्की) हा सध्या पाकिस्तानचा सक्रिय समर्थक बनला आहे. ऑपरेशन सिंदूरच्या पृष्ठभूमीवर तुर्कस्तानने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर लष्करी व तांत्रिक मदत पुरवली आहे. विशेषत: तुर्कीचे बायरॅक्टर टीबी२ हे ड्रोन, जे युक्रेन-रशिया युद्धात प्रभावी ठरले, तेच ड्रोन तुर्कस्तानने पाकिस्तानला पुरवले आहेत. याशिवाय तुर्कीने पाकिस्तानला इतर आधुनिक शस्त्रास्त्रे, दारूगोळा, युद्धपद्धती आणि सैनिकी प्रशिक्षण या स्वरूपातही मदत केली आहे. ही मदत भारताच्या विरोधात आहे. तुर्कस्तानचे हे धोरण भारताच्या सामरिक सुरक्षिततेला व प्रतिमेला आव्हान देणारे आहे.

### तुर्कस्तानला धडा शिकवण्यासाठी...

भारतातून दरवर्षी लाखो पर्यटक तुर्कस्तानला जातात. हे पर्यटन तुर्कस्तानसाठी एक महत्त्वाचा आर्थिक स्रोत आहे. त्यामुळे भारतीय पर्यटकांनी तुर्कस्तानला जाणं पूर्णपणे थांबवावं. सरकारनेही 'तुर्कस्तानला प्रवास टाळा' असा सल्ला द्यावा. तुर्की एअरलाईन्स ही भारतात कार्यरत असून भारतातून थेट उड्डाणे चालवते. भारत सरकारने ही सेवा बंद करावी, किंवा कमीत कमी शुल्कवाढ, स्लॉट मर्यादा आणि विमानतळ सुविधा कमी करून त्यांच्यावर दबाव आणावा. तुर्कस्तानशी होणारा आयात व्यापार कमी करणे आवश्यक आहे. खास करून त्यांच्या संरक्षणसंबंधी उत्पादक कंपन्यांवर निर्बंध टाकणे गरजेचे आहे.

### कडक पावले उचलायला हवीत

तुर्कस्तानने पाकिस्तानला मदत करून भारताच्या विरोधात उघड भूमिका घेतली आहे. याविरोधात भारताने आर्थिक, राजनैतिक, माहिती युद्ध आणि मुत्सद्देगिरी या चारही पातळ्यांवर कडक पावले उचलायला हवीत. एक सार्वभौम राष्ट्र म्हणून भारताने ज्या देशाने आपल्याला अप्रत्यक्षपणे धोका दिला आहे, त्याला शब्द आणि कृतीतून स्पष्ट उत्तर देणे हे अत्यावश्यक आहे.

### भारतविरोधी कारवायांचा आधार

भारताने पाकिस्तानविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. मात्र, या लढाईत पाकिस्तानच्या बाजूने एक मोठा हात कार्यरत होता आणि तो म्हणजे चीन. चीनच्या अफाट आर्थिक आणि लष्करी मदतीमुळेच पाकिस्तान भारताविरुद्ध दहशतवाद, सीमेवरील घुसखोरी आणि युद्धजन्य कारवाया करण्यास सक्षम ठरतो. त्यामुळे चीनवर आर्थिक बहिष्कार आणि भारतामधील चीन समर्थक तत्त्वांवर सामाजिक दबाव काळाची गरज आहे.

### चीनवर आर्थिक बहिष्काराची गरज

चीनची अर्थव्यवस्था जगातील दुसऱ्या क्रमांकाची आहे. २०२४ मध्ये भारताने चीनकडून सुमारे १०० अब्ज डॉलर्सहून अधिक माल आयात केला. या आयातीतून चीनला मोठ्या प्रमाणात विदेशी चलन मिळते, ज्याचा वापर तो पाकिस्तानला मदत करण्यासाठी करतो. यात समाविष्ट आहे लष्करी शस्त्रास्त्रांचा पुरवठा, ड्रोन, क्षेपणास्त्र आणि निगराणी यंत्रणा, आर्थिक कर्जे, अनुदाने, संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानला राजनैतिक पाठिंबा.

### चीनची पाकिस्तानला मदत

चीनने पाकिस्तानला सुमारे २० अब्ज डॉलर्स किमतीची अत्याधुनिक शस्त्रे पुरवली आहेत. केवळ इतक्यावरच न थांबता, चीनने पाकिस्तानसाठी पाच सॅटेलाईट्स अवकाशात प्रक्षेपित केले असून, त्याद्वारे रणभूमीवरील भारतीय हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. परिणामी, भारतीय सैन्याच्या हालचाली, ठाणी, वाहतूक आदींबाबत माहिती पाकिस्तानला वेळोवेळी मिळत होती. या माहितीचा वापर करून पाकिस्तानने अचूक शस्त्रप्रयोग करून भारताचे लक्ष्यपूर्वक नुकसान केले.

### व्यापारी आणि कॉर्पोरेट भूमिका

भारतातील अनेक व्यापारी, कंपन्या आणि उद्योजक अजूनही चीनवर पूर्णपणे अवलंबून आहेत. स्वस्त उत्पादन, जलद वितरण आणि विकसित तंत्रज्ञान ही यामागची कारणे आहेत. परंतु या 'सुलभतेच्या' मोहात ते राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहोचवत आहेत. आपण जेव्हा चीनकडून माल खरेदी करतो, तेव्हा अप्रत्यक्षपणे भारतीय सैनिकांवर गोळी झाडणाऱ्या शस्त्रांचा खर्च आपण भरतो, हे वास्तव व्यापाऱ्यांनी आणि ग्राहकांनी लक्षात घेणे अत्यावश्यक आहे.

### सामाजिक बहिष्कार आवश्यक

भारताचा शत्रू चीनशी व्यावसायिक संबंध ठेवणारे राष्ट्रविरोधी आहेत, आर्थिक लाभाच्या नादात देशहित विसरले आहेत, भारतीय जनतेच्या भावनांशी प्रतारणा करीत आहेत. त्यांच्यावर सामाजिक बहिष्काराचे उपाय : त्यांची उत्पादने खरेदी न करणे, राष्ट्रप्रेमी व्यावसायिकांचा पाठिंबा वाढवणे, 'मेड इन चायना' टाळणाऱ्या दुकानांना प्राधान्य देणे आहे.

### चीनविरुद्ध आर्थिक बहिष्कार आवश्यक

भारतीय बाजारपेठेतून बाहेर फेकल्यास चीनला आर्थिक झटका बसेल, जो पाकिस्तानसारख्या देशाला दिल्या जाणाऱ्या मदतीत कपात घडवू शकतो. भारताला दहशतवाद, सीमावाद आणि सायबर हल्ले यांचा सामना चीनच्या सहकार्यामुळे करावा लागतो.

### स्वदेशीस चालना

'वोकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांचा उपयोग करून भारतातच तेच उत्पादन विकसित करता येते - जसे की मोबाईल उपकरणे, एलईडी दिवे, औषधांचे कच्चे पदार्थ इत्यादी. केंद्र सरकारने चिनी आयातीवर टप्प्याटप्प्याने निर्बंध घालावे.

उद्योग जगतातील राष्ट्रभक्त नेतृत्व तयार करणे, नागरिकांना चिनी उत्पादन ओळखण्याचे प्रशिक्षण देणे, स्वदेशी उत्पादनांना कर प्रोत्साहन आणि तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देणे, शाळा-कॉलेजांतून चीन विरोधी आर्थिक साक्षरता पसरवणे यांचा समावेश आहे.

### सायबर युद्धातील सहकार्य

चीनने सायबर युद्ध क्षेत्रातही पाकिस्तानला मोठे सहकार्य दिले आहे. चिनी तंत्रज्ञानामुळे पाकिस्तानची डिजिटल गुप्तचर क्षमता आणि माहिती संकलनाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी आणि राजकीय निर्णयक्षमतेत मोठा फरक पडलेला आहे.

### दुष्प्रचार युद्ध आणि आयएसआयची भूमिका

पाकिस्तानच्या आयएसआयने प्रचंड प्रमाणावर माहिती संकलन करून तिचा वापर भारताविरुद्ध दुष्प्रचार युद्धात केला आहे. सोशल मीडिया, आंतरराष्ट्रीय मंच आणि स्थानिक माध्यमांद्वारे भारतविरोधी भावना निर्माण करण्याचा यामध्ये प्रयत्न झाला. यातही चीनने अप्रत्यक्ष सहभाग घेतल्याचे संकेत मिळतात. हे सर्व पाहता स्पष्ट होते की, चीन पाकिस्तानचा वापर भारताविरुद्ध प्रॉक्सी युद्धासाठी करीत आहे.

### धोरणात्मक प्रतिसादाची गरज

भारताने काही चिनी वस्तूंवर आयात शुल्क आणि डम्पिंग शुल्क लावण्यास सुरुवात केली आहे. पण ही पावले अपुरी आणि मर्यादित आहेत. भारताने आता अधिक ठोस आणि आक्रमक धोरण अवलंबणे आवश्यक आहे.

### बलुच स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा

बलुचिस्तानमधील स्वातंत्र्यसैनिकांना राजनैतिक, नैतिक आणि माहिती युद्धात पाठिंबा देऊन चीनची तिथली गुंतवणूक निष्प्रभ करणे अत्यावश्यक आहे. सीपीईसीसारखी (सीपीईसी) महत्त्वाकांक्षी प्रकल्प योजना हाच चीनचा किल्ला आहे आणि त्याला हादरा देणं हे भारताचं उद्दिष्ट असायला हवं.

### तिबेट व तैवान धोरण

जर चीन सातत्याने पाकिस्तानला सामरिक मदत करीत असेल, तर भारतानेही तिबेट आणि तैवानप्रश्नी आपले धोरण अधिक आक्रमक करणे आवश्यक आहे. तिबेटी निर्वासित सरकारला खुले पाठबळ, तैवानशी व्यापार व तांत्रिक सहकार्य वाढवणे, हे सगळे चीनसाठी स्पष्ट संदेश देतील.

### निष्कर्ष

'देशप्रेम' केवळ रणभूमीत शत्रूशी लढून सिद्ध करावं लागत नाही; ते आपण आपल्या खरेदीतून, आपल्या निवडीतून आणि आपल्या व्यावसायिक निर्णयांतून देखील दाखवू शकतो. भारतासाठी चीन ही एक सामरिक आणि आर्थिक जोखीम आहे. त्यामुळे भारतातील नागरिक, व्यापारी, आणि कॉर्पोरेट वर्ल्ड यांचं हे कर्तव्य आहे की त्यांनी चीनमुक्त अर्थव्यवस्था उभारण्याच्या दिशेने ठोस पावले उचलावीत. हीच खरी राष्ट्रभक्ती ठरेल. चीन हा भारताचा क्रमांक एकचा शत्रू आहे, याबाबत कोणत्याही प्रकारची शंका उरू नये.

---

## मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४

# बदललेला पवित्रा...

दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे मुस्लिम दहशतवाद्यांनी नि:शस्त्र अवस्थेत आपल्या कुटुंबाबरोबर सुटी घालविण्यासाठी आलेल्या हिंदूंना गोळ्या घालून ठार केले. प्रत्येक माणसाला गोळी घालताना अतिरेक्यांनी तो धर्माने हिंदूच असल्याची खात्री करून घेतली होती. यावरून इस्लाम धर्माचा इतर धर्मीयांविषयी असलेला द्वेष स्पष्ट होतो. या द्वेषाचे मूळ हे इस्लामच्या मूळ ग्रंथातच असल्याचे दिसून येते.

वास्तविक आता हजार वर्षांपासून मुस्लिम धर्मीयांचा इतर धर्मीयांविषयी असलेला हा द्वेष सगळ्या जगाला माहीत आहे. इतकी वर्षे या अतिरेकी द्वेषाचा, अनुदारतेचा आणि विध्वंसक वृत्तीचा सामना करीत आपली संस्कृती, श्रद्धा, उपासना पद्धती, हिंदू धर्म आणि आपले अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या हिंदू समाजाने याआधीच वेगळी वाट चोखाळायला हवी होती. हिंदूंनी वेगळा प्रतिसाद देत अतिरिक्त औदार्य दाखविण्याची आवश्यकता नव्हती. कारण इस्लामिक आक्रमणाचा स्पष्ट अर्थ पृथ्वीराज चौहानापासून येथील सगळ्या हिंदू राज्यकर्त्यांना माहिती होता. पण मुळातच असलेली उदारता, दिलदारी आणि सहनशीलता आडवी आली. तेव्हा महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी मुस्लिम आक्रमक राज्यकर्ते आणि हिंसक अतिरेक यांचा मुकाबला कसा करावा, याचा वस्तुपाठच हिंदू मराठी जनमानसाला घालून दिला होता. माधवराव पेशव्यांपर्यंत सगळेच रणझुंजार राज्यकर्ते तो वस्तुपाठच गिरवत असत. छत्रपती शिवाजी महाराजांपासून अगदी अहल्याबाई होळकरांपर्यंत सर्व राज्यकर्त्यांनी केलेले स्वराज्य संस्थापनेचे, हिंदू राज्य संरक्षणाचे कार्य, तसेच विविध मंदिरांचा जीर्णोद्धार व केलेल्या लोकोपयोगी कामावरून हे सहज स्पष्ट होते. हिंदूंच्या तिखट तलवारीचा आणि युद्धतंत्राचा मुकाबला इस्लामी राज्यकर्ते करू शकले नाही. दिल्लीचा बादशहा मराठी फौजांच्या कृपेने तख्तावर बसत असे हे इतिहास सांगतो. यात बदल झाला तो दुसरा बाजीराव पेशवा पराभूत झाल्याने इंग्रजी अंमल देशावर प्रस्थापित झाल्यापासून. इंग्रजी सत्तेविरुद्ध वेगवेगळ्या ठिकाणी सातत्याने उठाव होत राहिले. सगळ्यात मोठा उठाव १८५७ मध्ये झाला आणि त्याचा परिणाम म्हणून इस्ट इंडिया कंपनीचा अंमल संपुष्टात येऊन राणीची सत्ता स्थापन झाली. त्यानंतर १८८५ मध्ये काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले. आता भारतातील हिंदू आणि मुसलमान समाजाला इंग्रजी सत्ता हा एकच समान शत्रू वाटू लागला. मग बहुसंख्य हिंदूंच्या राजकीय पक्षांना काँग्रेसमध्ये मुस्लिम समाजाला बरोबर घ्यायला हवे, असे वाटू लागलं. तिथून मग ईश्वर-अल्ला तेरो नाम, गंगा जमुना तहजीब, रिलिजन ऑफ पीस असले नॅरेटिव्हज सुरू झाले. देश स्वतंत्र होताना या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाच्या आखणीची जबाबदारी पं. जवाहरलाल नेहरूंना दिली गेली. हिंदू-मुस्लिम एकतेचे खरे किंवा खोटे भूत डोक्यावर बसवून त्यांनी भारताच्या परराष्ट्र नीतीला आकार दिला. वास्तविक इतर राष्ट्रांशी येणाऱ्या संबंधांना असलेल्या शत्रुत्व, मित्रत्व, सामाजिक, सांस्कृतिक, व्यापारी, राजकीय अशा कंगोऱ्यांचा विचार करून एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून कसा आकार द्यायचा याची नीती किंवा धोरण यालाच परराष्ट्र नीती किंवा परराष्ट्र धोरण असे म्हणतात. त्यामुळे हे धोरण स्थलकालपरत्वे लवचीकदेखील असावे लागते. हे धोरण ठरविताना राष्ट्रहित हे नेहमीच केंद्रस्थानी असते. या धोरणात एकमेव स्थिर मुद्दा जर कोणता असेल तर तो राष्ट्रहित हाच असतो. या दृष्टीने लवचीकता असलेली पण राष्ट्रहिताचा विचार करणारी परराष्ट्र नीती या देशाने आखली आणि त्याबरहुकूम इतर देशांशी असलेल्या आपल्या संबंधांना आकार देण्याचा प्रयत्न केला. याच तत्त्वानुसार या देशाने शेजारी देशांशी सौहार्दाचे संबंध टिकवण्याचे ७० वर्षे प्रयत्न केले. पण शेजारी देश आणि विशेषत: पाकिस्तान याला भारताचा दुबळेपणा समजू लागले. या पृष्ठभूमीवर दिनांक १२ मे २०२५ रोजी रात्री आठ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणाचे विश्लेषण केले पाहिजे. या संबोधनात आपल्या तीनही विजयी सेनादलांचे मन:पूर्वक अभिनंदन व अभिवादन करून पंतप्रधान मोदींनी चार मुद्दे मांडले. एक म्हणजे ऑपरेशन सिंदूर आता न्यू नॉर्मल राहील. दुसरे म्हणजे भारत कोणत्याही प्रकारचे आण्विक ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही. तिसरे म्हणजे दहशतवादी संघटनांचे नेते ज्या देशातून आपल्या कारवाया करतात तो देश आणि अतिरेकी संघटना यांना भारत वेगळे मानणार नाही. चौथा मुद्दा म्हणजे व्यापार आणि भय (टेरर अँण्ड टॉक) पाणी आणि रक्त एकाच वेळी वाहणे हा देश सहन करणार नाही. हे चारही मुद्दे हिंदू भारताची मुस्लिम पाकिस्तानशी तसेच देशांतर्गत असलेल्या मुस्लिम समाजाशी ठेवल्या जाणाऱ्या संबंधांची भविष्यातील दिशा सांगणारे आहेत. ऑपरेशन सिंदूर आता न्यू नॉर्मल असणार याचा अर्थ आता दहशतवादी संघटना जरी परकीय



भूमीवरून आपल्या कारवाया करणार असतील तर भारत केव्हाही त्या देशाच्या सीमांचे उल्लंघन करण्यास मागेपुढे पाहणार नाही. आपल्या निष्पाप नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी भारत आपल्या पद्धतीने पावले उचलण्यास सिद्ध आणि स्वतंत्र असेल. तेव्हा भारतीय हद्दीत, भारतीय नागरिकांवर हल्ले होणार नाहीत याची काळजी भारतीय संरक्षण दलांइतकीच शेजारी देशांची देखील राहील. भारतीय सैन्यदलाच्या ऑपरेशनला तात्पुरती स्थगिती दिलेली आहे. ही लष्करी कारवाई संपलेली नाही. भूतकाळात, शेजारी म्हणून, जे जे विशेष फायदे इस्लामिक देशांना भारताकडून मिळत होते ते भविष्यात सुरू राहतील याची कोणतीही शाश्वती नाही. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी चीनमध्ये केलेल्या आगावू वक्तव्याने त्या देशाला देण्यात येणारी फ्री शिपिंग सवलत भारताने मागे घेतली याची वाचकांना आठवण असेलच. त्यामुळे जगातील इस्लामिक देशांनी 'आतंक आणि आत्मीयता' एकत्र नांदणार नाहीत हे पक्के लक्षात घ्यायला हवे. अर्थात जे देश हिंदू भारताशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवू इच्छितात त्यांनी दहशतवादाची आपल्या भूमीवरून निर्यात केली जाणार नाही, याची काळजी घ्यावी. हे पाकिस्तान, बांगलादेश यांना ठणकावताना पंतप्रधान मोदींनी भारताच्या बदललेल्या धोरणाचे संकेत चीनला देखील दिलेले आहेत. यापुढे संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यासपीठावरदेखील सर्वच देशांना याचा विचार करावा लागेल. अणुयुद्धाची शक्यता वर्तवत कोणीही भारताला ब्लॅकमेल करण्याचा यापुढे प्रयत्न करू नये. भारत हे एक अण्वस्त्र सज्ज राष्ट्र असून आमची जबाबदारी आम्हाला कळते. पण कोणी आपल्या देशाजवळ अण्वस्त्रे आहेत म्हणून आम्हाला डिवचण्याचा प्रयत्न करू नये. आम्ही अण्वस्त्रे जमिनीवरून, आकाशातून वा पाण्यातूनही चालवू शकतो तसेच आमच्या शत्रूंची अण्वस्त्रे नष्ट देखील करू शकतो हे जगाने यापुढे लक्षात ठेवलेले योग्य राहील हेही पंतप्रधानानी ठणकावले आहे. आम्ही अण्वस्त्रांचा प्रथम वापर करणार नाही, पण तुम्ही करण्याचा विचार जरी करीत असाल तर भारत सहन देखील करणार नाही. जगातील सर्वच देशांनी अण्वस्त्र सज्ज राष्ट्र म्हणून यापुढे भारताचा योग्य सन्मान राखला पाहिजे हे या वक्तव्यातून स्पष्ट होते.

'टेरर अँण्ड टॉक' यापैकी एकच कोणती तरी गोष्ट यापुढे घडेल. भय आणि संवाद-चर्चा यापुढे एकाच वेळी घडणार नाही. धार्मिक द्वेषातून हिंदू रक्त व आणि सद्भावनेतून सिंधू नदीचे पाणी एकाच वेळी यापुढे वाहू शकणार नाही. भारत आणि हिंदू समाज जसे दिलदारपणे, 'जगा आणि जगू द्या' म्हणून सिंधू, चिनाब आणि झेलमचे पाणी भयंकर कत्तली आणि हत्या होऊनही पाकिस्तानला देत होते तेही येथून पुढे होणार नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास इस्लामिक दहशतवादाला माणुसकी आणि बंधुभावातून निर्माण होणाऱ्या सामंजस्याने उत्तर दिले जाणार नाही. पाकिस्तानच्या जन्मापासूनच हा देश भारताचा द्वेष करीत आलेला आहे. भारताच्या बाजूने शेजारी देशांशी मैत्रीचे संबंध जोपासण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करून झाला. परंतु कोणतेही कारण नसताना या देशाने भारतावर पाच वेळा युद्ध लादले. या पाचही युद्धात पराभूत झाल्याने पाकिस्तानने आपल्या भूमीवरून दहशतवाद निर्यात करायला सुरुवात केली. मागील जवळजवळ ४० वर्षे भारत या दहशतवादाच्या लढ्यात अडकून पडला आहे. आतापर्यंत पाकिस्तानी सैन्य आणि सरकार यांचा या दहशतवादी कारवायात सहभाग असल्याचे असंख्य पुरावे अनेकदा देऊनही उपयोग झाला नाही. त्यामुळे आता दहशतवादी संघटना त्यांचे म्होरके आणि त्या देशातील स्वायत्त सरकार यात भारत फरक करणार नाही. त्यामुळे यापुढे भारताच्या संयमाची परीक्षा शेजारच्या इस्लामिक देशांनी पाहू नये. इथून पुढे थेट 'ठोशास ठोसा' (गोली का जबाब गोलेसे) हेच धोरण शेजारील इस्लामिक देशांशी ठेवले जाईल हेच पंतप्रधानांनी स्पष्टपणे जगाला सांगितले. शेजारी असलेल्या इस्लामिक देशांप्रती भारताच्या बदललेल्या धोरणाचे हे द्योतक मानायला हवे. आजपर्यंत हा देश सामोपचाराने इस्लामिक आक्रमकता तसेच त्यांच्या इतर धर्मांप्रती असलेल्या तिरस्काराचा सामना करीत होता. येथून पुढे आक्रमकतेला उत्तर आक्रमक कारवाईनेच देण्यात येईल. शेजारी देश, निरपराध जनता म्हणून कोणत्याही प्रकारची दयामाया दाखविण्यात येणार नाही, हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्याचा अर्थ निघतो. यावरून देशातील मुसलमान योग्य तो बोध घेऊन आपल्या सामाजिक वर्तणुकीत बदल करतील, तर ते त्यांच्यासाठीच फायद्याचे ठरेल.

---

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे/९४२२८०४४३०

# अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स आणि सेकंड लेडी उषा चिलुकुरी

डोनाल्ड ट्रम्प आणि जे. डी. व्हान्स ही जोडी अमेरिकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदी निवडून आली आहे. यांच्या स्वभाव, विचार आणि ध्येय धोरणाचा जागतिक राजकारणावर निदान येती चार वर्षे तरी खूप परिणाम होणार आहे. ट्रम्प आपल्याला पुष्कळसे माहीत झाले आहेत. व्हान्स यांचे तसे नाही. त्यांच्या सहधर्मचारिणी तर भारतीय वंशाच्या आहेत. या जोडप्याचा परिचय करून घेण्याचा प्रयत्न म्हणूनच महत्त्वाचा ठरतो.

अमेरिकेचे विद्यमान उपाध्यक्ष जेम्स डेव्हिड व्हान्स हे सामान्यांमधून वर आलेले स्कॉट्स-आयरिश आहेत. ते एक अमेरिकन रिपब्लिकन राजकारणी, वकील, लेखक आणि माजी सैनिक आहेत. ते २०२३ पासून ओहायोमधील सिनेटर आहेत. व्हान्स रिपब्लिकन पक्षाकडून २०२४ च्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीत ते उपाध्यक्षपदाचे उमेदवार होते. मिडलटाऊन हायस्कूलमधून १२ वी उत्तीर्ण झाल्यावर व्हान्स यूएस मरीन कोरमध्ये सामील झाले. त्यांनी २००३ ते २००७ दरम्यान युद्ध वार्ताहर म्हणूनही काम केलेले आहे. नंतर त्यांनी पदवी संपादन केली. त्यांनी आपले लहानपण, शिक्षण आणि त्याकाळची कठीण परिस्थिती यावर 'हिलिबिली एलिजी- आधुनिकतेपासून दूर असलेल्याची शोकगाथा', या नावाचे पुस्तक लिहिले आहे. २०१६ च्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीदरम्यान या पुस्तकाला खूप प्रसिद्धी मिळाली होती.

२०१६ च्या निवडणुकांमध्ये व्हान्स यांनी रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांना प्रखर विरोध केला होता. परंतु नंतर त्यांनी आपली भूमिका बदलली व ते ट्रम्प यांचे प्रमुख पाठीराखे झाले. ट्रम्प यांनीही व्हान्स यांची २०२४ च्या निवडणुकीत आपले उपराष्ट्राध्यक्षीय उमेदवार म्हणून निवड केली. अमेरिकेतील प्रमुख पक्षाकडून मूळच्या एखाद्या सामान्य व्यक्तीला नामांकन मिळाल्याचे हे बहुदा पहिलेच उदाहरण असावे.

गर्भपात, समलिंगी विवाह, अल्पवयीन मुलांचे लिंगबदल आणि बंदूक वापरनियंत्रण या सगळ्यांना व्हान्स यांचा विरोध आहे. ते पुराणमतवादी धोरणांना प्रोत्साहन देत असतात. व्हान्स यांचा युक्रेनला रशियाविरुद्ध लढण्यासाठी अमेरिकन लष्करी मदत देण्यालाही विरोध आहे. हा तपशील दोन दृष्टींनी महत्त्वाचा आहे. एकतर आजतरी ते डोनाल्ड ट्रम्प यांच्या पूर्ण विश्वासातले सहकारी आहेत. तसेच त्यांच्याकडे अमेरिकेचा भावी अध्यक्ष म्हणूनही पाहिले जाते. पण डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनात वेगळाच विचार घोळतो आहे, असे म्हणतात. डोनाल्ड ट्रम्प यांची ही अध्यक्षपदाची दुसरी कारकीर्द आहे. घटनेतील तरतुदीनुसार त्यांना तिसऱ्यांदा अध्यक्ष होता येणार नाही. पण त्यांनी दुसरी कारकीर्द पूर्ण व्हायच्या अगोदरच राजीनामा दिला तर? अध्यक्ष म्हणून दोन कारकीर्दी पूर्ण होणार नाहीत आणि त्यांना तिसऱ्यांदा अध्यक्ष होता येईल. पुढे काय होणार ते आज सांगता येणार नाही. असो.

व्हान्स यांनी 'हिलिबिली एलिजी- आधुनिकतेपासून दूर असलेल्याची शोकगाथा' लिहिलेली आपण पाहतो आहोत. पुढे मात्र ते उत्तम पोशाखाचे चाहते, भांडवलवादी (कॅपिटलिस्ट) झाले, राजकारणात शिरले आणि सिनेटर झाले. अमेरिकेच्या अध्यक्षाच्या भेटीला येताना युक्रेनच्या झेलेन्स्कींनी सूट का परिधान केला नाही म्हणून ते भडकलेले आपण पाहतो. झेलेन्स्की या मुळातल्या रांगड्या आणि विनोदी अभिनेत्याचे एका लढाऊ वृत्तीच्या राजकारण्यात झालेले रूपांतर त्यांना भावले नाही. मात्र झेलेन्स्की सुटाबुटात भेटीला आले नाहीत, हा मुद्दा त्यांना आक्षेपार्ह वाटला. परिस्थितीनुसार माणूस किती बदलू



शकतो, हे आपल्याला या निमित्ताने जाणवू शकेल. कट्टर ट्रम्प विरोधक ते पराकोटीचे ट्रम्प समर्थक या त्यांच्यातील बदलाचेही म्हणूनच आपल्याला आश्चर्य वाटायला नको. एकेकाळी त्यांना ट्रम्प महामूर्ख आणि निंदनीय वाटत होते, पण तो आज इतिहास झाला आहे. कोणे एके काळाचे प्रागतिक आणि विचारी व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले व्हान्स आज ट्रम्प यांचे 'केवळ कैवारी' झाले आहेत. युरोपियन युनियन एक प्रतिष्ठित राष्ट्र संघटना! पण तिची किंचितही पत्रास न बाळगता त्यांनी खरडपट्टी काढीत पुरती शोभा केली. ग्रीनलंडने अमेरिकेत सामील व्हावे हा ट्रम्प यांचा निरोप घेऊन त्यांना 'मान न मान, मै तेरा मेहमान', अशा भूमिकेत ग्रीनलंडला जाताना आपण पाहिले आहे. फटकळपणा एकवेळ मान्य करता येईलही पण राजकीय सभ्यतेच्या मर्यादा आपण ओलांडतो आहोत, असे त्यांना वाटले नाही, हे मुद्दे उद्धृत करून वृत्तपत्रसृष्टी त्यांच्यावर खपा झाली याची त्यांना पर्वा नाही. तसेच मागे एकदा कमला हॅरिस यांचा उल्लेख 'निपुत्रिक बाई' (चाईल्डलेस लेडी) असा करून त्यांनी सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या. 'व्हान्स यांना तुमचे उत्तराधिकारी समजायचे का?', असा प्रश्न डोनाल्ड ट्रम्प यांना विचारला असता त्यांनी नकारार्थी उत्तर दिले होते. पण व्हान्स ही अतिशय सक्षम व्यक्ती आहे, अशी पुस्तीही त्यांनी जोडली होती. व्हान्स ही जबरदस्त महत्त्वाकांक्षा असलेली व्यक्ती आहे. रिपब्लिकन पक्षातही त्यांचा दबदबा आहे. पण ट्रम्प यांचे पारडे जड आहे, हे या चतुर राजकारण्याला जाणवले आणि त्याने विरोध करायचे सोडून पलटी मारली. ट्रम्प यांनीही, 'झाले गेले (वॉशिंग्टन जवळच्या) पोटोमॅक नदीला मिळाले', असे म्हणत व्हान्स यांना पलटूराम न मानता एकदम आपले उपाध्यक्षपदाचे उमेदवार बनवले. राजकारणात अशी भूमिका घेणे आवश्यक असते. व्हान्स यांचे राजकीय चातुर्य निश्चितच वरच्या दर्जाचे आहे, ते असे. त्याची नोंद ट्रम्प यांनी घेतली आणि त्यांनी व्हान्स यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवला आहे. राजकीय शिष्टाचाराला अनुसरून भारतानेही मेहमाननवाजीत कसर ठेवलेली नाही. व्हान्स सहकुटुंब सहपरिवार भारत भेटीवर आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बालगोपालांबरोबर नेहमीप्रमाणे दिलखुलास गप्पागोष्टी केल्या. व्हान्स आणि पंतप्रधान मोदी या दोघात भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारावर चर्चा झाली. टेरिफ कपात आणि त्याचवेळी भारत आणि अमेरिकेत दृढतर व्यापारी स्नेहसंबंध असा दुहेरी हेतू साधण्याच्या बाबतीत भारताचे प्रयत्न किती फलदायी होतात, ते यथावकाश समोर येईलच. ऊर्जा, संरक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञान यात भारताला विशेष रुची आहे. जागतिक प्रश्नांसोबतच प्रादेशिक महत्त्वाचे विषयही चर्चेला घेतले गेले. संवाद आणि शांततायुक्त भूमिकेतून वाटाघाटी हेच समस्या हाताळण्याचे योग्य मार्ग आहेत यावर उभय पक्षांची सहमती होती. आधुनिक व्यापार करार करताना रोजगार निर्मितीवर भर दिल्यास दोन्ही देशातील जनतेचे जीवनमान उंचावेल, असे व्हान्स यांचे मत होते.

व्हान्स यांच्या कायदेतज्ज्ञ तेलगू पत्नी उषा चिलुकुरी या आता अमेरिकेच्या उपाध्यक्षाची पत्नी या नात्याने सेकंड लेडी ठरतात. तसे खुद्द व्हान्स आंध्रप्रदेशचे जावई आहेतच. या जोडप्याबद्दल एक हलकाफुलका किस्सा सांगितला जातो. उषा आपल्या पतीला कासवाची उपमा देतात. 'संकटाची थोडीशीही चाहूल लागताच कासव जसे आपले अंग चोरून कवचाखाली घेते, तसे 'ह्यांचे वागणे असते', असे त्या विनोदाने म्हणत असत. आज व्हान्स यांनी परराष्ट्र व्यवहार, मंदी आणि अर्थकारण, रोजगार क्षेत्राच्या समस्या यावर ट्रम्प यांची येती राजवट लक्ष केंद्रित करील, असे घोषित केले आहे. यावरून त्यांना अमेरिकेसमोरील गंभीर समस्यांची जाणीव आहे. जे. डी व्हान्स काहीसे फटकळ स्वभावाचे म्हटले पाहिजेत. त्यांच्या पत्नी उषा या संयमी आहेत. जेडींच्या सल्लागार म्हणून आता त्या ओळखल्या जातात. उषा या मूळच्या भारतीय आहेत. दोन संस्कृतींचा मिलाफ सांभाळून संसार चालवणाऱ्या उषा व्हान्स या अमेरिकेच्या राजकारणात आता ठळकपणे दिसू व वावरू लागल्या आहेत. धकाधकीच्या राजकारणात सतत व्यग्र असलेल्या आणि काहीशा शीघ्रकोपी स्वभावाच्या व्यक्तीची साथ द्यायची तर जोडीदाराच्या अंगी संयम, समजुतदारपणा आणि हजरजबाबीपणा असावा लागतो. हे गुण उषा व्हान्स यांनी आत्मसात केले आहेत. काहींच्या मते हे गुण अंगी होते म्हणूनच उषा सहधर्मचारिणीची भूमिका वठवण्यात यशस्वी झाल्या आहेत. व्हान्स अमेरिकन सैन्यात मरीन होते. निवृत्तीनंतर त्यांनी आत्मचरित्र लिहिले आणि ते गाजले. यावर सिनेमाही तयार झाला, हे खरे आहे. पण हे सर्व घडू शकले उषा यांच्यामुळे. यंदा जेडींनी अमेरिकेचे उपाध्यक्ष म्हणून शपथ घेतली. त्याचबरोबर उषा अमेरिकेच्या 'द सेकंड लेडी' झाल्या. पण यासाठीची गुणसंपदा त्यांनी त्या अगोदरच संपादन केली होती.

भारतीय वंशाच्या उषा पतीसह नुकत्याच भारताच्या दौऱ्यावर येऊन गेल्या आहेत. आपण आपल्याच देशात आलो आहोत, असे त्यांच्या व्यवहारातून जाणवत होते. इवान, विवेक, मीराबेल या आपल्या मुलांना त्या अमेरिकन संस्कृतीतच वाढवत आहेत, यात शंका नाही. पण आपल्या मुलांना भारतीय संस्कृतीचीही ओळख आणि आवड असावी, अशी त्यांची भूमिका आहे. विशेष हे आहे की, त्यांचे पती जेडी हेही उषा यांच्या भारतीय संस्कृतीचा पूर्ण सन्मान राखतात. या दोघांचे लग्न जसे ख्रिश्चन आणि भारतीय अशा दोन्ही पद्धतीने झाले आहे तसेच या दोन संस्कृतींचा मेळ आपल्या पुढच्या पिढीत दिसावा असे त्यांना मनोमन वाटते.

## अर्थविश्व

# धार्मिक पर्यटनामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी



सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम आर्थिक विस्तारासाठी शक्तिशाली प्रेरक, मुख्य स्रोत बनू शकतात हे अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे सिद्ध झाले आहे. २२ जानेवारी २०२४ मध्ये अयोध्या येथील श्रीराम मंदिरात भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला होता. या सोहळ्याला आज १ वर्ष चार महिने उलटून गेले आहेत. मात्र, या सोहळ्यानंतर अयोध्येतील धार्मिक पर्यटनाला प्रचंड चालना मिळाली आणि एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेतही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिरातील रामललाची प्राणप्रतिष्ठा विविध आर्थिक आणि विकासात्मक सिद्धांतांचे प्रतीक आहे. या सोहळ्यामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी आली असून एकूणच या अर्थव्यवस्थेवर दूरगामी आणि सकारात्मक परिणाम होणार आहे. २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम संस्था जेफरीजने वर्तवली आहे. तर, २०२५ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ६.७ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस क्रिसिलने वर्तविला आहे. मुख्य म्हणजे भारताच्या या वाढीव अर्थव्यवस्थेत मंदिरे, हिंदू सण-उत्सव व धार्मिक पर्यटन इत्यादींचे महत्त्वपूर्ण योगदान राहणार आहे. या पृष्ठभूमीवर अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे झालेल्या आर्थिक विकासाचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. अयोध्येतील प्राणप्रतिष्ठेत वाढीव पर्यटन, रोजगार निर्मिती आणि अशाच प्रकारचे सकारात्मक आर्थिक परिणाम निर्माण करण्याची क्षमता आहे तसेच यामुळे एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकास घडून येणार आहे. अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे स्थानिकांच्या दरडोई उत्पन्नात भरघोस वाढ झाली आहे. या सोहळ्यामुळे अयोध्येला जागतिक पातळीवर नवी ओळख मिळाली आहे. त्यामुळे केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील लक्षावधी पर्यटकांचा ओघ अयोध्येकडे वळला आहे. केवळ अयोध्याच नव्हे तर भारतातील अनेक ख्यातनाम मंदिरांमुळे तसेच तेथील विकास कामांमुळे धार्मिक पर्यटनाला प्रचंड चालना मिळून देशाच्या महसुलात तर भर पडत आहेच; शिवाय स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळून त्यांच्या आर्थिक उत्पन्नातही मोठी वाढ झाली आहे. आध्यात्मिक अर्थात 'स्पिरिच्युअल टुरिझम' हा एक अत्यंत यशस्वी असा व्यवसाय भारतात मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ घातला आहे. सरकारी आकडेवारीनुसार केवळ एका अयोध्येच्या श्रीराम मंदिरातच दरवर्षी कमीत कमी ५ कोटी लोक दर्शनाला येतील. भारतात अशी कित्येक धार्मिक-आध्यात्मिक श्रद्धास्थाने, शक्तिपीठे आहेत. आजमितीला २००-२५० मोठी भारतीय शहरे त्या शहरातील देवालयांमुळे आर्थिकदृष्ट्या सशक्त आहेत. तिरुपती बालाजी देवस्थानची वार्षिक आर्थिक उलाढाल ३००० कोटी रुपयांची आहे. महाराष्ट्रातील शिर्डी देवस्थान कमीत कमी ५०० कोटींची उलाढाल करीत असते.

अयोध्येतील श्रीराम मंदिर व श्रीराम मंदिराची निर्मिती शास्त्रीय आर्थिक सिद्धांतांना अनुरूप आहे. गुंतवणूक आणि भांडवल उभारणी आर्थिक विकासाला चालना देतात. श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठेमुळे या दोन्ही गोष्टी साधण्यास मदत मिळणार आहे. मंदिराच्या बांधकामासाठी निर्देशित केलेल्या धनराशीचा मोठ्या प्रमाणात परिणाम होऊ शकतो. रोजगाराच्या विपुल संधी निर्माण होऊ शकतात तसेच वस्तू आणि सेवांची मागणी वाढू शकते. अयोध्येला तीर्थक्षेत्रात रूपांतरित करण्याच्या संदर्भात हे आर्थिक प्रोत्साहन विशेष स्वरूपात महत्त्वपूर्ण आहे. कारण धार्मिक पर्यटन अनेकदा स्थानिक समुदायांना भरीव आर्थिक लाभ देते.

अयोध्येतील रामललाच्या प्राणप्रतिष्ठेमुळे शाश्वत विकास, सांस्कृतिक भांडवल, संस्थात्मक अर्थशास्त्र आणि भागीदारी सिद्धांत यांच्याशी जुळवून घेण्याची एक अनोखी संधी प्राप्त झाली आहे. हे सर्व शाश्वत विकास उद्दिष्टे (एसडीजी) द्वारे निर्धारित केलेल्या दीर्घकालीन आर्थिक आणि विकासात्मक उद्दिष्टांमध्ये भरीव योगदान देतात. शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून, हे आयोजन विकास आराखड्यात पर्यावरण अनुकूल (इको-फ्रेंडली) पायाभूत सुविधा आणि संवर्धन-संरक्षण उपाय एकत्रित (एकीकृत) करण्यासाठी एक मॉडेल म्हणून काम करू शकतो. हे शाश्वत आर्थिक विकासाच्या तत्त्वांना अनुरूप आहे, जे पर्यावरणीय व्यवस्थापनासह आर्थिक प्रगती संतुलित करण्याच्या महत्त्वावर भर देते. याव्यतिरिक्त प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम, सांस्कृतिक भांडवल सिद्धांत आणि संस्थात्मक अर्थशास्त्राच्या संदर्भात देखील महत्त्वाचा आहे. सांस्कृतिक वारशाचे जतन आणि शांती आणि न्यायाचे वातावरण निर्माण करणे हे शाश्वत विकासाचे अविभाज्य अंग आहे. श्रीराम मंदिरासारखी सांस्कृतिक संपत्ती पर्यटकांना आकर्षित करून आणि महसूल निर्माण करून आर्थिक वाढीसाठी उत्प्रेरक म्हणून काम करू शकते.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातील विविध भागधारकांना सहभागी करून घेणारे सहयोगात्मक प्रयत्न भागीदारी सिद्धांतांना अनुरूप आहेत.

सरकारी संस्था, खाजगी उपक्रम आणि स्थानिक समुदाय यांच्यातील सहकार्य व्यापक, सर्वसमावेशक आर्थिक आणि विकासात्मक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामूहिक कृतीचे महत्त्व दर्शवते. अशी भागीदारी आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. जसजसे कार्यक्रम पुढे येतील तसतसे अयोध्येमध्ये शाश्वत विकास, सांस्कृतिक समृद्धी आणि सहयोगी शासनाचे प्रतीक म्हणून उदयास येण्याची क्षमता आहे, ज्यामुळे एसडीजीच्या शोधात इतर क्षेत्रांसाठी एक उदाहरण प्रस्थापित होईल.

मक्का-मदिना, व्हॅटिकन आणि बोधगया यांसारख्या जगभरातील प्रसिद्ध धार्मिक स्थळांच्या उल्लेखाशिवाय यासंदर्भातील चर्चा अपुरी राहते. मात्र, अशा प्रकारची चर्चा अयोध्येतील श्रीराम मंदिरातील रामललाच्या प्राणप्रतिष्ठेचा आर्थिक परिणाम समजून घेण्यासाठी वैज्ञानिक आधार प्रदान करते. धार्मिक कार्यक्रम आणि तीर्थयात्रा आर्थिक विकासाला कशा प्रकारे उत्तेजन देऊ शकतात हे मक्केच्या आसपास दिसून येणाऱ्या आर्थिक प्रगतीमुळे दिसून येते. याकडे एक प्रासंगिक उदाहरण म्हणून पाहता येईल.

दुसरे उल्लेखनीय उदाहरण म्हणजे इटलीमधील व्हॅटिकन सिटी. रोमन कॅथोलिक चर्चचे केंद्र म्हणून व्हॅटिकन सिटी दरवर्षी लक्षावधी यात्रेकरू आणि पर्यटकांना आकर्षित करते. यामुळे आदरातिथ्य, वाहतूक आणि स्थानिक व्यवसाय यासारख्या विविध क्षेत्रांवर सकारात्मक परिणाम करणारा आर्थिक प्रभाव लक्षणीय आहे. याव्यतिरिक्त, भारतातील बोधगयेचेही समर्पक उदाहरण देता येईल. बोधगया येथे गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्ती झाली. त्यामुळे लक्षावधी बौद्ध अनुयायी येथे जगभरातून भेट देतात. बोधगयेच्या धार्मिक महत्त्वामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटनाला चालना मिळून या परिसराचा आर्थिक विकास घडून येण्यात मदत मिळत आहे. जगभरातील यात्रेकरू बोधगयेला भेट देतात, ज्यामुळे स्थानिक समुदायामध्ये आर्थिक क्रियाकलाप वाढतात. अयोध्येतील रामललाच्या प्राणप्रतिष्ठेमुळेदेखील जगभरातील कोट्यवधी लोक येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात भेट देणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे अयोध्या शहराचाच नव्हे तर आजूबाजूच्या परिसराचा देखील मोठ्या प्रमाणात विकास होणार असून आर्थिक समृद्धीत भर पडणार आहे.


सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम आर्थिक विस्तारासाठी शक्तिशाली उत्प्रेरक असू शकतात, हे प्राणप्रतिष्ठेमुळे सिद्ध झाले आहे. अयोध्येतील प्राणप्रतिष्ठेत वाढीव पर्यटन, रोजगार निर्मिती आणि अशाच प्रकारचे सकारात्मक आर्थिक परिणाम निर्माण करण्याची क्षमता आहे तसेच यामुळे एकूणच सामाजिक-आर्थिक विकास घडून येतो, या संकल्पनेलाही बळकटी मिळते. राम मंदिरातील रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात एक परिवर्तनकारी शक्ती बनण्याची क्षमता आहे.

धार्मिक स्थळांचे आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे व देशाचे एकूणच आर्थिक स्वरूप बदलवून टाकण्यात धार्मिक क्षेत्रे भरीव योगदान देतात, हे या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याने सिद्ध झाले आहे. शाश्वत पद्धतींचे एकत्रीकरण करून, सांस्कृतिक शिक्षण संरक्षित करून आणि शांती आणि न्यायाला प्रोत्साहन देऊन अयोध्या हे सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे मॉडेल म्हणून उदयास येऊ शकते आणि भविष्यातील प्रयत्नांसाठी एक आदर्श ठेवू शकते.

*(ऑर्गनायझरवरून साभार)*

## पर्यावरण

# राज्य समृद्ध करणारी कृष्णा



दक्षिण भारतातील गोदावरी आणि कावेरी यांदरम्यानची प्रमुख नदी म्हणून कृष्णा नदीचा उल्लेख होतो. या नदीची लांबी सु. १,२८० किमी.; जलवाहन क्षेत्र सु. २,५२,४०० चौ. किमी आहे. कृष्णेचा उगम सह्याद्रीच्या रांगेतील धोम महाबळेश्वराच्या १,४३८ मी. उंचीच्या डोंगरात १७०५९' उ. व ७३० ३८' पू. येथे सु. १,२२० मी. उंचीवर होतो. येथून पश्चिमेस अरबी समुद्र फक्त सु. ६५ किमी. दूर आहे. क्षेत्र महाबळेश्वर येथे कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री व सावित्री या नद्यांचे उगमझरे दाखवितात.

या नद्या महाबळेश्वराहून वेगवेगळ्या दिशांनी वाहत जातात. त्यांना मूळ पाणीपुरवठा फक्त मोसमी पावसापासूनच होतो. महाबळेश्वर येथे दरवर्षी सु. ६२५ सेंमी. हून अधिक पाऊस पडतो त्याच्या पूर्वेस सु. २० किमी. पाचगणी येथे सु. २२५ सेंमी., तर ३२ किमी. वरील वाई येथे फक्त ६० ते ७५ सेंमी. पडतो. महाबळेश्वर डोंगराच्या उत्तरेकडून खाली येऊन कृष्णा आग्नेय व पूर्व दिशांनी वाहू लागते. सु. १० किमी. वरील धोम येथे धरण बांधले जात आहे. वाई खोऱ्याला समृद्ध करीत कृष्णा वाईच्या आग्नेयीस ३७ किमी. वर असलेल्या माहुलीस येते. येथे कृष्णेला वेण्णा नदी मिळते. येथून कृष्णा दक्षिणवाहिनी होते. माहुलीपासून ५० किमी. कराड येथे कृष्णा आणि कोयना यांचा प्रीतिसंगम आहे. महाबळेश्वरहून पश्चिमेस उतरून मग दक्षिणेकडे वाहणाऱ्या कोयनेवर कोयनानगर येथे प्रचंड धरण बांधून त्याचे पाणी बोगद्यातून पश्चिमेकडे नेऊन खाली डोंगरातूनच पोफळी येथील वीजघरात नेले आहे.

कराडपासून वर कृष्णेवर खोडशी येथे बंधारा आहे. त्याच्या जोडीला कोयनेचेही पाणी शेतीला उपलब्ध होईल. सांगलीजवळ कृष्णेला पश्चिमेकडून वारणा व पूर्वेकडून येरळा ह्या नद्या मिळतात. कुरुंदवाड येथे कोल्हापूराकडून आलेली पंचगंगा नदी कृष्णेला मिळते; तेथेच नदीच्या दुसऱ्या काठावर श्री क्षेत्र नृसिंहवाडी हे दत्ताचे जागृत देवस्थान आहे. कासारी, कुंभी, तुळशी, भोगावती व सरस्वती यांमिळून पंचगंगा झाली आहे. भोगावतीवर राधानगरी येथे विद्युत् प्रकल्प उभारला आहे. यानंतर कृष्णेला दूधगंगा नदी मिळते व ती कर्नाटकाच्या हद्दीत शिरते.

महाराष्ट्राच्या सातारा व सांगली जिल्ह्यांतून कृष्णा सु. ३०० किमी. वाहते. तिचे पात्र विशेषतः रहिमतपूर पर्यंत खोल व खडकाळ असले, तरी तिचे ३० ३५ किमी. रुंदीचे खोरे अत्यंत सुपीक काळ्या मातीचे आहे. त्यात ज्वारी, बाजरी, भुईमूग, करडई, कडधान्ये, बटाटा, आले, हळद, मिरची, ऊस, तंबाखू, थोडा तांदूळ ही पिके होतात. वांगी, कांदे, लसूण, धने, चिंच, आंबा, पेरू व इतर अनेक फळे, फळभाज्या व पालेभाज्या होतात. येथील सकस गवतावर व वैरणीवर पोसलेली जनावरे धष्टपुष्ट, चपळ व देखणी आहेत.

खिलार ही बैलांची जात विशेष प्रसिद्ध आहे. उगमाकडील प्रदेशात उन्हाळ्यात कित्येकदा नदी जवळजवळ कोरडी होते. तिला आणि तिच्या उपनद्यांना बंधारे व धरणे बांधून व विहिरींची जोड देऊन शेतीला पाणीपुरवठा व कारखान्यांना वीजपुरवठा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तिची उत्तरेकडील प्रमुख उपनदी भीमा तिला महाराष्ट्राबाहेर मिळत असली, तरी ती महाराष्ट्राच्या सातारा, पुणे, अहमदनगर, सोलापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांतून अनेक नद्यांचे पाणी तिला आणून देते.

## व्यक्तिमत्त्व

# समुद्रगुप्त : प्राचीन भारतातील महान सम्राट



प्रखर पराक्रमी, धैर्यशील, बुद्धिमान, धोरणी, कुशल प्रशासक व प्राचीन भारतातील महान सम्रसट अशी समुद्रगुप्ताची (इ. स. ३२०-३८०) सर्वत्र ओळख आहे. गुप्त राजघराण्यातील या थोर व पराक्रमी राजाची कारकीर्द (३३५-३७६) भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे. पहिला चंद्रगुप्त आणि त्याची राणी लिच्छवी-राजकन्या कुमारदेवी यांचा तो पुत्र होय. गुप्त सम्राटांच्या इतिहासाविषयी माहिती देणारी साधनसामग्री विखुरलेली आणि पुष्कळशी खंडित स्वरूपाची आहे. समुद्रगुप्ताच्या संदर्भातील ऐतिहासिक साधने तसेच काही अभिलेख व नाणी उपलब्ध झाली असली, तरी प्राचीन भारतातील या सर्वश्रेष्ठ सम्राटाविषयी हर्षचरित सारखा स्वतंत्र चरित्रग्रंथ नाही. प्रयागराज येथील स्तंभलेख (प्रयाग प्रशस्ती) आणि एरण पाषाणलेख या अभिलेखांमधून आपल्याला समुद्रगुप्ताविषयीची माहिती मिळते. मत्स्यपुराणात चंद्र गोत्रातल्या 'चंदमस' राजाच्या प्रमति या पुत्राच्या दिग्विजयाचे वर्णन आहे. ते समुद्रगुप्ताचे असावे, असे इतिहासकार व अभ्यासकांचे मत आहे. प्रयागराज येथील स्तंभलेखात समुद्रगुप्ताचा उल्लेख लिच्छवीदौहित्र असा करण्यात आलेला आहे. त्याच्या पत्नीचे नाव दत्तदेवी होते.

समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीचे राज्यारोहण, राज्यविस्तार व स्थिर शासन असे तीन टप्पे आहेत. वयाने राजपुत्रांमध्ये कनिष्ठ असूनही चंद्रगुप्ताने त्याला वारस म्हणून निवडले असे, प्रयागराज येथील स्तंभलेखावरून दिसते. समुद्रगुप्ताला वारसा म्हणून मिळालेले राज्य बिहार, पूर्व व मध्य उत्तर प्रदेशचा काही भाग यांपुरते मर्यादित होते. परंतु समुद्रगुप्ताने तीन मोठ्या मोहिमा काढून राज्यविस्तार केला.

समुद्रगुप्ताने आर्यावर्तामध्ये प्रामुख्याने चार नागवंशीय राजांना जिंकून त्यांचे प्रदेश स्वतःच्या राज्याला जोडले. नंतर दक्षिणापथावर स्वारी करून बारा राजांचा पराभव करून त्यांना मांडलिक म्हणून पुन्हा राज्य परत दिले. यावेळी त्याने दक्षिणेत कांचीपुरम्पर्यंत मजल मारली होती. तसेच त्याने पंजाब, राजस्थान, मध्य भारत, बंगाल व आसाम अशा अनेक भागांतील छोटी-मोठी सत्ताकेंद्रे संपुष्टात आणून संपूर्ण भारतीय उपखंडात विस्तार असलेले बळकट साम्राज्य निर्माण केले.

समुद्रगुप्ताचे राजकीय धोरण व प्रशासन परिपक्व होते. त्याच्या शासनाला हरिषेणाने 'प्रचंड शासन' म्हटले आहे. तो आपल्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून (युक्तपुरुष) सर्व सामंत राजांवर सतत देखरेख करत असे (नित्यव्यापृत). तो साम-दाम वापरून पाही; पण आवश्यकता पडेल तेव्हा कठोरपणे दंड देत असे. अच्युत (अहिच्छत्र), नागसेन (पद्मावती) व गणपतीनाग (मथुरा) या नागराजांना सुरुवातीला फक्त राज्यभ्रष्ट करून सोडून दिले, पण त्यांनी पुन्हा उठाव केल्यावर त्यांना पूर्णपणे नष्ट करून टाकले. तरीही पुढील काळात क्षमाशीलपणा दाखवून समुद्रगुप्ताने नागवंशाशी वैवाहिक संबंध जोडले.

समुद्रगुप्ताचे राजकारण व धोरण व्यवहारी आणि मोठ्या साम्राज्याला योग्य असेच होते. समुद्रगुप्ताने विचारपूर्वक राजधानीजवळचा सर्व भाग गुप्तराज्यात थेट सामील केला व त्यावर प्रत्यक्षपणे सम्राटाचे नियंत्रण राखले. दूर अंतरावरील गणराज्ये व दक्षिणेतील राजांना राज्यांतर्गत स्वतंत्र धोरण वापरण्याची मुभा ठेवली; पण त्यांच्याकडून करवसुली मात्र केली.

मध्य भारतातील आटविक राज्ये जिंकल्यावर समुद्रगुप्ताने अठरा छोट्या राज्यांची पुनर्रचना करून चार मोठी राज्ये बनवली व नवीन मांडलिक/सेवक राजे तयार केले. तसेच काही प्रदेशांमधे मूळ राजवंशाच्या जागी केंद्रीय सत्तेशी निष्ठा ठेवणारी नवीन राजघराणी आणली (उदा., पश्चिम माळवा व कामरूप), काही ठिकाणी केंद्रीय सत्तेशी मांडलिक राज्ये निष्ठावंत राहावीत म्हणून वैवाहिक संबंध जोडले. यातूनच पुढील काळात नागवंशातील कुबेरनागा ही सून करून घेतली आणि इ. स. ३७० नंतर वाकाटक राजघराण्यात प्रभावतीगुप्त ही आपली नात दिली.

समुद्रगुप्ताचे साम्राज्य स्थिर होते. राजेमहाराजांना विशिष्ट दर्जा देणे, सेनापती व मंत्री सम्राटाचे दास मानणे (वैयक्तिक निष्ठा), साम्राज्यातील अधिकारी वंशपरंपरागत करणे, जमिनीसह प्रशासकीय व दंडाधिकारांचे खालच्या पातळीवर हस्तांतरण करणे ही वैशिष्ट्ये त्याच्या कारकिर्दीत दिसतात.

समुद्रगुप्ताची सहा प्रकारची सोन्याची नाणी उपलब्ध आहेत. त्यांना राजदंड प्रकार, धनुर्धारी प्रकार, परशु प्रकार, व्याघ्र-पराक्रम प्रकार, अश्वमेध प्रकार व वीणावादक प्रकार या नावांनी ओळखले जाते. राजदंड प्रकारच्या नाण्यांवर कुषाण प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. यात राजा उभा असून अंगात कोट व विजार आहे. डोक्यावर टोपी असून डाव्या हातात राजदंड दिसतो. धनुर्धारी प्रकारच्या नाण्यावर डाव्या हातात धनुष्य, तर उजव्या हातात बाण घेतलेला राजा उभा असून बाजूला गरुडध्वज व खाली 'समुद्र' ही अक्षरे दिसतात. परशु प्रकारच्या नाण्यावर 'कृतांताचा (यमाचा) परशु धारण करणारा, अजिंक्य राजांना पराभूत करणारा राजा विजयी आहे', असे लिहिलेले दिसते. अश्वमेध प्रकारच्या नाण्यांवरील चित्रण तैत्तिरीय संहितेप्रमाणे असून 'अश्वमेध करणारा राजाधिराज पृथ्वी जिंकून स्वर्ग जिंकतो', असा कडेला गोलाकार लेख दिसतो. व्याघ्र-पराक्रम प्रकारच्या नाण्यांवर डोक्यावर उष्णीष असलेला राजा चवताळलेल्या वाघाला बाण मारत आहे, असे चित्रण दिसते. मागच्या बाजूवर मकरावर उभी गंगा दाखवलेली असून 'राजा समुद्रगुप्तः' ही अक्षरे दिसतात. वीणावादक प्रकारच्या नाण्यांमध्ये मंचकावर मांडी घालून बसलेला राजा वीणा वाजवतो आहे असे दृश्य असून 'महाराजाधिराज समुद्रगप्तः' अशी अक्षरे दिसतात. समुद्रगुप्ताची चांदीची व तांब्याची नाणी पूर्वी माहीत नव्हती. मात्र, याविषयी देखील संशोधन होऊन गुप्तांच्या अर्थकारणाविषयी बरीच माहिती उपलब्ध झाली.

समुद्रगुप्त स्वतः परंपरागत वैदिक धर्माचा पुरस्कार करणारा असून त्याने अश्वमेधासह अनेक यज्ञ पुन्हा सुरू केले. तथापि त्याने इतर पंथ वा धर्मपरंपरांना मोकळीक दिली. कारण आर्यमंजुश्रीमूलकल्प यासारख्या बौद्ध ग्रंथाने त्याचे वर्णन मानवापेक्षा श्रेष्ठ व जणू देव असे केले आहे. वसुबंधू हा महान बौद्ध विद्वान त्याच्या पदरी होता. एक कुशल अजिंक्य सेनापती व शंभर लढायांमधील विजयी वीर (समरशत) असूनही तो स्वतः साहित्य-संगीतप्रेमी, कवी, विद्वान व सत्पुरुषांच्या संगतीत रमणारा होता. प्रयागप्रशस्तीनुसार तो 'सज्जनांचा उत्कर्ष व दुर्जनांचा विनाश करणारा आणि दीनदुबळे, अनाथ व रोगी यांना संरक्षण देण्याचे व्रत घेतलेला' असा होता. समुद्रगुप्ताच्या कालखंडात भारतात समृद्धी व ऐश्वर्य नांदत होते, सर्वत्र भरभराट होती, अशीच प्राचीन इतिहासात नोंद आहे.

## निसर्ग

# अरवली पर्वत

अरवली प्रदेशाचे हवामान रुक्ष, वाळवंटी आहे. पाऊस २५ ते ६५ सेंमी. पडतो. जमिनीखाली ७५ ते १५० मी. खोलीवर पाणी आढळते. लुनी, मही, साबरमती, बनास या नद्या येथे उगम पावतात. अकेशिया जातीची काटेरी झाडे व गवत या मुख्य वनस्पती आहेत. लोकवस्ती विरळ व लहानलहान खेड्यांतून विखुरलेली आहे. दऱ्याखोऱ्यांतून गहू, बाजरी, कडधान्ये यांची शेती होते. उदयपूरच्या दक्षिणेस नागर भागात भिल्ल लोक फिरती शेती करतात. गुरेढोरे व शेळ्यामेंढ्या पाळणे हा प्रमुख व्यवसाय आहे.



अरवली पर्वत हा दिल्लीपासून गुजरातपर्यंत ईशान्य-नैर्ऋत्य दिशेने जाणाऱ्या रांगांचा बनलेला आहे. लांबी सुमारे ६०० किमी. सर्वांत उंच शिखर, गुरुशिखर, (उंची १,७२२ मी.) अबूच्या पहाडात आहे. हिमालय व निलगिरी यांच्या मधल्या प्रदेशातील ते सर्वांत उंच शिखर आहे. अरवलीची उंची सामान्यतः ७६० ते १,०६० मी. इतकी भरते; पण जोधपूर व जयपूर यांच्यामधल्या रांगांची उंची ४५७ मी. पेक्षा कमी आहे. अरवलीचा अजमीरपासून अबूच्या पहाडापर्यंतचा भाग सर्वांत जाड व रुंद असून त्या भागातल्या रांगा ठळक व सलग आहेत. अरवलीच्या पश्चिमेस थरचे वाळवंट आहे व नैर्ऋत्य वाऱ्यांबरोबर जाणारी त्याची वाळू साचून अजमीरच्या ईशान्येस असलेल्या रांगांचा पुष्कळसा भाग झाकला गेला आहे. रांगांचे सखल भाग वाळूखाली पुरले गेले असून त्यांचे उंच भाग तेवढे उघडे राहिले आहेत. त्यांच्याही पलीकडे अधिक पुढे नैर्ऋत्येकडे गेलेल्या रांगा सिंधु-गंगा यांच्या जलोढ गाळांनी तशाच झाकल्या गेल्या आहेत. त्यामुळे या वाळवंटी वाळूने किंवा जलोढाने झाकल्या गेलेल्या भागात सलग रांगा न दिसता वाळूच्या बाहेर डोकावणाऱ्या तुटकतुटक रांगा किंवा त्यांची उंच शिखरे मात्र दिसतात. दिल्लीजवळ रिज नावाने प्र'यात असलेल्या भागात क्वॉर्ट्झाइट खडकाचे जे लहान व तुटक वरंबे दिसतात ते अरवलीच्या ईशान्य टोकाचे आहेत. अबूच्या नैर्ऋत्येस असलेल्या भागांकडे जाऊ लागले म्हणजे तेथल्या रांगा अधिक लहान व विरळ होत गेलेल्या आढळतात. अखेरीस सिरोहीच्या नैर्ऋत्य भागात त्यांचा शेवट होतो. आजच्या अरवलीचे उत्तरेकडील टोक दिल्लीजवळ व दक्षिणेकडील टोक गुजरातेत आहे. पण पूर्वी तो ईशान्य व नैर्ऋत्य अशा दोन्ही दिशांस, बराच दूरवर, उत्तर प्रदेशातल्या हिमालयातील गढवालापर्यंत पसरला असावा असे दिसते. अरवलीच्या रांगांचे, लहानसहान उंचवट्यांच्या स्वरुपात असणारे, काही अवशिष्ट भाग सौराष्ट्रात (काठेवाडात) व कच्छात आढळतात. त्यावरून अरवलीच्या रांगा तेथपर्यंत गेल्या असल्याच पाहिजेत. एवढेच नव्हे तर त्याच्याही पुढे त्या गेल्या असाव्यात. या दक्षिणेकडील विस्ताराला फाटे फुटले असावेत व त्यांपैकी एक फाटा लक्षद्वीप बेटात व दुसरा पूर्वेस वळून कर्नाटकात व आंध्रात गेला असावा, असे अनुमान केले गेले आहे.

अरवली हा अतिप्राचीन, कॅब्रियन-पूर्व कालात, निर्माण झालेला आहे. असे म्हणतात की, ज्यांचे प्राकृतिक स्वरूप आजही स्पष्ट दिसून येते अशा पृथ्वीवरील पर्वत-संहतींपैकी अरवलीची संहती सर्वांत जुनी आहे. प्रथम उत्थापन झाले तेव्हा, म्हणजे पुराजीव कल्पाचा प्रारंभ होण्याच्या सुमारास, अरवलीची उंची व राशी या हिमालयासारख्या असाव्यात. तेव्हापासून झीज होत राहिल्यामुळे मूळच्या प्रचंड राशीचे बुटके व लहानसे खुंट मात्र आजच्या अरवलीच्या रूपात शि'क राहिले आहेत.

अरवलीचे प्राकृतिक स्वरूप भारताच्या द्वीपकल्पातल्या इतर पर्वतांहून अगदी भिन्न आहे. आर्कीयन कालातील अरवली संघ व पुराणकल्पाच्या पूर्वार्धातील दिल्ली-संघ यांच्या थरांस घड्या पडून व ते थर विक्षोभित होऊन अरवलीच्या रांगा तयार झालेल्या आहेत अरवली संघ. अरवली हा सांरचनिक पर्वतांचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

क्रिटेशस युगाच्या आधी केव्हातरीहा काल निश्चित ठरविता आलेला नाही. अरवलीचे क्षरण होऊन जवळजवळ सपाट जमीन तयार झाली होती. नंतर ती जमीन कमानीप्रमाणे वाकविली जाऊन किंचित उंच केली गेली, नंतर तिचे क्षरण होऊन आजचा अरवली तयार झाला. द्वीपकल्पाच्या व एकूण भारताच्या भौगोलिक इतिहासात अरवलीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. अरवलीत उगम पावून द्वीपकल्पात दूरवर जाणाऱ्या हिमनद्या पुराजीवकल्पाच्या जवळजवळ अखेरच्या कालात होत्या. कित्येक मोठया नद्याही पूर्वीच्या कालात तेथे असल्या पाहिजेत. पूर्वीच्या युगात अरवली हा एक महत्त्वाच्या जलविभाजक असला पाहिजे व आजचा अरवली त्याचा केवळ अवशिष्ट भाग आहे. आता त्याच्यामुळे गंगा व सिंधू या नदीसंहतींच्या जलोत्सरणाचे विभाजन होऊन एकीचे पाणी बंगालच्या उपसागरास व दुसरीचे अरबी समुद्रास मिळत आहे.

खडक व खनिजे अरवलीमध्ये क्वॉर्ट्झाइट, पाटीचे दगड, शिस्ट, नाइस, संगमरवर व काही ग्रॅनाईटी खडक सापडतात. त्यांपैकी काहींचा साध्या व कलाकुसरीच्या बांधकामाकरिता उपयोग होतो. काही रत्ने (पाच, क्रिसोबेरील), अभ्रक, जस्ताचे व शिशाचे धातुपाषाण इ. उपयुक्त खनिजे अरवलीत सापडतात.

अरवली प्रदेशाचे हवामान रुक्ष, वाळवंटी आहे. पाऊस २५ ते ६५ सेंमी. पडतो. जमिनीखाली ७५ ते १५० मी. खोलीवर पाणी आढळते. लुनी, मही, साबरमती, बनास या नद्या येथे उगम पावतात. अकेशिया जातीची काटेरी झाडे व गवत या मुख्य वनस्पती आहेत. लोकवस्ती विरळ व लहानलहान खेड्यांतून विखुरलेली आहे. दऱ्याखोऱ्यांतून गहू, बाजरी, कडधान्ये यांची शेती होते. उदयपूरच्या दक्षिणेस नागर भागात भिल्ल लोक फिरती शेती करतात. गुरेढोरे व शेळ्यामेंढ्या पाळणे हा प्रमुख व्यवसाय आहे. अवर्षणकाळात भटक्या जमातीचे लोक कळप घेऊन काठेवाडपासून पंजाबपर्यंत चारापाण्याच्या शोधार्थ जातात. दक्षिण भागापेक्षा उत्तर भागात सर्व प्रकारची वाहतूक सुलभ आहे. पश्चिमेकडे उंट अधिक उपयोगी आहे. जयपूर-जोधपूरजवळच्या सखल भागात तळी आहेत. सांभर सरोवरापासून उत्तर भारताला मिठाचा महत्त्वाचा पुरवठा होतो. ते उन्हाळ्यात आटते व पुराच्या वेळी २३० चौ. किमी. विस्तारते. मोगलांना टक्कर देताना राजपुतांना या डोंगराळ प्रदेशाचा चांगला आसरा मिळाला. राजपूत संस्कृतीची वैशिष्ट्ये तेथे आढळतात. राजांच्या आश्रयाने कलाकुसरीचे व्यवसाय वाढले होते. जयपूर, जोधपूर, उदयपूर, अजमीर ही येथील प्रमुख शहरे होत.

*(संकलित)*

## दखल

# इंडोनेशियातील मुस्लिमांना हिंदू संस्कृतीचे आकर्षण

इंडोनेशियाचे संस्थापक आणि प्रथम राष्ट्रपती सुकार्णो यांची कन्या सुकमावती यांनी २६ ऑक्टोबर २०२१ रोजी इस्लाम धर्माचा त्याग करून सनातन हिंदू धर्म स्वीकारला. इंडोनेशियात हिंदूंची लोकसंख्या दोन टक्क्यांहून देखील कमी आहे. येथील १७ हजारांहून अधिक बेटांपैकी केवळ बाली या बेटावर हिंदू बहुसंख्यक आहेत. मात्र, असे असतानाही ज्या प्रकारे लोक हिंदू धर्मात परत येत आहेत, ते अभूतपूर्व व आश्चर्यचकित करणारे आहे. इंडोनेशियाच्या हिंदूंकडे एखादी मोठी सामाजिक संघटना नाही किंवा राजकीय संघटन देखील नाही. त्यांच्याकडे कोणताही मठ, आश्रम नाही किंवा प्रसिद्ध व श्रीमंत उद्योगपती देखील नाही. तरीही त्या देशातील लोकांमध्ये आपल्या पूर्वजांविषयीचा गौरव नव्याने जागृत झाला असून जगातील सर्वाधिक मुसलमान लोकसंख्या असलेल्या देशातील लोक आता हिंदू धर्म स्वीकारण्यास आतूर झाले आहेत, असे स्पष्टपणे दिसून येते.





७० च्या दशकामध्ये सर्वप्रथम सुलावेसी बेटावरील तोराजा लोकांनी हिंदू धर्मात परत येण्याची संधी प्राप्त झाली होती. वर्ष १९७७ मध्ये सुमात्राच्या कारो आणि बाटाक, तसेच वर्ष १९८० मध्ये कालीमंतनचे गाजू आणि दायक देखील हिंदूंच्या छत्रछायेत स्वधर्मात परत आले. त्यानंतर अनेक जमातींनी आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी, तसेच इस्लाम अन् ख्रिस्ती यांच्या दबावापासून वाचण्यासाठी स्वत:ला हिंदू घोषित केले. याशिवाय वर्ष १९६५ मधील उलथापालथीच्या वेळी स्वत:ला मुसलमान घोषित करणाऱ्या जमातीचे लक्षावधी लोक आता हिंदू धर्मात परत येत आहेत.

जावामध्ये शिक्षण झालेल्या सुदेवी १९९० साली न्यायाधीश बनल्या होत्या. त्यांचे बालपण मुस्लिम कुटुंबात गेले. पण, तरीही नंतर त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला. रविकुमार यांनी 'इंडोनेशियातील हिंदूंचे पुनरुत्थान' या आपल्या पुस्तकात इंडोनेशियातील १० लाखांहून अधिक मुसलमानांनी हिंदू धर्मात प्रवेश केल्याचा उल्लेख केला आहे. या पुस्तकात त्यांनी नमूद केले की, 'वर्ष १९९९ च्या एका अहवालामध्ये 'नॅशनल इंडोनेशियन ब्युरो ऑफ स्टॅटिस्टिक' ने मान्य केले होते की, गेल्या दोन दशकांमध्ये जावा येथे रहाणारे अंदाजे एक लाख लोक इस्लामचा त्याग करून अधिकृतपणे हिंदू धर्मात परत आले आहेत. वर्ष २०१७ मध्ये जावाची राजकुमारी कांजेंग महेंद्राणी हिनेही हिंदू धर्म स्वीकारला होता. अलिकडच्या वर्षांमध्ये सुकर्णोच्या कुटुंबीयांशी संबंधित अनेक लोकांनी हिंदू धर्म स्वीकारला आहे. ज्यात सर्वांत ताजे नाव 'सुकमावती' यांचे आहे. इंडोनेशियामध्ये 'सुकमावती'चा प्रभाव बघता त्यांचे अनुयायीही त्यांच्या मागे हिंदू धर्मात परत येतील, असा अंदाज आहे.

सुकमावतीने हिंदू धर्म स्वीकारल्यानंतर भारतीय माध्यमांनी प्रामुख्याने सबदापालन यांच्या भविष्यवाणीची आठवण करून दिली. वर्ष १४७८ मध्ये महापहित साम्राज्याचा शेवटचा शासक ब्रविजय पंचम याने इस्लाम स्वीकारल्याने सबदापालन यांनी त्याला शाप दिला होता की, ५०० वर्षांनी नैसर्गिक आपत्तीच्या काळात मुसलमान झालेले सर्व जण आपल्या हिंदू धर्मात परत येतील आणि सनातन धर्माची पुनर्स्थापना करतील. हे खरे आहे की, वर्ष २००४ मध्ये हिंदी महासागरामध्ये आलेल्या त्सुनामीमध्ये इंडोनेशियातील दोन लाखांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर २००६ साली आलेल्या भूकंपामुळे ५ हजारांहून अधिक लोकांनी जीव गमावला होता. त्यानंतर जावामध्ये भूकंप आला होता. या घटनांमुळे तेथील लोक सबदापालन यांच्या भविष्यवाणीकडे मोठ्या गांभीर्याने पाहात आहेत. तसेच अशा आपत्तींपासून रक्षण करण्यासाठी पूर्वजांच्या हिंदू धर्मामध्ये परत येत आहेत. पण असे असले, तरी हिंदू धर्म स्वीकारण्यामागे सबदापालनचा शाप आणि भविष्यवाणी एवढेच एक कारण नाही. काही अन्य कारणेही आहेत. सर्वांत पहिले कारण म्हणजे इंडोनेशियातील लोकांना आपला खरा इतिहास समजला आहे, त्यांनी तो जाणून घेतला आहे. त्यामुळे आपल्या पूर्वजांविषयी त्यांच्या मनात गौरव व सन्मानाची भावना आहे. भारतीय मुसलमानांसमोर जर त्यांचा खरा इतिहास ठेवला, तर ते देखील आपल्या मूळ धर्मात परत येण्याविषयी निश्चितच विचार करतील, असे प्रसिद्ध प्राध्यापक शंकर शरण यांनी नमूद केले होते.

स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाल्यानंतरही हिंदूबहुल देशात अद्याप मोठ्या संख्येने मुस्लिमांनी घरवापसी केलेली नाही. परंतु, परंतु मुसलमानबहुल इंडोनेशियाने हे करून दाखवले आहे. येथे मजपहित साम्राज्य आणि अन्य हिंदू साम्राज्य यांच्या यशाला अतिशय महत्त्व दिले जाते. 'गजह मद' यांच्यासारखे हिंदू सेनापती येथील राष्ट्रीय नायक आहेत. येथील मुसलमानांना माहीत आहे की, त्यांचे पूर्वज तुर्क किंवा अफगाणिस्तान येथून आलेले आक्रमक, लुटारू नव्हते, तर सर्वधर्मसमन्वयाची भावना असलेले, उच्च नैतिक व आध्यात्मिक मूल्ये जपणारे हिंदूच होते. त्यामुळे आपल्या भूतकाळातील मूळ हिंदू धर्मात प्रवेश करणे आणि पूर्वजांच्या धर्माचा स्वीकार करणे, हा येथे अभिमानाचा विषय बनला आहे.

येथील संस्कृतीवर रामायण आणि महाभारत या ग्रंथांचा मोठा प्रभाव आहे. इंडोनेशियाची रामलीला जगभरात प्रसिद्ध आहे. सुकार्णोच्या काळात एकदा पाकिस्तानच्या एका प्रतिनिधी मंडळाला इंडोनेशियामध्ये रामलीला पहाण्याची संधी मिळाली. तेव्हा एका इस्लामी राष्ट्रामध्ये रामलीला सादर होत असल्याविषयी या प्रतिनिधी मंडळातील लोकांना अतिशय आश्चर्य वाटले होते. हा प्रश्न त्यांनी सुकार्णो यांनाही विचारला. तेव्हा सुकार्णो यांनी त्वरित उत्तर दिले की, 'इस्लाम आमचा धर्म आहे, तर रामायण आमची संस्कृती आहे !' इंडोनेशियाच्या मुसलमानांना रामायण आणि महाभारत या ग्रंथांविषयी उत्तम माहिती आहे. येथील लोकांच्या नसानसात या दोन महान ग्रंथांतील चरित्रे वास करतात. येथे घरोघरी रामायण आणि महाभारताचे वाचन, मनन, चिंतन केले जाते. इंडोनेशियात रामायण आणि महाभारत यांच्यातील चरित्रांच्या आधारावर मुला-मुलींचे नाव ठेवणे ही सर्वसामान्य गोष्ट आहे. येथे या चरित्रांचा उपयोग शालेय शिक्षणासाठीही होत असतो. शिवाय येथे वर्षभर रामायण आणि महाभारत यांच्यावर आधारित कार्यक्रम होत असतात. रामायण आणि महाभारत यांच्या जबरदस्त प्रभावामुळे इंडोनेशियातील मुसलमान हिंदू धर्माकडे आकर्षित होत आहेत. आज इंडोनेशियाचे मुसलमान कुराणही वाचतात आणि रामायण-महाभारतही वाचतात. हिंदीचे प्रसिद्ध विद्वान फादर कामिल बुल्के यांनी १९८२ मध्ये आपल्या एका लेखामध्ये लिहिले होते, '३५ वर्षांपूर्वी माझ्या एका मित्राने जावामधील गावामध्ये एका मुसलमान शिक्षकाला रामायण वाचताना पाहिले. तेव्हा त्याने शिक्षकाला विचारले की, तुम्ही रामायण का वाचत आहात ? तेव्हा ते म्हणाले, ''मी अधिक चांगला मनुष्य बनण्यासाठी रामायण वाचत आहे.''

*(संकलित)*

## विदेश

**अलोक गोस्वामी**

आज, पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतातील मकरानच्या खेराथर डोंगरांच्या मधोमध, मनमोहक हिंगोल नदीच्या तीरावर वसलेले हिंगलाज माता मंदिर केवळ पाकिस्तानातीलच नव्हे तर जगभरातील हिंदूंचे श्रद्धेचे केंद्र आहे, ते एक दिव्य शक्तिपीठ आहे.
मंदिराकडे मार्गक्रमण करताना, भक्त मकरान काठावरील महामार्गावरून अनेक किलोमीटर दूर 'मड व्हॉलकॅनो' पर्यंत चालत जातात. ते अतिशय कठीण असा चढ चढतात.

### बलुचिस्तानात हिंगलाज मातेचा जयघोष

# हिंगोल नदीच्या तीरावर हिंदूंची दाटी



दरवर्षी हिंगलाज माता मंदिरात भव्य यात्रेचे आयोजन केले जाते. या यात्रेत संपूर्ण पाकिस्तानातून हजारो हिंदू श्रद्धावान देवी विषयी आपली प्रगाढ श्रद्धा व्यक्त करण्यासाठी येतात. हिंगोल नदीच्या किनारी डोंगरातील गुहेत बसलेली माता हिंगलाज सर्वांच्या मनोकामना पूर्ण करते.

पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतातील यंदाची हिंगलाज माता मंदिराची तीर्थयात्रा नुकतीच मोठ्या थाटामाटात संपन्न झाली. तीन दिवस चाललेल्या या तीर्थयात्रेत मातेच्या लक्षावधी भक्तांनी मैलोन्मैल अंतर खडतर प्रवास पायी केला होता.

पाकिस्तानातील हिंदूंमध्ये प्राचीन काळापासूनच हिंगलाज माता मंदिर तीर्थयात्रेला अत्यंत पूजनीय मानले जाते. हिंगलाज माता मंदिर हे त्या देशातील हिंदूंच्या वाचलेल्या काही मोजक्या श्रद्धास्थळांपैकी एक आहे. येथे दरवर्षी भव्य यात्रा भरते, ज्यामध्ये संपूर्ण पाकिस्तानातून हिंदू हिंगलाज मातेवरील श्रद्धा-भक्ती व्यक्त करण्यासाठी सहभागी होतात. प्रवासात अनेक थांबे असतात. चालता-चालता पाय थकू लागतात. पण श्रद्धेची अशी लाट येते की भक्तांना थकवा जाणवत देखील नाही.

सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणाऱ्या हिंगलाज मातेची कीर्ती अशी आहे की प्रत्येक भक्त मनात काही ना काही मागणे, आशा घेऊन येतो. देवी आपली मनोकामना पूर्ण करेलच, अशी भक्तांची श्रद्धा असते. यामुळेच जेव्हा भाविक, तीर्थयात्री येथे पोहोचतात तेव्हा अनेकांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत असतात. 'जय माता की'च्या जयघोषाने वातावरणात उत्साह संचारतो. काही लोक विशेष पूजा-अर्चना करतात तर अनेकजण विशेष पाठ करताना दिसतात.



माता सतीने शिवलोकात प्रयाण केल्यानंतर भगवान शिवांनी क्रोधाने तिचे शरीर डोक्यावर उचलून तांडव नृत्य सुरू केले, अशी प्रचलित धारणा आहे. त्यामुळे पृथ्वी थरथरू लागली. यामुळे भयभीत होऊन देवांनी विष्णूची प्रार्थना केली. भगवान विष्णूने सुदर्शन चक्राने माता सतीच्या देहाचे विविध अवयव कापले. मातेचे ते अवयव पृथ्वीवर वेगवेगळ्या ठिकाणी पडले. प्राचीन काळापासून या स्थानांना शक्तिपीठ म्हणतात.

आज, पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतातील मकरानच्या खेराथर डोंगरांच्या मधोमध, मनमोहक हिंगोल नदीच्या तीरावर वसलेले हिंगलाज माता मंदिर केवळ पाकिस्तानातीलच नव्हे तर जगभरातील हिंदूंचे श्रद्धेचे केंद्र आहे, ते एक दिव्य शक्तिपीठ आहे.

मंदिराकडे मार्गक्रमण करताना, भक्त मकरान काठावरील महामार्गावरून अनेक किलोमीटर दूर 'मड व्हॉलकॅनो' पर्यंत चालत जातात. ते अतिशय कठीण असा चढ चढतात. 'मड व्हॉलकॅनो' येथे लहानशा पूजेनंतर यात्रेकरू आपल्या पुढील प्रवासाला निघतात. तेथून भाविक सुमारे ४५ किलोमीटर पायी प्रवास करून हिंगलाज माता मंदिरात दाखल होतात. संपूर्ण मार्गात यात्रेकरूंचे गट हिंगलाज मातेचा जयजयकार करतात. यामुळे सहप्रवाशांच्या अंगात प्रचंड उत्साह संचारतो.

भक्तगण मंदिरातील मातेच्या दर्शनाआधी हिंगोल नदीत स्नान करतात. या नदीचे जल गंगाजलाप्रमाणेच पवित्र असल्याचे वर्णन शास्त्रग्रंथात केले आहे. त्यानंतर भाविक जवळच असलेल्या नैसर्गिक गुहेत आत स्थानापन्न झालेल्या हिंगलाज मातेचे दर्शन घेण्यासाठी पुढे जातात. मंदिरात मातेचे एका शिलारूपात दर्शन होते. भक्त तेथे बसून देवीची मोठ्या भक्तिभावाने, श्रद्धेने पूजा करतात, देवी स्तोत्राचे पठण करतात आणि देवीला यशाशक्ती दान अर्पण करतात.

हिंगलाज मातेबद्दल लोकांची वाढती श्रद्धा लक्षात घेता, पाकिस्तान सरकारने जगभरातील हिंदूंसाठी हे मंदिर दर्शनासाठी सोपे आणि सुलभ करावे अशी मंदिर प्रशासन समितीची इच्छा आहे. सध्या केवळ पाकिस्तानात स्थायिक झालेले हिंदूच मंदिरात दर्शन घेऊ शकतात. देवीच्या दर्शनासाठी येऊ इच्छिणाऱ्या सर्व देशांतील लोकांना पाकिस्तान सरकारने व्हिसा देण्यास सुरुवात करावी, अशी मंदिर प्रशासनाची इच्छा आहे. मातेचा आशीर्वाद घेण्यासाठी जगातील कोणत्याही देशातून या शक्तिपीठावर येण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही भक्ताला कोणतीही अडचण येऊ नये, अशी व्यवस्था असावी, अशी मंदिर प्रशासन समितीची इच्छा आहे. नैसर्गिक सौंदर्यात वसलेल्या या हिंदू तीर्थक्षेत्राचे एक विशेष महत्त्व आहे. भारतात देवीचे अनेक भक्त आहेत. आपणही श्रद्धेच्या बळावर पायी चालत त्या प्रदीर्घ यात्रेचा भाग बनावे, मंदिराच्या आवारात बसून हवन करावे आणि हिंगलाज मातेचा आशीर्वाद प्राप्त करून जीवन कृतार्थ करावे, अशी या भक्तांची मनापासून इच्छा आहे.

**(पांचजन्यवरून साभार)**

## प्रासंगिक




**नरेंद्र मोदींसाठी ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक धोरणात्मक मोहीम नाही. त्यांच्यासाठी त्याचा खूप सखोल अर्थ आहे. त्यांचा संकल्प पवित्र आहे.**

# भारताचे धर्मयुद्ध

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे न्यू नॉर्मल स्थापित केले आहे. पंतप्रधानांनी दहशतवादाविरुद्ध एक नवीन रेषा आखली आहे. मोदी म्हणाले की, 'सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकनंतर आता 'ऑपरेशन सिंदूर' हे दहशतवादाविरुद्ध भारताचे धोरण आहे.'

१२ व १३ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या वीररसाने ओतप्रोत भाषणांमध्ये नवीन भारताच्या वतीने तीन घोषणा केल्या. पहिली म्हणजे, भविष्यात भारतावर कोणताही दहशतवादी हल्ला झाला तर सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल. 'आम्ही आमच्या पद्धतीने, आमच्या अटींवर योग्य उत्तर देऊ. दहशतवादाची मुळे जिथे जिथे उगवतील तिथे आम्ही कठोर कारवाई करू', असा इशारा मोदींनी दिला. दुसरे म्हणजे, भारत कोणतेही 'न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग' सहन करणार नाही. 'न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग' च्या नावाखाली वाढणाऱ्या दहशतवादी तळांवर भारत अचूक आणि निर्णायकपणे हल्ला करेल.' तिसरे म्हणजे, 'आम्ही दहशतवाद्यांना पाठिंबा देणारे सरकार आणि दहशतवादाचे सूत्रधार यांना वेगळे मानणार नाही.'

ऑपरेशन सिंदूर मध्ये या तिन्ही गोष्टी प्रत्यक्षात घडून आल्या. एकतर्फी झालेल्या विध्वंसात, भारताने पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळ पार उद्ध्वस्त करून टाकले, ज्यामध्ये १०० हून अधिक जण ठार झाले. याशिवाय, भारताने पाकिस्तानच्या ११ हवाई तळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. म्हणजेच, दहशतवादी असोत किंवा त्यांच्या मागे असलेली पाकिस्तानची लष्करी शक्ती असो किंवा पाकिस्तानचे सरकार असो, 'न्यू नॉर्मल' अंतर्गत भारत त्यांच्यात कोणताही फरक करणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही बाब स्पष्ट केली की ऑपरेशन सिंदूर दरम्यान 'जगाने पाकिस्तानचे ते घृणास्पद सत्य देखील पाहिले आहे जेव्हा पाकिस्तानी सैन्याचे वरिष्ठ अधिकारी मारले गेलेल्या दहशतवाद्यांच्या अन्त्यसंस्काराला उपस्थित राहिले. हा सरकार पुरस्कृत दहशतवादाचा (स्टेट स्पॉन्सर्ड टेररिझम) चा सर्वांत मोठा पुरावा आहे. भारत आणि आपल्या नागरिकांना कोणत्याही धोक्यापासून वाचवण्यासाठी आम्ही निर्णायक पावले उचलत राहू.'

ऑपरेशन सिंदूरमुळे निराश व सैरभैर होऊन, पाकिस्तानने भारतातील मंदिरे, गुरुद्वारा, शाळा आणि इतर अनेक नागरी आणि लष्करी प्रतिष्ठानांवर हल्ला केला. परंतु भारताच्या मजबूत संरक्षण क्षमतेने पाकिस्तानचा नापाक प्रयत्न हाणून पाडला. तर दुसरीकडे, चीनने पाकिस्तानला दिलेली संरक्षण उपकरणे शत्रूच्या काहीच कामात आली नाहीत. भारताच्या क्षेपणास्त्रांनी पीओके आणि पाकिस्तानमध्ये शत्रूच्या छातीवर विनाशकारी प्रहार केला. 'मेड इन इंडिया'च्या यशाचे थेट प्रात्यक्षिक संपूर्ण जगाला पाहायला मिळाले.

नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ठामपणे अल्टिमेटम दिला की 'ज्या पद्धतीने पाकिस्तानी सैन्य आणि पाकिस्तानी सरकार दहशतवादाला वित्तपोषित करीत आहे, तो दहशतवाद एक दिवस खुद्द पाकिस्तानलाच नष्ट करेल. जर पाकिस्तानला टिकून राहायचे असेल तर त्याला आधी त्यांच्या देशातील दहशतवाद्यांच्या पायाभूत सुविधा नष्ट कराव्या लागतील. याशिवाय शांततेचा कोणताही मार्ग नाही''.

पंतप्रधान म्हणाले की, ''हा निश्चितच युद्धाचा काळ नाही. पण हा दहशतवादाचाही काळ नाही. 'टेररिझम' विरुद्ध 'झीरो टॉलरन्स' ही एका चांगल्या जगाची हमी आहे.''

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हे रूप भारतातील लोकांसाठी खूप दिलासा देणारे सिद्ध होत आहे. पूर्वी, दहशतवादी घटनेच्या स्थानी पोहोचल्यावर राजकारणी अनेकदा दोन गोष्टी बोलत असत. प्रथम, ही एक दहशतवादी घटना आहे, असे ते सांगत. पण लोकांना हे आपणहून कळत होते. दुसरी गोष्ट म्हणजे, आपण या घटनेचा तीव्र निषेध करता, असे हे राजकारणी म्हणत असत. मात्र, लोक या दोन्ही गोष्टींची खिल्ली उडवायचे. कारण हे राजकीय नेते याविषयी पुरेसे गंभीर नव्हते.

पण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शत्रूला केवळ जबरदस्त आव्हानच दिले नाही तर त्यांचा असा सडकून पराभव केला की ९० तास चाललेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये पराभव झाल्यानंतर पाकिस्तानला गुडघे टेकावे लागले. १० मे रोजी सकाळपासूनच पाकिस्तानचे डीजीएमओ भारताच्या डीजीएमओंशी बोलण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे, भारताचे डीजीएमओ दुपारी ३.३५ वाजता उपलब्ध झाले. जेव्हा पाकिस्तानने सांगितले की, ते कोणतीही दहशतवादी घटना घडवणार नाहीत, तेव्हा भारताने त्यांच्या विधानाचा विचार केला आणि युद्ध थांबवण्याचा पाकिस्तानचा प्रस्ताव मान्य केला. तोपर्यंत भारत आपल्या ध्येय गाठण्यात यशस्वी झाला होता. भारताने दहशतवाद्यांचे तळ पार उद्ध्वस्त करून टाकले होते. भारताने पाकिस्तानची विनंती तर ऐकली, परंतु नरेंद्र मोदी यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की ही युद्धबंदी नाही, तर केवळ एक 'स्थगिती' आहे. जर पाकिस्तानने पुन्हा काही आगळिक करण्याचे धाडस केले तर भारत पुन्हा ''शत्रूच्या घरात घुसून मारेल.''२२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला पहिला प्रतिकार म्हणजे सिंधू पाणी वाटप करार स्थगित केला आणि भारतीय सैन्याला त्यांना योग्य वाटेल ती कारवाई करण्याची संपूर्ण मोकळीक देण्यात आली. युद्धबंदीच्या चार दिवसांनंतर, बुधवार, १४ मे रोजी, पाकिस्तानने भारताला सिंधू पाणी वाटप करारावरील बंदी उठवण्याचे आवाहन केल्याचे उघड झाले. कारण भारताचा निर्णय 'एकतर्फी आणि बेकायदेशीर' असल्याचे पाकिस्तानचे म्हणणे होते. भारताचा हा निर्णय पाकिस्तानच्या जनतेवर आणि अर्थव्यवस्थेवर हल्ला करण्यासारखा आहे, असेही पाकिस्तानने म्हटले आहे. जर सिंधू पाणी वाटप करार पूर्ववत झाला नाही तर युद्धबंदी धोक्यात येऊ शकते, अशी धमकी पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी दिली आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीच 'पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही' अशी कडक भूमिका घेतली आहे. नरेंद्र मोदींसाठी 'ऑपरेशन सिंदूर' ही केवळ एक धोरणात्मक मोहीम नाही. त्यांच्यासाठी त्यांचा संकल्प अतिशय पवित्र आहे. सोमवार, १२ मे रोजी त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की ऑपरेशन सिंदूर ही 'न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. संपूर्ण जगाने या प्रतिज्ञेचे परिणामांमध्ये रूपांतर होताना पाहिले आहे.'

महत्त्वाची गोष्ट म्हणजे नरेंद्र मोदींसाठी ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक रणनीती नाही. ते मनातल्या मनात एका धर्मयुद्धाचे नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या दोन्ही भाषणांवरून हे पुन्हा पुन्हा स्पष्ट होत आहे. सोमवारी झालेले पहिले भाषण संपूर्ण देशाला उद्देशून होते. मंगळवारी दुसरे भाषण आदमपूर एअरबेसवर केले, जे नष्ट केल्याचा खोटा दावा पाकिस्तानने केला होता. तिथे जाऊन नरेंद्र मोदींनी हवाई दल, लष्कर आणि बीएसएफला संबोधित केले. पण प्रत्यक्षात ते संबोधन संपूर्ण भारत, पाकिस्तान आणि जगासाठी होते.

सोमवारच्या भाषणात मोदी म्हणाले, 'आज बुद्ध पौर्णिमा आहे. भगवान बुद्धांनी आपल्याला शांतीचा मार्ग दाखवला आहे. शांतीचा मार्गदेखील शक्तीतून जातो. मानवता शांती आणि समृद्धीकडे वाटचाल करू शकेल, प्रत्येक भारतीय शांततेत जगू शकेल आणि विकसित भारताचे त्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल यासाठी भारत शक्तिशाली असणे खूप महत्वाचे आहे आणि आवश्यकता पडल्यास या शक्तीचा वापर करणे देखील महत्त्वाचे आहे.' आपल्या मंगळवारच्या भाषणात नरेंद्र मोदींनी हे अधिक सखोलपणे स्पष्ट केले. ते म्हणाले की, ''भारत ही बुद्धांची आणि गुरू गोविंद सिंहजींचीही भूमी आहे. गुरू गोविंद सिंहजी म्हणाले होते 'सवा लाख से एक लडाऊ, चिडियाँ ते मैं बाज तुडाऊं, तबै गुरू गोविंद सिंह नाम कहाऊँ'. अधर्माचा नाश करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी शस्त्र हाती धरणे ही आमची परंपरा आहे. म्हणूनच, जेव्हा आमच्या भगिनींचे आणि मुलींचे कुंकू पुसण्यात आले तेव्हा, आम्ही दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून चिरडून टाकले.''

नरेंद्र मोदी म्हणाले, ''आमच्या भगिनी आणि मुलींच्या कपाळावरील कुंकू पुसण्याचे किती भीषण परिणाम होतात हे आज सर्व दहशतवादी तसेच सर्व दहशतवादी संघटनांना पुरते कळून चुकले आहे.'ऑपरेशन सिंदूर'चे कौतुक करताना पंतप्रधान म्हणाले की, ही लष्करी मोहीम म्हणजे 'भारताच्या धोरणाचा, उद्दिष्टाचा आणि निर्णायकतेचा संगम आहे.''

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सोमवारच्या भाषणातील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऑपरेशन सिंदूरच्या यशाचे श्रेय देण्याच्या उद्देशाने त्यांनी म्हटले की, ''सर्वप्रथम, मी प्रत्येक भारतीयाच्या वतीने भारताच्या पराक्रमी सैन्याला, सशस्त्र दलांना, आमच्या गुप्तचर संस्थांना, आमच्या शास्त्रज्ञांना सर्व भारतीयांच्या वतीने सॅलूट करतो.'' दुसऱ्या दिवशी आदमपूर हवाई तळावर, पंतप्रधानांनी सांगितले की मी त्या 'वीरांचे' 'दर्शन' घेण्यासाठी आलो आहे. यापूर्वी भारतीय सैनिकांचा आदर, सन्मान करणारे पहिले पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री मानले गेले आहेत. नरेंद्र मोदी यांनी शास्त्रीजींपेक्षाही एक पाऊल पुढे टाकून भारताची सेना, बीएसएफ आणि सशस्त्र दलांचा आदर केला आहे, त्यांना अभिवादन केले आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये लोकांना त्यांचा धर्म विचारून ठार मारले तेव्हा भारतातील सांप्रदायिक सलोखा बिघडवण्याचा त्यांचा घृणास्पद हेतू होता. पण नरेंद्र मोदींनी त्यांचे घर इतके उत्तम सांभाळले की संपूर्ण देश एकजूट झाला. विशेष म्हणजे असदुद्दीन ओवैसींनी वारंवार मोठ्याने 'पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणा देऊन दहशतवादाविरुद्ध देश मान तुकावणार नाही, असे पाकिस्तानला ठणकावून सांगितले.

*(पांचजन्यवरून साभार)*

### पंतप्रधान मोदींनी मांडलेले ठळक मुद्दे

- टेरर आणि टॉक्स एकत्र होऊ शकत नाहीत.
- टेरर आणि ट्रेड एकत्र नांदू शकत नाहीत
- पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही
- जर पाकिस्तानशी चर्चा होणार असेल तर ती फक्त दहशतवादावरच असेल
- जर पाकिस्तानशी चर्चा होणार असेल तर ती फक्त 'पाकव्याप्त काश्मीर' (पीओके) वरच असेल.
- आणि भारत आणि पाकिस्तानमध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाची भूमिका असू शकत नाही.
- जर पाकिस्तानशी चर्चा होणार असेल तर ती फक्त दहशतवादावरच असेल''आणि भारत आणि पाकिस्तानमध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाची भूमिका असू शकत नाही.